CMYK

आजचा सामना क्र.१
चेन्नई वि.गुजरात
वेळ : दु.३.३० वाजता
ठिकाण : चेन्नई

# सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

आजचा सामना क्र.२
लखनौ वि. कोलकाता
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : लखनौ


सोलापूर | रविवार, २६ एप्रिल २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १४८ | पाने १२+८ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपली कार्यपद्धती पारिवारिक कार्यपद्धती आहे. याच्या अंतर्गत आपापसात परामर्श आणि विचारविनिमयाच्या आधारे आपले काम चालते. आज संघाचे काम विविध पैलूंचे झाले आहे. संघाच्या दृष्टीने हे स्वाभाविक आहे. याला Progressive Unfoldment (क्रमबद्ध विकास) म्हणतात.

**-प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
-रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# अमेरिकेसोबत चर्चा नाहीच

**इराणच्या परराष्ट्र मंत्री अराघची यांची भूमिका** | **अण्वस्त्रावर तडजोड करण्यास नकार** | **चर्चेविना माघारी परतले शिष्टमंडळ**



**इस्लामाबाद, २५ एप्रिल**

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी शनिवारी इस्लामाबादमध्ये पाकिस्तानी लष्करप्रमुख असीम मुनीर यांची भेट घेतली आणि शांतता चर्चेसंदर्भात नवीन अटी-शर्तींचा मसुदा सोपविला. अमेरिकेसोबत समोरासमोर चर्चा होणार नाही आणि अण्वस्त्राचा मुद्दा वगळूनच पाकिस्तानच्यामार्फत यापुढे चर्चा केली जाईल. होर्मुझ सामुद्रधुनीत नाकाबंदी करून अमेरिकेने संघर्षविरामाच्या अटींचे उल्लंघने केले असून, त्यांच्यावर आमचा विश्वास राहिलेला नाही, असे अराघची यांनी स्पष्ट केले.

पाकिस्तानच्या निमंत्रणावरून अराघची, इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा समितीचे प्रमुख, इब्राहिम अझीझी यांच्यासोबत इस्लामाबादेत पोहोचले. त्यांनी मुनीर आणि पंतप्रधान शाहबाज शरीफ यांची भेट घेतली. अमेरिकेसोबत वाटाघाटी सुरू ठेवण्यासंदर्भात नवीन अटींचा मसुदा सादर केला. अण्वस्त्राचा मुद्दा सोडून चर्चा सुरू ठेवणे आणि होर्मुझमधील नाकाबंदी हटविणे याचा त्यात समावेश होता. इराणच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करण्यासाठी अमेरिकेचे राजदूत स्टीव्ह विटकॉफ आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे जावई जेरेड कुशनर इस्लामाबादेत येणार होते. मात्र इराणच्या भूमिकेमुळे अमेरिकेच्या शिष्टमंडळाने नियोजित दौरा रद्द केल्याने संघर्षविराम आणि शांतता करारावर अटकळ निर्माण झाली आहे.मुनीर यांच्या भेटीनंतर अराघची यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले, या दौऱ्याचा उद्देश अमेरिकेशी चर्चा करणे नाही. द्विपक्षीय मुद्यांवर मित्र राष्ट्रांशी समन्वय साधणे आणि प्रादेशिक घडामोडींवर चर्चा करण्यासाठी आम्ही इस्लामाबाद येथे आलो. करारासाठी आमच्या अटी-शर्तींचा मसुदा पाकिस्तानकडे सोपवला आहे. आमच्या अटी मान्य केल्या तरच अमेरिकेसोबत पाकिस्तानमार्फत चर्चा केली जाईल.



इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांचे स्वागत करताना पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इसाक दार

### चर्चेचा अमेरिकेचा दावा इराणने फेटाळला

**व्हाईट हाऊसने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इराणसोबत थेट शांतता चर्चा करण्यासाठी अमेरिकेचे शिष्टमंडळ पाकिस्तानला जाणार नाही. इराणच्या नवीन अटींमुळे नियोजित दौरा रद्द करण्यात आला. अशातच अराघची यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळ देखील पाकिस्तानातून रवाना झाले. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले की, अमेरिकेसोबत चर्चेसंदर्भात कोणतीही बैठक निश्चित नव्हती. इराणने आपली बाजू स्पष्ट केली असून, निर्णय अमेरिकेला घ्यायचा आहे.**

### होर्मुझवर नियंत्रण राहणारच : हेगसेथ

**अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ म्हणाले, होर्मुझवरील अमेरिकेचे नियंत्रण जगासाठी अत्यावश्यक आहे आणि अमेरिकेच्या परवानगीशिवाय कोणीही या मार्गातून जाऊ शकत नाही. जोपर्यंत इराण अण्वस्त्रे विकसित करण्याची आपली योजना सोडून देत नाही, तोपर्यंत होर्मुझमध्ये नाकाबंदी सुरूच राहील.**

### शत्रूवर प्रहार करण्यास सज्ज : रझा तलाई-निक

**इराणच्या संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते रझा तलाई-निक यांनी म्हटले की, इराण देशांतर्गत १,००० पेक्षा जास्त प्रकारची शस्त्रे तयार करत आहे आणि शत्रूवर प्रहार करण्यास सज्ज आहे. शस्त्रनिर्मितीचे कारखाने देशभरात पसरलेले आहेत. याचा फायदा असा आहे की, काही कारखान्यांचे नुकसान झाले तरी उत्पादन सुरू राहू शकेल.**

**पाकिस्तानात कडेकोट सुरक्षा**

शांतता चर्चेच्या पृष्ठभूमीवर इस्लामाबादमध्ये कडेकोट सुरक्षा आहे. महत्त्वाचे रस्ते आणि बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या आहेत. (वृत्तसंस्था)

## इस्रायलचे लेबनॉनवर हल्ले ;१४ ठार

**बैरुत, २५ एप्रिल**

इस्रायल आणि लेबनॉन यांच्यातील संघर्षविरामाला पुन्हा तीन आठवड्यांची मुदतवाढ दिली असतानाही इस्रायलकडून दक्षिण लेबनॉनमध्ये बाम्बवर्षाव सरूच आहे. इस्रायली सैन्य आणि इराण-समर्थित हिजबुल्लाह यांच्यात शनिवारी पहाटेपासून तीव्र संघर्ष सुरू आहे. अशातच इस्रायलच्या वायुदलाने हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा केला. यात १४ नागरिक ठार, तर ६५ पेक्षा अधिक जण जखमी झाले. इस्रायलच्या हल्ल्यात दक्षिण लेबनॉनमधील अनेक निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या.

इस्रायली संरक्षण विभागाने सांगितले की, त्यांनी दक्षिण लेबनॉनमधील यातर आणि काफरा या शहरांमधील हिजबुल्लाहच्या ठिकाणांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा केला. हिजबुल्लाहने इस्रायली लष्करावर गोळीबार केल्यानंतर त्यांच्या अड्ड्यांवर हवाई हल्ले चढविण्यात आले. दहशतवादी संघटनेचे अस्तित्व संपुष्टात येईपर्यंत हल्ले सुरूच राहणार आहे.

दुसरीकडे लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने हल्ल्याची पुष्टी करताना म्हटले की, दक्षिण लेबनॉनमध्ये झालेल्या इस्रायली हवाई हल्ल्यांमध्ये अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या. ढिगाऱ्यातून आतापर्यंत १४ मृतदेह बाहेर काढण्यात आले, तर ६५ जखमींना रुग्णालयात हलविले. बचावपथकाकडून शोधमोहीम सुरू असून मृतकांचा आकडा वाढू शकतो.

हिजबुल्लाहच्या प्रवक्त्याने दावा केला की, त्यांनी दक्षिण लेबनॉनमधील राम्या शहरात एका इस्रायली चिलखती वाहनाला लक्ष्य केले. (वृत्तसंस्था)




दिल्लीच्या फिरोजशाह कोटला मैदानावर शुक्रवारी दिल्लीचा फलंदाज के. एल. राहुलने चौफेर फलंदाजी करीत १५२ धावांची खेळी केली. या मोसमातील राहुलची ही सर्वोच्च खेळी ठरली आहे. तथापि, ही खेळी दिल्ली संघाला पराभवापासून वाचवू शकली नाही. पंजाबने ६ गड्यांनी विजय मिळविला. (वृत्त क्रीडा पानावर)

## महत्त्वाचे

### सोन्या-चांदीच्या दरात वाढ

**मुंबई** : जागतिक बाजारातील अनिश्चिततेचा परिणाम देशातील सराफा बाजारावर दिसून येत आहे. शनिवारी सोने-चांदीच्या किमतींमध्ये किंचित वाढ नोंदवली गेली. मध्यपूर्वेत सुरू असलेल्या तणावामुळे गुंतवणूकदार सावध भूमिका घेत असून सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने-चांदीकडे कल वाढताना दिसत आहे. मागील व्यवहार सत्रात मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोने-चांदी तेजीसह बंद झाले होते. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातही किमतींमध्ये सौम्य वाढ दिसून आली आहे. ताज्या आकडेवारीनुसार, एमसीएक्सवर मे डिलिव्हरीसाठी चांदीच्या दरात १.३८ टक्क्यांची वाढ होऊन ती २,४४,८४५ रुपये प्रति किलोवर पोहोचली. तर सोनेही ०.७० टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले.

### स्वार्थी राजकारणासाठी पक्षांतर अयोग्यः अण्णा हजारे

**अहिल्यानगर** : आम आदमी पार्टीमध्ये झालेल्या बंडखोरीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी उपरोधिक टोला लगावला. आपला देश संविधानाच्या आधारावर चालतो. स्वार्थी राजकारणासाठी पक्षांतर करणे अयोग्य आहे, असे मत हजारे यांनी व्यक्त केले आहे. राघव चड्ढांच्या बंडावर ते म्हणाले, हे त्यांचे व्यक्तिगत स्वार्थाचे राजकारण आहे. व्यक्तिगत फायद्यासाठी असे राजकीय पक्षांतर चुकीचे आणि घटनात्मक मूल्यांच्या विरोधात आहे. लोकशाही नीतिमत्ता जपण्याच्या महत्त्वावर जोर देत त्यांनी निवडून आलेल्या प्रतिनिधींनी घटनेच्या भावनेनुसार वागले पाहिजे.

### झेडपी व पंचायतीतील स्वीकृतचा मार्ग मोकळा

**सोलापूर** : जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील स्वीकृत सदस्य नियुक्तीचा मार्ग अखेर मोकळा झाला असून, यासंदर्भातील राजपत्र प्रसिद्ध झाल्यानंतर शासनाने आता अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदांना आदेश जारी केले आहेत. त्यामुळे लवकरच स्वीकृत सदस्य निवडीची प्रक्रिया प्रत्यक्षात सुरू होणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करण्याचा विषय काही काळ प्रलंबित होता. यासाठी आवश्यक असलेले राजपत्र अलीकडेच प्रसिद्ध करण्यात आले. त्यानंतर संबंधित नियम व तरतुदींनुसार नियुक्ती प्रक्रिया राबविण्यास हिरवा कंदील मिळाला आहे. शासनाच्या आदेशानुसार, जिल्हा परिषदांनी ठराविक निकषांच्या तरतुदींचे पालन करत स्वीकृत सदस्यांची निवड करावी लागणार आहे. यामध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते व अनुभवी व्यक्तींना संधी दिली जाणार असल्याचे संकेत आहेत. दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील गटनेते व पदाधिकारी यांच्यात स्वीकृत सदस्य पदांसाठी हालचालींना वेग आला आहे. इच्छुकांकडून राजकीय पातळीवर संपर्क व लॉबिंग सुरू आहे

### ४७ माओवाद्यांचे आत्मसमर्पण

**हैदराबाद** : छत्तीसगड 'पीएलजीए' बटालियनमधील ४७ माओवाद्यांनी तेलंगणाचे पोलिस महासंचालक शिवधर रेड्डी यांच्याकडे आत्मसमर्पण केले आहे. हा माओवाद्यांसाठी एक मोठा धक्का मानला जात आहे. याप्रसंगी माओवाद्यांनी ३२ शस्त्रे आणि ५१५ गोळ्या पोलिसांकडे जमा केल्या. पोलिस महासंचालक रेड्डी यांनी सांगितले की, छत्तीसगड पीएलजीए बटालियन-१ च्या सर्व माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे.

# विदर्भात सूर्याची 'संचार'बंदी

## अकोला, अमरावती ४५.६

**नागपूर, २५ एप्रिल**

विदर्भावर सूर्याने जणू आग ओकणे सुरू केले आहे. शुक्रवारी विदर्भातील सर्वाधिक ४५ अंश इतके तापमान अकोला येथे नोंदविले गेल्यानंतर शनिवारी अकोला आणि अमरावती शहरावर सूर्याचा प्रकोप अधिकच वाढला. या दोन्ही शहरांत ४५.६ अंश तापमानाची नोंद करण्यात आली. यंदाच्या उन्हाळ्यात महाराष्ट्रातील हे सर्वाधिक तापमान ठरले आहे.



या दोन्ही शहरांपाठोपाठ वर्धा येथे ४५.५ इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. त्यानंतर नागपूर आणि चंद्रपूर येथे ४४.२ तापमान नोंदविण्यात आले. या वाढत्या तापमानामुळे संपूर्ण विदर्भात 'सूर्या'ने जणू संचारबंदी लादली होती, असे चित्र पाहायला मिळाले. दुपारच्या सुमारास बहुतेक शहरांमधील रस्ते ओसाड पडले होते. आवश्यक कारणांशिवाय नागरिकांनी घराबाहेर जाण्याचे टाळले होते. ब्रह्मपुरी येथे ४४.१ आणि भंडाऱ्यात ४४ अंश इतके तापमान होते. तर, गडचिरोली आणि गोंदियात ४३.६ इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. वाशिम आणि यवतमाळ येथे ४३ अंश तापमानाची आणि बुलढाणा येथे ४२.२ तापमानाची नोंद झाली.

### ६८ वर्षांनंतर बुलढाण्याचे तापमान ४२.२ अंशांवर

**बुलढाणा शहर हे थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जात होते; मात्र आता बुलढाणा हे उष्ण हवेचे ठिकाण बनल्याचे चित्र आहे. तब्बल ६८ वर्षांनंतर या शहराचे तापमान पुन्हा ४२.२ अंश सेल्सिअस इतके नोंदविण्यात आले आहे. यापूर्वी २३ मे १९५४ व २५ एप्रिल १९५८ रोजी या शहरात ४२.२ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली होती.** (तभा वृत्तसेवा)

# उद्धव-फडणवीस मध्यरात्रीची भेट म्हणजे निव्वळ अफवा

## भाजपाचा कठोर कारवाईचा इशारा

**मुंबई, २५ एप्रिल**

राजकीय वर्तुळात अनेकदा तथ्यहीन आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्यांचा आधार घेऊन जनमानसात गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांची मध्यरात्री भेट झाल्याच्या बातम्या सोशल मीडिया आणि काही माध्यमांतून पसरवण्यात आल्या होत्या. ह्या बातम्या निव्वळ अफवा आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

अशा प्रकारच्या बिनबुडाच्या चर्चा म्हणजे विरोधकांचे नैराश्य असल्याचे स्पष्ट करत, देवेंद्र फडणवीस यांनी अफवा पसरवणाऱ्यांना सज्जड इशारा दिला आहे. तर, या कथित भेटीच्या बातम्या पूर्णतः निराधार, बिनबुडाच्या आणि धादांत खोट्या असून ज्या समाजमाध्यम हॅण्डलवरून अशा अफवा पसरवल्या, त्यांना कायदेशीर नोटीस देऊन कारवाई केली जाईल, असे भाजपाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी स्पष्ट केले आहे.



राजकीय लाभ उठवण्यासाठी काही मंडळी खोटी माहिती पेरून जनमानसाचा कल बदलण्याचा प्रयत्न करत आहेत. पण, सत्य लपून राहत नाही आणि विरोधकांचा हा प्रयत्न त्यांच्याच अंगलट येईल, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला आहे. कोणत्याही पुराव्याशिवाय केवळ राजकीय आकसापोटी जनतेची दिशाभूल करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाईल. सोशल मीडियाचा वापर करून खोटी माहिती पसरवणारे आता कायद्याच्या कचाट्यात सापडणार आहेत. पक्षाच्या आणि सरकारची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. (तभा वृत्तसेवा)

### लपून-छपून भेटण्याची गरज नाही

**सध्या आमच्यात कोणतेही विषय नाहीत. आणि जर भेट घ्यायचीच असेल तर उघडपणे घेता येते. लपून-छपून भेटण्याची मुळीच गरज नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. तसेच उबाठा खासदार संजय राऊत यांनी भेट झाली की नाही हे ते संबंधित नेतेच सांगू शकतील, अशी प्रतिक्रीया दिली.**

# जळण आणण्यासाठी गेलेल्या आईसह दोन मुलांचा तलावात बुडून मृत्यू

**• ३५ वर्षीय आई, १२ वर्षीय मुलगी, ११ वर्षीय मुलाचा समावेश • मंगळवेढा तालुक्यातील खडकी येथील घटना**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.२५ एप्रिल-**

खडकी येथे तलावाच्या शेजारी जळण गोळा करण्यासाठी गेलेल्या एका ३५ वर्षीय विवाहित महिलेचा तिच्या १२ वर्षीय मुलगी व ११ वर्षाचा मुलगा असे तिघा जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील खडकी येथे घडली. या घटनेने संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.



याबाबत सज्जन घोडके यांनी मंगळवेढा पोलिसात ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, माझी चुलत वहिनी वैशाली अनिल घोडके ह्या श्रेया व सोहम या मुलांना घेऊन शुक्रवार, दि.२४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास स्वयंपाकासाठी जळण आणण्यासाठी गावालगत असलेल्या तलावाशेजारी गेल्या होत्या. सायंकाळी ६.३० वाजता माझा चुलत भाऊ अनिल घोडके हा कामावरुन घरी आले असता त्यांना माझी चुलत वहिनी व मुलं दिसली नाहीत. तिघे कुठे गेले? असे मुलगा स्वप्नील यास विचारले असता जळण आणण्यासाठी तलावाजवळ गेल्याचे त्याने सांगितले.

तलावाशेजारी मुलांची चप्पल व घरातील प्लॅस्टिकची बादली दिसून आली. त्यामुळे बॅटरी घेवून परिसरात शोध घेतला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. रात्री ११ वाजण्याच्या सुमारास वैशाली घोडके यांना तलावातून बाहेर काढून मंगळवेढा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासणी केली असता उपचारापुर्वीच ती मयत झाल्याचे सांगितले. दरम्यान, रात्र खूप झाल्याने श्रेया व सोहम या मुलांचा शोध घेणे शक्य नसल्याने शनिवारी सकाळी पंढरपूर येथून रेस्क्यु टीमला पाचारण करण्यात आले. त्या टीमने शोध घेत त्यांना पाण्यातून बाहेर काढून मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता ते दोघेही मयत झाल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. महिला पोलिस हवालदार डॉ.आरती कणिरे ह्या पुढील तपास करीत आहेत.

# 'टोल प्लाझा' अडथळामुक्त होणार

## न थांबता वाहन कर कापला जाईल : नितीन गडकरी

**नवी दिल्ली, २५ एप्रिल**

डिसेंबरपर्यंत देशभरातील अनेक राष्ट्रीय महामार्गांवर अडथळामुक्त 'टोलिंग' लागू केले जाईल, अशी घोषणा रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. मालवाहतुकीचा खर्च कमी करण्यासाठी भारताने उत्तम पायाभूत सुविधा विकसित करायला हव्यात, असेही ते म्हणाले. 'लॉजिस्टिक्स शक्ती समिट अँड अवॉर्ड्'च्या दुसऱ्या आवृत्तीला ते संबोधित करत होते.





गडकरी पुढे म्हणाले, डिसेंबरपर्यंत देशभरातील अनेक राष्ट्रीय महामार्गांवर अनेक अडथळामुक्त टोलिंग प्रणाली स्थापित करण्याची आमची योजना आहे. ही नवीन प्रणाली 'ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निशन' आणि 'एआय ॲनालिटिक्ससह आरएफआईडी' आधारित 'इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन' यांसारख्या एकात्मिक तंत्रज्ञानाचा वापर करून अडथळामुक्त टोलिंग सुलभ करते. याअंतर्गत, टोल प्लाझावर न थांबता, उच्च-कार्यक्षम कॅमेरे आणि रीडर्सद्वारे वाहनांची ओळख पटवून त्यांच्याकडून शुल्क आकारले जाईल.

गडकरी पुढे म्हणाले की, जर भारताला जागतिक महासत्ता बनायचे असेल तर देशाला मालवाहतुकीचा खर्च एका अंकी संख्येपर्यंत कमी करावा लागेल. आयआयटी चेन्नई, आयआयटी कानपूर आणि आयआयएम बंगळूर यांनी तयार केलेल्या एका ताज्या अहवालात असे दिसून आले आहे की, भारतातील द्रुतगती मार्ग आणि आर्थिक कॉरिडॉरच्या बांधकामामुळे देशाचा लॉजिस्टिक्स खर्च १६ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. अमेरिकेत लॉजिस्टिक्सचा खर्च १२ टक्के, युरोपीय देशांमध्ये १२ टक्के आणि चीनमध्ये ८-१० टक्के आहे, असेही त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### नियम तोडणाऱ्यांना बजावणार ई-नोटीस

**गडकरी पुढे म्हणाले, वाहतूक नियमांचे पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक आहे. तर कोणी नियमांचे पालन करत नसेल तर त्याला ई-नोटीस पाठवली जाईल. या नोटिसांचे पैसे न भरल्यास त्यांचा फास्टॅग निलंबित होऊ शकतो आणि वाहनांसंबंधी इतर दंड आकारले जाऊ शकतात.**

# माणुसकीच्या आडोशात जन्मले एक नवे आयुष्य

**डॉ. सुनीता पोटे यांचा धाडसी निर्णय** | **शिरूरमध्ये नागरिकांच्या संवेदनशीलतेची प्रचीती**

**पुणे/शिरूर, २५ एप्रिल**

शिरूर शहरात आज माणुसकी आणि वैद्यकीय कर्तव्याची सांगड घालणारी एक अत्यंत भावूक घटना घडली. प्रसूती कळांनी व्याकुळ झालेल्या एका मातेला रुग्णालयापर्यंत पोहोचणेही अशक्य झाले असताना, एका महिला डॉक्टरने भररस्त्यात प्रसूती करून त्या मायलेकीचे प्राण वाचवले. डॉ. सुनीता पोटे यांनी दाखवलेले हे अजोड धाडस आणि प्रसंगावधान सध्या शिरूरमध्ये चर्चेचा विषय ठरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिरूरमधील जोशीवाडी येथील एक गर्भवती महिला सकाळी प्रसूती कळा सुरू झाल्याने शिरूर ग्रामीण रुग्णालयाकडे जाण्यास निघाली होती. मात्र, रुग्णालयाचा उंबरठा ओलांडण्यापूर्वीच तिला होणाऱ्या वेदना असह्य झाल्या. पाय पुढे टाकणेही कठीण झाल्याने ती माऊली वेदनेने विव्हळत भररस्त्यातच बसली. रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांच्या ही बाब लक्षात येताच तिथे गर्दी जमली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून काही सजग नागरिकांनी तातडीने जवळच असलेल्या डॉ. सुनीता पोटे यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना मदतीसाठी पाचारण केले. डॉ. पोटे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. महिलेची प्रकृती पाहून तिला आता रुग्णालयात हलवणे केवळ अशक्य असल्याचे त्यांच्या लक्षात आले. (तभा वृत्तसेवा)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### हरभजनसिंग, गुप्तांच्या घरावर लिहिले गद्दार



**चंदीगड :** आम आदमी पक्षाच्या सात खासदारांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर पंजाबमध्ये आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा संताप उफाळून आला आहे. जालंधरमध्ये कार्यकर्त्यांनी राज्यसभा खासदार हरभजन सिंग यांच्या निवासस्थानाच्या भिंतींवर गद्दार लिहून आपला संताप व्यक्त केला. तर लुधियानामध्ये खासदार राजेंद्र गुप्ता यांच्या कार्यालयाच्या भिंतीवर पंजाबचा गद्दार. असे लिहिले आहे. आम आदमी पक्षाचे माजी आमदार आणि विरोधी पक्षनेते तसेच नुकतेच भाजपात सामील झालेले वकील एच. एस. फूलका म्हणाले, ज्या प्रकारे केजरीवाल आणि भगवंत मान यांनी पंजाब उद्ध्वस्त केले आहे, ते पाहता आपमधील पंजाबची काळजी करणाऱ्यांनी त्यांच्या विरोधात उभे राहून बंड केले पाहिजे. राघव चड्ढा आणि इतर खासदारांनी ज्या धैर्याने आवाज उठवला आहे, त्यांचे मी कौतुक करतो, असेही ते म्हणाले.

### कुणाचाही व्यवसाय हिसकावू नयेः निरूपम

**मुंबई :** राज्यात १ मे पासून रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय जाहीर झाल्यानंतर राजकीय आणि सामाजिक वाद निर्माण झाला आहे. या निर्णयामुळे मुंबईतील काही अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.या पृष्ठभूमीवर शिवसेनेचे नेते संजय निरुपम यांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. अशा प्रकारच्या सक्तीमुळे गरीब आणि रोजंदारीवर अवलंबून असलेल्या चालकांच्या उपजीविकेवर परिणाम होऊ शकतो, असे त्यांचे म्हणणे आहे. कोणाचाही रोजीरोटीचा धंदा हिसकावून घेऊ नये. संबंधित मंत्र्यांशी या विषयावर चर्चा झाली असून पुढील आठवड्यात यावर बैठक होणार आहे तसेच आपण चालकांच्या बाजूने भूमिका मांडली असून शासनाने यावर पुनर्विचार करावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. या दरम्यान, या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. यावरून वाद निर्माण होऊ नये, असे सांगत त्यांनी परिस्थिती शांत ठेवण्याचे आवाहन केले आहे. मात्र, निरुपम यांनी आपली भूमिका अधिक आक्रमकपणे मांडताना आंदोलनावेळी झालेल्या घोषणाबाजी आणि टीकेवरही प्रतिक्रिया दिली.

# पाश्चात्त्य विचारांचा लेप सर्वांना उतरवावा लागेल

**सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे आग्रही प्रतिपादन**



शिलान्यास सोहळ्यात सहभागी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत शेजारी आशिष जयस्वाल, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, डॉ. आनंद पाठक, आनंद औरंगाबादकर, स्वामी मित्रानंद महाराज, आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरी, धीरेंद्र कृष्ण शास्त्री, साध्वी ऋतुंभरा, स्वामी गोविंददेव गिरी महाराज, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आ. प्रसाद लाड, ॲड. सुनील मनोहर, शैलेश जोगळेकर आणि मान्यवर

### भारत-दुर्गा शक्तिस्थळाचा शिलान्यास

◆ **नागपूर, २५ एप्रिल**

दीडशे वर्षांच्या गुलामगिरीनंतर आपल्या मन-बुद्धीवर पाश्चात्य विचारांचा लेप चढला आहे. त्याला उतरवावे लागेल आणि दैनंदिन कृतीपासून ते राष्ट्रीय मुद्यांपर्यंत आपल्या सगळ्यांना भारतमय व्हावे लागेल, असे आग्रही प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

डॉ. आबाजी थत्ते सेवा व संशोधन संस्थेद्वारा प्रस्तावित भारत-दुर्गा शक्तिस्थळाचा जामठामधील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट परिसरात शुक्रवार, २४ एप्रिल रोजी शिलान्यास सोहळा पार पडला. श्री जुना आखाडा पीठाधीश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरी, स्वामी गोविंददेव गिरी महाराज, चिन्मय मिशनचे स्वामी मित्रानंद महाराज, बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री, साध्वी ऋतुंभरा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खा. माया इवनाते, महापौर नीता ठाकरे, संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुनील मनोहर, सचिव शैलेश जोगळेकर व्यासपीठावर उपस्थित होते.

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, मंदिर पूर्ण झाल्यानंतर तेथे नित्य पूजा-अर्चना होईल. भारत-दुर्गेची पूजा केवळ पुजाऱ्यांनाच नाही तर सर्वांनाच करावी लागेल. पण, याची पद्धत वेगळी आहे. भारतमातेची पूजा करायची असेल तर प्रत्येकाला भारतमय बनावे लागेल, भारताला जाणून घेत देशाला मानावे लागेल. शक्तीशिवाय काहीच होत नाही. सत्याला शक्तीचा आधार घेत जगात प्रचलित करावे लागते. आपल्या देशात सत्यासाठी शक्तीची आवश्यकता नसते. दुसऱ्या देशात मात्र 'जिसकी लाठी उसकी भैस' अशा पद्धतीने वागतात.

आज जगाची अवस्था सगळेच पाहत आहेत. अशा स्थितीत आपला देश विश्वगुरू होईल की नाही अशा संभ्रमात लोक असतात. राम मंदिराबाबतदेखील असाच संभ्रम अनेकांच्या मनात होता. मात्र, मनात विश्वास होता व ते साकार झाले. जगाने भारताचा मार्ग स्वीकारला नाही तर त्यांचे काय भविष्य असेल हा मोठा सवाल आहे. भारत-दुर्गेची प्रत्येक भारतीयाने पूजा केली तर निश्चितच भारताचे पुनर्वैभव परत येईल व भारत शक्तिसंपन्न होईल, असे ते म्हणाले.

कार्यक्रमादरम्यान सर्वच मान्यवरांनी भारत-दुर्गामातेची संकल्पना मांडण्याचे श्रेय डॉ. मोहनजी भागवत यांना दिले. मात्र, त्यांनी हा विचार मोरोपंत पिंगळे यांचा होता, असे स्पष्ट केले. एकात्मता यात्रेच्या वेळी चार दिशांना भारतमातेच्या मूर्ती गेल्या होत्या. त्यातील एक मूर्ती नागपुरात आली होती. आता त्यांची संकल्पना साकार होत आहे, असे ते म्हणाले.

भारत केवळ भूमी नाही, जगदंबेचे स्वरूप आहे. संघाचे कार्य ईश्वरीय आहे. तेथे येणारे विचार ईश्वरीयच असतात. आपल्या मुलांपैकी किमान एका मुलाला स्वयंसेवक बनवा. या मंदिराच्या माध्यमातून अखंड भारताकडे देशाचे मार्गक्रमण होत असल्याचे संकेत मिळत आहेत. जगात वर्तमान काळात एकाच प्रकारच्या लोकांमध्ये संघर्ष सुरू आहे. तो आपला विचार नाही. पाश्चिमात्य जीवन अस्ताव्यस्त झाले आहे. या सगळ्यांना भारतच दिशा दाखवेल. भारतावर आक्रमण करणारे लयाला गेले. येणारा काळ भारताचाच असेल, असा विश्वास जुना आखाडा पीठाधीश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंद गिरी यांनी व्यक्त केला. हिंदूंची शक्ती भाषा, पक्ष, राजकारण, प्रांतात विभाजित झाली आहे. एकत्रित आलो तर आपण जगाला झुकवू शकतो.

सर्वांनी संघटित राहायला हवे, असे साध्वी ऋतुंभरा म्हणाल्या.

#### देशाला प्रेरणा मिळेल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारत-दुर्गा मातेच्या मंदिरातून देशाला प्रेरणा मिळेल. १८ भुजा असलेली भारत-दुर्गा ही शक्तीची मूर्ती असून, संपूर्ण देशात नवचेतना जागृत करेल. या मंदिरातून देशभराला प्रेरणा मिळेल. यातून भक्ती व शक्तीची साधना होईल. म्हणूनच सर्वांनी इथून राष्ट्रजागृतीची भावना जागवावी.

#### ५२ वे शक्तिपीठ ठरेल

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, भारत-दुर्गा शक्तिस्थळामागे भारत निर्माणाची प्रेरणा आहे. त्यातून भारताचे पुनर्निर्माण व्हावे, हाच विचार सरसंघचालकांच्या मनात आला व त्यातूनच हे निर्माण कार्य सुरू झाले आहे. भारत-दुर्गा शक्तिस्थळ संपूर्ण देशाला प्रेरणा देईल. भारत-दुर्गा मातेचे मंदिर ५२ वे शक्तिपीठ ठरेल.

भारत मातृप्रधान देश आहे. जेव्हा भारत-दुर्गा मंदिर बनेल तेव्हा देश शक्तिसंपन्न होईल व अखंड भारत बनेल. हे मंदिर पाहून जगातील लोकांना कळेल की भारत शास्त्र व शस्त्रांच्या आधारे चालतो, असे बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणाले. जगाचे मांगल्य साध्य करायचे असेल तर भारताचे अस्तित्व महत्त्वाचे आहे. त्यासाठी शक्ती आवश्यक आहे. रामराज्याची स्थापना होत नाही, तोपर्यंत राम मंदिराचे काम पूर्ण होणार नाही. ज्ञानेश्वरांचे पसायदान हेच रामराज्याचे वर्णन आहे. नाशिकमधील कॉर्पोरेट कांडानंतर संताप येत नसेल तर आपण मृतप्राय झालो आहोत की जिवंत आहोत याचा विचार करायला हवा. अशा लोकांविरोधात उग्र होऊन उभे रहावे लागेल. आपल्या संस्कृतीनुसार शक्तिमान होणे आवश्यक आहे, असे गोविंददेव गिरी महाराज म्हणाले.

◂(तभा वृत्तसेवा)

## ममता बॅनर्जींचे स्वप्न भंग पावणार?

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २५ एप्रिल**



पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वात तृणमूल काँग्रेस विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे. सलग तीनदा राज्याचे मुख्यमंत्रिपद भूषवणाऱ्या ममता बॅनर्जी यंदा चौथ्यांदा मुख्यमंत्री होतात की, भाजपा त्यांच्या स्वप्नावर आणि मेहनतीवर पाणी फेरते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

साध्या राहणीसाठी ममता बॅनर्जी ओळखल्या जातात. पांढरी साडी आणि पायात स्लीपर, असा त्यांचा नेहमीचा पेहराव असतो. ममता बॅनर्जी यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोपही फारसे झाले नाही.

काँग्रेसमधून ममतांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात केली. १९९२ मध्ये एका मुलीवर माकप कार्यकर्त्यांने बलात्कार केला. तत्कालिन मुख्यमंत्री ज्योती बसू यांना भेटण्यासाठी ममता बॅनर्जी रायटर्स बिल्डिंगमध्ये या पीडित मुलीला घेऊन गेल्या. मात्र पोलिसांनी ममता बॅनर्जी यांनाच अटक करुन तुरुंगात डांबले. या घटनेनंतर संतप्त झालेल्या ममतांनी मुख्यमंत्री झाल्यानंतरच रायटर्स बिल्डिंगमध्ये पाय ठेवील, अशी शपथ घेतली.

माकपच्या निवडणुकीतील गैरप्रकाराविरोधात १९९३ मध्ये ममता बॅनर्जी यांनी मतदान करण्यासाठी मतदान ओळखपत्र अनिवार्य करण्यात यावे, या मागणीसाठी मंत्रालयावर मोर्चा काढला. या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १३ जण ठार झाले. ममता बॅनर्जीचा राजकीय प्रभाव अशा आंदोलनातून वाढू लागला.

प्रदेश काँग्रेस अध्यक्ष सोमेंद्रनाथ मित्रा यांच्याशी मतभेद झाल्यानंतर १९९७ मध्ये ममता बॅनर्जी यांनी काँग्रेस सोडत तृणमूल काँग्रेसची स्थापना केली.

डाव्या आघाडी सरकारच्या भूमी अधिग्रहणाविरोधातील कारवाईच्या विरोधात ममता बॅनर्जी यांनी आंदोलन पुकारले. टाटाचा नॅनो मोटारीचा कारखाना सिंगूरमध्ये आणण्याला ममता बॅनर्जी विरोध केला. पोलिसांनी त्यांना रोखले तर त्यांनी विधानभवनात पत्रपरिषद घेत १२ तासांच्या बांगला बंदची घोषणा केली. तृणमूल काँग्रेसच्या आमदारांनी विधानभवनात तोडफोड केली, ठिकठिकाणी रस्ते रोखण्यात आले.

ममतांनी बेमुदत उपोषण सुरु केले. जीवन अनमोल आहे, असे म्हणत तत्कालिन राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनी ममता बॅनर्जी यांचे उपोषण सोडविण्यासाठी हस्तक्षेप करा, अशी विनंती तत्कालिन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांना केली. डॉ.मनमोहनसिंग यांनी बंगालचे राज्यपाल गोपालकृष्ण गांधी यांना पत्र पाठवले, हे पत्र राजभवनातून ममता बॅनर्जी यांना पोहोचण्यात आले, आणि ममतांनी आपले उपोषण मागे घेतले. या आंदोलनाने ममता बॅनर्जी यांची जनतेसाठी लढणाऱ्या आक्रमक नेता अशी प्रतिमा राज्यात तयार झाली.




## खासदार म्हणून राजकीय कारकीर्दीला प्रारंभ

◆ **नवी दिल्ली, २५ एप्रिल**

सलग १५ वर्षांपासून पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात काँग्रेस पक्षातर्फे राष्ट्रीय राजकारणातून झाली. १९८४ मध्ये ममता बॅनर्जी पहिल्यांदा काँग्रेसतर्फे खासदार झाल्या. १९९१ मध्ये त्या दुसऱ्यांदा लोकसभेवर निवडून गेल्या. १९९६ मध्ये तिसऱ्यांदा त्या लोकसभेवर विजयी झाल्या. १९९८ मध्ये लोकसभेवर त्या चौथ्यांदा विजयी झाल्या. १९९९ मध्ये पाचव्यांदा त्या लोकसभेवर निवडून आल्या.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत यावेळी भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात चुरशीचा मुकाबला होत आहे. दोन्ही पक्ष एकदुसऱ्यांचे कट्टर शत्रू झाले आहे. राजकारणात कोणीच नेहमीसाठी कोणाचा शत्रू नसतो, तसेच मित्रही नसतो, हे ममता बॅनर्जी यांच्या उदाहरणावरुन लक्षात येते.

ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस १९९९ मध्ये रालोआचा घटक पक्ष होता. अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये १९९९ ते २००१ या काळात ममता बॅनर्जी या रेल्वेमंत्री होत्या, हे आज सांगितले तर विश्वास बसणार नाही. त्या देशातील पहिल्या महिला रेल्वेमंत्री ठरल्या. २००४ मध्ये सहाव्यांदा त्या लोकसभेवर निर्वाचित झाल्या. नंतर रालोआ सोडून त्या संपुआत सहभागी झाल्या. २००९ मध्ये त्या सातव्यांदा लोकसभेवर निवडून आल्या. डॉ. मनमोहनसिंग सरकारमध्ये पुन्हा एकदा रेल्वेमंत्री म्हणून त्यांनी काम केले.

२०११ मध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री होण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी खासदारकीचा राजीनामा दिला. त्यानंतर सलग १५ वर्षांपासून त्या पश्चिम बंगाले मुख्यमंत्रिपद भूषवित आहेत.

◂(तभा वृत्तसेवा)



पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवारी नाशिक येथे 'गोदा ते नर्मदा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६' या यात्रेचा शुभारंभ करण्यात आला.

## लाचेचे पैसे उंदरांनी कुरतडले

◆ **नवी दिल्ली, २५ एप्रिल**

न्यायालयांना अनेकदा विचित्र युक्तिवादांना सामोरे जावे लागते. परंतु अलीकडेच सर्वोच्च न्यायालयासमोर एक असे प्रकरण आले, ज्यामुळे न्यायाधीशांनाही आश्चर्य वाटले. हे प्रकरण भ्रष्टाचाराशी संबंधित होते. मुख्य पुरावा असलेले लाचेचे पैसे उंदरांनी कुरतडले होते. परिणामी सबळ पुरावा नसल्याचे सांगत न्यायालयाने भ्रष्टाचार प्रकरणात दोषी ठरलेल्या एका महिलेला जामीन मंजूर केला आहे.

बिहारमध्ये बाल विकास कार्यक्रम अधिकारी म्हणून काम करणाऱ्या अरुणा कुमारी यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत लाच घेतल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले होते. त्यांच्यावर १०,००० रुपयांची लाच मागितल्याचा आरोप होता. पाटणा उच्च न्यायालयाने या महिलेला शिक्षा सुनावली होती.

◂(वृत्तसंस्था)

## 'लाडकी बहीण'साठी ३० एप्रिल अंतिम मुदत

### बँक खात्याची 'आधार सीडिंग' अनिवार्य

◆ **मुंबई, २५ एप्रिल**



'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेत असलेल्या महिलांसाठी एक अत्यंत महत्त्वाची सूचना प्रशासनाकडून देण्यात आली आहे. दरमहा मिळणाऱ्या १५०० रुपयांच्या लाभासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आता बंधनकारक करण्यात आले असून, यासाठी ३० एप्रिल ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली आहे. ज्या महिलांनी अद्याप ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही, त्यांनी तातडीने दखल घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच प्रामुख्याने ज्यांचे बँक खाते आधारशी जोडलेले नाही किंवा ज्यांच्या माहितीत तांत्रिक तफावत आहे, अशा महिलांना तत्काळ कार्यवाही करावी लागणार आहे.

योजनेच्या अंतर्गत अनेक महिलांच्या अर्जामध्ये काही तांत्रिक त्रुटी आहेत किंवा त्यांची केवायसी प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. प्रशासनाच्या कठोर निर्णयानुसार, ३० एप्रिलपर्यंत संबंधित त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या महिलांना या योजनेसाठी 'अपात्र' ठरवले जाण्याची शक्यता आहे. एकदा का लाभार्थ्यांची यादी अंतिम झाली आणि नाव वगळले गेले, तर त्यांना पुन्हा योजनेचा लाभ मिळणे कठीण होऊ शकते. त्यामुळे या शेवटच्या संधीचा लाभ घेणे आवश्यक आहे. शासनाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाची गांभीर्याने दखल घेऊन, पात्र महिलांनी आपल्या अर्जातील त्रुटी दूर कराव्यात, जेणेकरून कोणत्याही व्यत्ययाशिवाय त्यांना योजनेचा लाभ सुरू राहील. वेळेत पावले उचलल्यास हक्काचे १५०० रुपये कायम राहतील, याची लाभार्थी महिलांनी नोंद घ्यावी.

◂(वृत्तसंस्था)

# शिवरत्न बंगल्यावर पाणंद रस्त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी बैठक

**अधिकारी व शेतकरी यांची उपस्थिती; पाच तालुक्यातील समस्यांवर चर्चा**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २५ एप्रिल -**



आपल्या शेतातून रस्ता द्यायला शेतकरी तयार होत नाहीत. रस्ता दिला तर भूमी अभिलेख खात्याकडे रस्ता मोजणी करायला कर्मचारी, अधिकारी नाहीत. स्थळ पाहणी करायला तहसीलदारांकडे वेळ नाही अशा अनंत अडचणीमध्ये गावोगावचे रस्ते धूळ खात पडले आहेत. प्रांत, तहसीलदार, पंचायत समिती, बांधकाम, भूमी अभिलेख यांच्याकडे हेलपाटे करून शेतकरी दमले आहेत. रस्त्यांसाठी दररोज मारामाऱ्या होत आहेत. कोर्ट कचेऱ्या होत आहेत. अशा अनेक तक्रारी माढा, करमाळा, पंढरपूर, सांगोला व माळशिरस तालुक्याच्या शेतकऱ्यांनी शिवरत्न बंगल्यावर नेते व अधिकाऱ्यांपुढे मांडल्या.

जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर यांच्या अध्यक्षतेखाली आज पाच तालुक्यातील शीव व पाणंद रस्त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी अधिकारी व शेतकरी यांची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीला प्रांत कार्यालयाचे अधिकारी, बीडीओ, नायब तहसीलदार, बांधकाम अभियंता, महावितरणचे अधिकारी, मदनसिंह मोहिते पाटील, पं. स. सभापती दत्ता मगर, अर्जुनसिंह मोहिते पाटील, नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, पाच तालुक्यातील स्थानिक नेते मंडळी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. १ कि मी. रत्यासाठी सरकार १५ लाख रुपये धखर्च देत आहे. ग्राम सभेच्या ठरावानुसार पाणंद रस्त्याचे प्रस्ताव आम्ही मान्य करतोय. त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांचे संमती पत्र लागत नसल्याची माहिती नायब तहसीलदार यांनी दिली. तर भूमी अभिलेख खात्याकडे कर्मचारी अपुरे आहेत. तरीही अर्जंट मोजणीसाठी पैसे भरून घेतात. माणसेच नसतील तर मोजणी करणार कशी असा प्रश्न खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी अधिकाऱ्यांना विचारला. नगरपालिका, नगरपरिषद हद्दीतील पाणंद रस्त्याना अनुदान मिळणार नसल्याची बीडीओ दादासाहेब पांढरे यांनी सांगितले. महसूली अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या रस्त्याच्या समस्या वेळेवर सोडवाव्यात. त्यांना हेलपाटे देऊ नयेत. जिथे अडचणी असतील तिथे अधिकाऱ्यांनी समक्ष जावे व रस्त्यांची भांडणे शेतकऱ्यांनी आपापसात समजूतीने मिटवल्यास अनेक समस्या सुटतील. तसेच सर्वांनी एसआयआर मध्ये आपल्या नावाची नोंदणी बीएलओ कडे करावी, असे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील म्हणाले.

#### शक्तिपीठमध्ये एजंटगिरी सुरु : खा. धैर्यशील मोहिते-पाटील

माढा मतदार संघातून जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गबद्दल अनेकांनी अनेक अफवा उडवायला सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण करून अनेक एजंट आपला डाव साधू लागलेत. तर अनेकांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी शेतकऱ्यांना आपल्या शेतात फळ पिके लावण्यास सांगितले आहे. अनेक ठिकाणी अर्धवट माहितीच्या आधारे आंदोलन, मोर्चे सुरु आहेत. शेतकऱ्यांनी या एजंटावरती किंवा भुलथापा मारणाऱ्यांवरती विश्वास ठेऊ नये. लवकरच शक्तिपीठ महामार्गबद्दल अधिकारी व शेतकरी यांची बैठक आयोजित करणार असल्याचे खा. धैर्यशील माहिते-पाटील म्हणाले.

#### रस्ते अडवणाऱ्यांवर होणार कारवाई : आ. जानकर

पाणंद रस्ते मुद्दाम अडवणाऱ्या शेतकऱ्यांवर सरकार कारवाई करणार आहे. त्यांचे आधारकार्ड पाच वर्षासाठी बंद केले जाणार आहे. आधार कार्ड बंद केल्यानंतर त्यांचे सर्व व्यवहार अडचणीत येतील. म्हणून कोणत्याही शेतकऱ्याने पाणंद रस्ते अडवू नये.

## वृद्ध कलावंतांच्या मानधनाचा मार्ग मोकळा

◆ **मुंबई, २५ एप्रिल**

राज्यातील वृद्ध कलावंतांना मानधन मिळण्यात अडथळा ठरत असलेल्या 'आधार पडताळणी' प्रक्रियेची गळचेपी तातडीने दूर करण्याचे स्पष्ट निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले आहेत. वृद्ध कलावंतांना हक्काचे मानधन वेळेत मिळावे, यासाठी प्रशासनाने तत्परता दाखवावी, अशी ताकीद त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिली आहे.

प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीमध्ये आयोजित आढावा बैठकीत मंत्री ॲड. शेलार यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांतील आधार सेवा आणि कलावंतांच्या मानधनाबाबतचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जालना, लातूर, परभणी, बुलढाणा आणि मुंबई उपनगर या जिल्ह्यांमध्ये वृद्ध कलावंतांच्या आधार पडताळणीची कामे प्रलंबित असल्याचा प्रकार समोर आला. यावर तीव्र नाराजी व्यक्त करत, जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करून पात्र कलावंतांना मानधनाचे वाटप करावे, असे आदेश त्यांनी दिले.

**'आपले सरकार' सेवा केंद्रे कार्यान्वित करा**

राज्यातील जी 'आपले सरकार सेवा केंद्रे' सध्या निष्क्रिय आहेत, तिथे कोणतेही व्यवहार होत नसतील, तर अशा सर्व केंद्रांची तातडीने तपासणी करण्याचे निर्देशही मंत्री ॲड. शेलार यांनी दिले आहेत.

◂(वृत्तसंस्था)

## विनोदवीर राज शर्मा यांचे निधन

◆ **मुंबई, २५ एप्रिल**



प्रसिद्ध कॉमेडियन राज शर्मा यांचे २४ एप्रिलला वयाच्या ५० व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी त्यांनी कार्यक्रम सादर केलेल्या एका कॉमेडी क्लबने दिली. अभिनेता-कॉमेडियन वीर दासने आता इंस्टाग्रामवर एक भावनिक पोस्ट शेअर करून आपले मित्र राज यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. राज यांच्या मृत्यूचे कारण अद्याप अज्ञात आहे, परंतु ते रुग्णालयातून इंस्टाग्रामवर फोटो पोस्ट करत होते. त्यांची शेवटची पोस्ट ७ एप्रिल २०२६ रोजीची होती.

◂(तभा वृत्तसेवा)



आमच्या संपर्कात कुणीही नाही हे आम्ही नाकारत नाही. परंतु योग्य निर्णय केव्हा घ्यायचा, हा सर्व भाग जो आहे तो एकनाथ शिंदे साहेबांकडे आहे. त्यावेळी महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा राजकीय भूकंप निश्चितपणे होईल.
**संजय शिरसाट**, मंत्री


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

रविवार, २६ एप्रिल २०२६ ३




जो माणूस मराठी भाषेला विरोध करतो त्याच्यावर काही कारवाई करण्यात येत नाही. उलट त्याला सुरक्षा देत वापस पाठवतात. आणि मराठी मुलांना जेलमध्ये टाकतात? हे नक्की बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांचे सरकार आहे का?
**संदीप देशपांडे**, मनसे नेते

# जिल्ह्यातील राजकीय सत्तास्थाने बदलताहेत!


## ● सोलापूर शहर व जिल्ह्यावर मजबूत राजकीय पकड असलेली राष्ट्रवादी अन् काँग्रेस काही वर्षात बॅकफूटवर

## ● पालकमंत्र्यांसह भाजपाच्या नेत्यांचा वरचष्मा तर आता भाजपाचे लक्ष असणार जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर

**काही वर्षापूर्वी सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या राजकारणावर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची मजबूत पकड होती. विशेषता वर्षेनुवर्षे सोलापूर शहर व जिल्ह्यातील खासदार, आमदार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसह सहकार क्षेत्रावर दोन्ही काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व होते. भाजपा हा केवळ शहर व जिल्ह्यातील काही भागातच नाममात्र असल्याचे चित्र होते. सोलापूर शहर व जिल्ह्यात दोन्ही काँग्रेसचे दिग्गज नेते होते. इतकेच काय तर एककाळ असा होता की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री एकाचवेळी सोलापूरचे दोन सुपूत्र विराजमान होते. केंद्रीय मंत्रिमंडळात देखील सोलापूरच्या नेतृत्वाला सातत्याने स्थान होते. तर राज्याच्या मंत्रिमंडळात सोलापूरचा प्रतिनिधी नाही, असा प्रसंग क्वचितच होता. दरम्यान २०१४ साली देशात आलेल्या मोदी लाटेने सोलापूर शहर व जिल्ह्याचे राजकारण पुरते बदलून गेले. देश व राज्यात मोठ्या प्रमाणात राजकीय यश मिळवत असलेल्या भाजपाची दोन्ही काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांना भुरळ पडली. दोन्ही काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांनी आपापल्या पक्षांना सोडचिठ्ठी देत भाजपाचा रस्ता धरला. या नेत्यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी सोडण्यामागे केवळ भाजपाच्या सत्तेची भुरळच नव्हती तर त्यांच्याच पक्षातील अंतर्गत वादामुळेही हे नेते वैतागलेले होते. पक्षातंर्गत वाद आणि राजकीय अस्तित्व कायम राखण्यासाठी अनेकांनी दोन्ही काँग्रेसला रामराम ठोकल्याने सोलापूरची राजकीय सत्तास्थाने बदलण्यास वाव मिळाला.**




प्रशांत माने
मो.९८८११९१४४३

काही वर्षापूर्वी सोलापुरात ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, विजयसिंह मोहिते-पाटील यांच्यासह पंढरपूरला परिचारक, माढ्याला शिंदे बंधू, करमाळ्यात जगताप, बागल, मोहोळमध्ये पाटील, बार्शीला सोपल, मंगळवेढ्याला ढोबळे, अक्कलकोटला म्हेत्रे, दक्षिण सोलापूरला देवकते, उत्तर सोलापूरला माने तर सांगोल्याला शेकापचे देशमुख दोन्ही काँग्रेसच्या या दिग्गज नेत्यांनी सोलापूर शहर व जिल्ह्याचे राजकारण व्यापून टाकले होते. सोलापूर शहर व जिल्ह्यातील खासदारकी, आमदारकी, महापालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषदा आदी सोलापूरच्या स्थानिक स्वराज्य संस्थासह सहकारी संस्थादेखील यांच्याच ताब्यात होत्या. जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक, जिल्हा दूध संघ, जिल्हा लेबर फेडरेशन, जिल्ह्यातील बाजार समित्या, सहकारी सोसायट्या आदी सर्वत्र दोन्ही काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांचेच एकहाती प्राबल्य होते.

सोलापूर शहराचे नाव निघाले की सुशीलकुमार शिंदे यांचे नावा प्रामुख्याने उच्चारले जायचे. तसे माळशिरस तालुक्यातील अकलूज मोहिते-पाटील यांच्याच नावाने आजही ओळखले जाते. सांगोल्याचे नाव निघाले की स्व. गणपतराव देशमुख, साळुंखे, पाटील यांचे नाव समोर यायचे. पंढरपूर परिचारक कुटुंब, भालके यांच्यामुळे चर्चेत असायचा. मंगळवेढ्यात लक्ष्मण ढोबळे, आवताडे यांच्या नावाने बोलबाला होता. माढ्याला बबनदादा शिंदे बंधूचे, धनाजी साठे यांचे वर्चस्व होते. करमाळ्यात जगताप, बागल, सावंत कुटुंब राजकारणात वरचढ होते. बार्शीत दिलीप सोपल आणि राजेंद्र राऊत यांच्यात प्रमुख राजकीय खेळ सुरु आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात स्व. आनंदराव देवकते, शिवदारे, दिलीप माने यांचे राजकारण तैनात होते.

सोलापूर शहरात काँग्रेसची मजबूत पकड होती. येथील खासदार, आमदार आणि महापालिकेवर काँग्रेसचे म्हणजे पर्यायाने शिंदे, सादूल, चाकोते, यलगुलवार, कोठे परिवाराचे राजकारण चालत होते. शहरातील शहर उत्तर विधानसभा मतदार संघ हा भाजपाचा बालेकिल्ला मानला जातो पण तिथेही एकेकाळी काँग्रेसचेच वर्चस्व होते.

दरम्यान २०१४ साली देशात नरेंद्र मोदी नावाची लाट नव्हे स्तुनामी आली आणि दोन्ही काँग्रेसला ओहोटी लागली. जिल्ह्यात बलाढ्य असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला पक्षातंर्गत वादाचे लागलेले ग्रहण आणखी गडद झाले. दिग्गज मोहिते-पाटील कुटुंबासह परिचारक, बागल, सोपल, शिंदे यांच्यासह अनेकांनी भाजपाची वाट धरली. इतकेच काय राष्ट्रवादी निष्ठावंत असलेले मोहोळच्या पाटलांनीही नुकतेच भाजपाशी घरोबा केला. सांगोल्याच्या शहाजीबापूंनी शिवसेना तर दिपकआबा साळुंखेंनी सातत्याने पक्ष बदल केला. मंगळवेढ्याचे आवताडे, ढोबळे यांनीही भाजपाशी घरोबा केला. अक्कलकोटच्या सिध्दाराम म्हेत्रेंनी शिवसेनेचे धनुष्य हाती घेतले तर दक्षिणच्या दिलीप मानेंनी कमळाशी मैत्री केली. काठे परिवाराने देखील काँग्रेसशी फारकत घेत शिवसेना, राष्ट्रवादी असा प्रवास करत आता कमळ घट्ट हातात पकडले आहे.

अनेक राजकीय दिग्गजांनी दोन्ही राष्ट्रवादी सोडल्यामुळे सोलापूर शहर व जिल्ह्यात भाजपाची ताकत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तर भाजपासोबत आलेल्या मोहिते-पाटलांनी पुन्हा शरद राष्ट्रवादीसोबत हात मिळवल्याने माढ्याची खासदारकी भाजपाला गमवावी लागली. सोलापूरची खासदारकी काँग्रेसनी राखली असली तरी जिल्ह्यात काँग्रेसला एकही आमदारकी राखता आली नाही. शरद राष्ट्रवादीने मात्र चार आमदार विजयी केले.

आता सोलापूरच्या राजकारणाला मोठी कलाटणी मिळाली आहे. सोलापूरच्या राजकारणात मूळचे सोलापूरचे नसलेले पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे वर्चस्वी निर्माण झाले आहे. तर अक्कलकोटचे सचिन कल्याणशेट्टी, शहर मध्यचे देवेंद्र कोठे यांच्या हाती भाजपाची सत्तास्थाने गेली आहेत. सोलापूर महापालिकेवर कोठेंचे वर्चस्व पुन्हा एकदा निर्माण झाले आहे तर जिल्हा परिषदेवर भाजपाची सत्ता पहिल्यांदाचा स्थापन झाली आहे. अकलूजचे शिवरत्न आणि सोलापूरचे जनवास्तल्य या दोन्ही काँग्रेसच्या राजकीय केंद्रबिंदूकडे असलेले सत्तास्थान आता बदलत्या राजकारणामुळे बदललेले आहे. सोलापुरात राजकीय वर्चस्व मिळवल्यानंतर आता भाजपाचे पालकमंत्री व नेत्यांचे लक्ष जिल्ह्यातील सहकार क्षेत्र काबीज करण्यावर केंद्रीत असणार आहे.

# युक्रेनच्या आडून रशियाविरुद्ध युद्ध

## परराष्ट्र मंत्री सर्गेई यांचा युरोपियन देशांवर हल्लाबोल

◆ **मॉस्को, २५ एप्रिल**

अमेरिका आणि पाश्चात्य देश युक्रेनला आघाडी बनवून रशियाविरुद्ध उघड युद्ध पुकारत आहेत. युरोपियन देशाच्या मदतीशिवाय युक्रेन युद्धाच्या रणांगणात टिकाव धरू शकत नाही, असा आरोप रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी केला आहे.



रशियन स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींसोबतच्या बैठकीदरम्यान लावरोव्ह म्हणाले, अमेरिका आणि त्यांचे मित्र देश युक्रेनला आघाडी बनवून रशियाला कमकुवत करण्याचे धोरण अवलंबत आहे. युरोपियन देशांकडून युक्रेनला शस्त्रास्त्रे, गुप्तचर यंत्रणा, उपग्रह प्रणाली, लष्करी प्रशिक्षण आणि आर्थिक मदत होत आहे. रशियाविरुद्धचा हा संघर्ष आता केवळ एक गुप्त मोहीम न राहता, एक उघड आणि संघटित मोहीम बनला आहे. युक्रेन पाश्चात्य देशांसाठी वेळकाढूपणा करण्याचे एक साधन बनले आहे. युरोपची सध्याची धोरणे जागतिक अस्थिरता वाढवत आहेत. पाश्चात्य शक्ती युक्रेनला एका मोठ्या संघर्षाचे केंद्र बनवण्याचा प्रयत्न करत आहेत, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

### धार्मिक मुद्यावरून टीका

लावरोव्ह यांनी धार्मिक मुद्यांवरून पाश्चात्य देश आणि युक्रेनवर टीका करताना म्हटले की, युक्रेनमधील युक्रेनियन ऑर्थोडॉक्स चर्चविरुद्ध अनेक वर्षांपासून कारवाया सुरू आहेत. चर्च ताब्यात घेणे, तोडफोड आणि धर्मगुरू व उपासकांवर हल्ले केले जात आहे. अनेक वरिष्ठ धार्मिक नेत्यांसह १८० हून अधिक जणांवर फौजदारी खटले दाखल करण्यात आले. ■

### अमेरिकेचा परकीय देशात हस्तक्षेप अमान्य

अमेरिका लोकशाही किंवा सुरक्षेच्या नावाखाली जगभरातील अनेक देशांमध्ये हस्तक्षेप करत आहे. यामागे नैसर्गिक संसाधने, विशेषतः तेल आणि ऊर्जा बाजारपेठांवर नियंत्रण मिळवणे हा खरा उद्देश आहे. इराण आणि व्हेनेझुएलाची उदाहरणे देत ते म्हणाले की, वॉशिंग्टन आपल्या सामरिक गरजा पूर्ण करण्यासाठी सरकार बदलण्यासही मागेपुढे पाहत नाही. आंतरराष्ट्रीय कायद्याची ताकद कमकुवत होत आहे आणि जग बळाचा वापर करूनच न्याय या तत्त्वाकडे वाटचाल करत आहे. ◂(वृत्तसंस्था)





संसदेत महिला आरक्षण विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांच्या कृतीचा निषेध करण्यासाठी शनिवारी रांची(झारखंड) येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोर्चा काढण्यात आला

# अनुसूचित जाती आरक्षणाअंतर्गत वर्गीकरणाला कर्नाटकात मंजुरी

**बंगळूरू, २५ एप्रिल**

कर्नाटक सरकारने अनुसूचित जातींसाठी असलेल्या आरक्षण व्यवस्थेत मोठा आणि ऐतिहासिक बदल करत अंतर्गत वर्गीकरणाला मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या नव्या आराखड्यावर एकमताने निर्णय घेण्यात आला असून राज्यातील आरक्षण धोरणात हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या निर्णयानुसार अनुसूचित जातींसाठी असलेल्या एकूण १५ टक्के आरक्षणाचे तीन स्वतंत्र गटांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. पहिल्या गटासाठी ५.२५ टक्के आरक्षण निश्चित करण्यात आले असून या गटात मादिगा आणि संबंधित समुदायांचा समावेश असेल. दुसऱ्या गटासाठीही ५.२५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले असून यात होलेया आणि संबंधित समुदायांचा समावेश करण्यात आला आहे. तिसऱ्या गटासाठी ४.५ टक्के आरक्षण निश्चित करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

# दीड हजार उन्हाळी विशेष गाड्या धावणार

◆ **नवी दिल्ली, २५ एप्रिल**

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये होणारी प्रवाशांची मोठी गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. दिल्लीहून उत्तर प्रदेश आणि बिहारकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी तब्बल दीड हजारांहून अधिक उन्हाळी विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत. यामुळे लाखो प्रवाशांना प्रवासात मोठा दिलासा मिळणार आहे.

उत्तर रेल्वेकडून मिळालेल्या माहितीनुसार, एकूण सुमारे अठराशे विशेष गाड्या उन्हाळ्यात चालवल्या जाणार आहेत. यापैकी बहुतांश गाड्या उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांकडे धावतील. सुटी काळात घरी जाणाऱ्या प्रवाशांना तिकीट मिळणे आणि प्रवासात होणारी अडचण कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या विशेष गाड्यांमुळे प्रवाशांसाठी मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त आसन व्यवस्था उपलब्ध होणार आहे. अंदाजे साडेतीन लाखांहून अधिक अतिरिक्त जागा निर्माण होतील. रेल्वे अधिकाऱ्यांच्या मते, गरज भासल्यास पुढील काही दिवसांत आणखी गाड्यांची संख्या वाढवली जाऊ शकते. दिल्लीहून लखनौ, वाराणसी, दानापूर, दरभंगा, बरौनी, सुपौल आणि गया यांसारख्या प्रमुख मार्गांवर या विशेष गाड्या सर्वाधिक प्रमाणात धावणार आहेत. काही मार्गांवर शंभराहून अधिक फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे, तर काही महत्त्वाच्या मार्गांवरही मोठ्या प्रमाणात गाड्या धावतील. रेल्वे प्रशासनाने केवळ उत्तर प्रदेश आणि बिहारच नव्हे तर इतर राज्यांतील प्रवाशांचाही विचार केला आहे. पश्चिम बंगालमधील निवडणूक काळातील प्रवास लक्षात घेऊन तसेच श्री माता वैष्णो देवी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठीही विशेष गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# नीती आयोगात बंगालचा प्रभाव वाढला

### लाहिरी उपाध्यक्ष, गोवर्धन दास सदस्य

◆ **नवी दिल्ली, २५ एप्रिल**

देशाच्या धोरणनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या नीती आयोगात पश्चिम बंगालमधील दोन नामवंत व्यक्तींची निवड करण्यात आली आहे. प्रख्यात अर्थतज्ज्ञ अशोक लाहिरी यांची आयोगाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात येणार असून, शास्त्रज्ञ गोवर्धन दास यांची सदस्य म्हणून निवड झाली आहे.

अशोक लाहिरी हे देशातील अत्यंत अनुभवी अर्थशास्त्रज्ञांपैकी एक मानले जातात. त्यांनी अनेक दशकांपासून धोरणनिर्मितीच्या क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केली आहे. माजी मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून काम करताना त्यांनी देशाच्या आर्थिक धोरणांमध्ये मोठे योगदान दिले आहे. कोलकात्याच्या बौद्धिक परंपरेशी जोडलेले लाहिरी हे देशातील अर्थनीती क्षेत्रातील एक महत्त्वाचे नाव मानले जाते. नीती आयोगाच्या नव्या सदस्यपदी निवड झालेले गोवर्धन दास हे आण्विक विज्ञान क्षेत्रातील प्रसिद्ध संशोधक आहेत. रोगप्रतिकारशक्ती, संसर्गजन्य आजार आणि पेशीजीवशास्त्र या क्षेत्रांतील त्यांच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे.

क्षयरोगाच्या रोगनिर्मिती प्रक्रियेवरील त्यांच्या अभ्यासामुळे त्यांना विशेष ओळख मिळाली. त्यांनी येल विद्यापीठ, ह्यूस्टन येथील प्रसिद्ध रुग्णालय तसेच दक्षिण आफ्रिकेतील क्वाझुलू नताल विद्यापीठ आणि राष्ट्रीय संशोधन संस्था यांसारख्या ठिकाणीही काम केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सोनमने जारी केला दुसऱ्या बाळाचा पहिला फोटो



मुंबई : बॉलिवूड अभिनेत्री सोनम कपूरने तिच्या दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर काही आठवड्यांनी सोशल मीडियावर फोटोंचा एक संग्रह शेअर केला आहे. यात तिच्या नवजात मुलाचा फोटो देखील समाविष्ट आहे. याला ती प्रेमाने माय थ्री (माझे तीन) म्हणत आहे. यात तिचा मोठा मुलगा वायू, पती आनंद आहुजा आणि तिचा नवजात बाळाची झलक दिसते आहे. एका फोटोत सोनम तिचा मोठा मुलगा वायू सोबत नाश्ता करताना दिसत आहे, तर दुसऱ्या फोटोत आनंदने त्याच्या धाकट्या मुलाला कडेवर घेतले आहे. एका फोटोत वायू त्याच्या धाकट्या भावाच्या पाळण्यात डोकावताना दिसत आहे. फोटो शेअर करताना सोनम कपूरने जीवन एक स्वप्न आहे... हा महिना आतापर्यंत खूप चांगला राहिला. विश्वाचे आभार. माय थ्री, असे लिहीले आहे. ■

# 'जेन-झी'चा राघव चड्ढांवर 'डिजिटल स्ट्राईक'

## २४ तासात ११ लाखांवर तरुणांनी केले अनफॉलो

◆ **नवी दिल्ली, २५ एप्रिल**

भारतीय राजकारणात शुक्रवारी एक मोठा राजकीय भूकंप झाला. आम आदमी पार्टीचे नेते राघव चड्ढा यांच्यासह आपच्या सात राज्यसभा खासदार भाजपात प्रवेश केला. मात्र, समर्थकांना चड्ढा यांचा पक्ष बदलण्याचा निर्णय पटलेला नाही, असे दिसत आहे. भाजपात सामील झाल्यानंतर चड्ढा यांना सोशल मीडियावर चांगलाच फटका बसला आहे.

चड्ढा यांनी पक्ष फोडाफोडी करत भाजपात जाण्याचा घेतलेला निर्णय देशातील 'जेन-झी'ला म्हणजेच तरुणाईला आवडला नसल्याचे दिसून येत आहे. आकडेवारीनुसार पक्ष बदलल्यानंतर राघव चड्ढा यांचे २४ तासांच्या आत सुमारे ११ लाखांपेक्षा अधिक इंस्टाग्राम फॉलोअर्सने त्यांना अनफॉलो करत त्यांचा नाद सोडला आहे. वृत्तानुसार, राघव चड्ढा यांचे शुक्रवारी १.४६ कोटी इंस्टाग्राम फॉलोअर्स होते. शनिवारी दुपारी २ वाजेपर्यंत ते १.३५ कोटींच्या आत आले आहे. चड्ढा यांच्या निर्णयावर हा देशातील 'जेन-झी'चा राघव चड्ढांवर डिजिटल स्ट्राईक मानला जात आहे.



राघव चड्ढा पक्षांच्या अजेंड्यापासून फारकत घेत सोयीचे राजकारण करताना संसदेत तुलनेत सौम्य मुद्यांवर आवाज उठवला होता. यामध्ये निवडणूक लढवण्याचे वय २५ वरून २१ करणे, डेटा एक्स्पायरी कॅरी फॉरवर्ड, डेटा ट्रान्सफर सुविधा, रिचार्ज सायकलचा स्कॅम, रिचार्ज संपल्यावर कंपन्या तत्काळ इन्कमिंग सेवा बंद करणे आदी मुद्दे होते. तसेच शिक्षण आणि रोजगार यातील तफावत, पॅटर्निटी लीव्हची मागणी, स्पर्धा परीक्षांचे शुल्क आणि पारदर्शकता तसेच डिजिटल कंटेंट क्रिएटर्सची सुरक्षा आदी मुद्दे मांडले होते. पक्षाला या मुद्यांवरून फारसं हाती लागलं नाही. मात्र, तरुणाईला हे मुद्दे आपले वाटल्याने सोशल मीडियात त्यांची क्रेझ झाली होती. परंतु, राघव चड्ढा यांनी या मुद्यांमागून केलेला राजकीय खेळी तरुणाईला आवडली नसल्याचे दिसून येत आहे. ◂(वृत्तसंस्था)

### 'रात्रभरात हिरो टू झिरो'

इंस्टाग्रामवर तरुणाई राघव चड्ढा यांची साथ सोडत आहे. 'जेन-झी'च्या अनफॉलो मोहिमेमुळे चड्ढांनी २४ तासांत सुमारे ११ लाख फॉलोअर्स गमावले आहेत. जर सोशल मीडिया तुम्हाला रातोरात हिरो बनवत असेल तर रातोरात झिरोही बनवू शकतो, हे याचे उदाहरण आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिश गावंडे यांनी व्यक्त केले. ■

# काँग्रेस पवन खेडांच्या पाठीशी

◆ **नवी दिल्ली, २५ एप्रिल**

काँग्रेस प्रवक्ते पवन खेडा अटकपूर्व जामिनासाठी देशभरातील न्यायालयांमध्ये भटकत असले तरी, त्यांचा पक्ष काँग्रेस त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. गुवाहाटी उच्च न्यायालयाने शुक्रवारी खेडा यांचा अटकपूर्व जामिनाचा अर्ज फेटाळल्यानंतर काँग्रेसचे राज्यसभा खासदार आणि सरचिटणीस जयराम रमेश यांनी शनिवारी एका सोशल मीडिया पोस्टद्वारे ही माहिती दिली. काँग्रेस पवन खेडा यांच्यासाठी सर्वोच्च न्यायालयात जाणार आहे.

काँग्रेस सरचिटणीस जयराम पुढे म्हणाले, खेडा यांच्या बचावासाठी आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाण्याची तयारी करीत आहोत.

खेडा यांना न्याय मिळवून देण्यात आपण यशस्वी होऊ, असा विश्वास काँग्रेसला आहे. संपूर्ण भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, पक्षाचे माध्यम आणि प्रसिद्धी विभागांचे अध्यक्ष हे पवन खेडा यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.

काँग्रेस सरचिटणीस जयराम पुढे म्हणाले, सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांना धमकावने, दबाव टाकणे, भीती निर्माण करणे आणि छळणे, असा सुडबुद्धीच्या राजकारणात आम्हाला सर्वोच्च न्यायालयाकडून न्याय मिळेल, असा आमचा विश्वास आहे.

काँग्रेस नेते पवन खेडा यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिंकी भुनिया सरमा यांच्याकडे तीन विदेश पासपोर्ट आणि विदेशात मालमत्ता असल्याचा आरोप केला होता. ◂(वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



विशेष

वैजयंती प्रदीप वडनेरकर

# नारी ते नारायणी

**राष्ट्र सेविका समिती, विदर्भ प्रांत व श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने अमरावती येथे रविवार, २६ एप्रिल रोजी 'नारी ते नारायणी' विकसित भारत २०४७ या विषयावर प्रांतीय परिसंवाद आयोजिला आहे. त्यानिमित्त...**

**'यत्र नार्यन्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता।'**

अशी पुण्यभूमी, आध्यात्मिक शक्तीने युक्त अशी आमची भारत माता. तिच्या कुशीत आजपर्यंत अनेक कर्तृत्ववान, बुद्धिमान, शौर्यवान व प्रखर राष्ट्रभक्त नारीशक्तींनी जन्म घेऊन मां भारतीची कूस धन्य केलेली आहे. अशा पुण्यभूमीत देव-देवताही अवतार घेऊन आपला जन्म सार्थकी लावतात. अशी ही नारीशक्ती या समाजाची अर्धी शक्ती आहे. तिने सक्षम, समर्थ, संस्कारक्षम होऊन प्रकट दिव्यशक्तीतून विविध क्षेत्रांत आपल्या कर्तव्यदक्षतेने व विशेष कार्यपद्धतीने यशस्वीपणे पावले रोवून राष्ट्रविकासाच्या मार्गात आपल्या कार्यक्षमतेचा ठसा उमटविला आहे.

आज मातृशक्तीचे अभूतपूर्व कार्य, तिच्या अंगातील सप्तशक्तीचा शोध जरी आज लागल्यासारखा वाटत असला, तरी स्त्रीशक्तीचा साक्षात्कार झालेल्या वंदनीय मावशी उपाख्य वंदनीय लक्ष्मीबाई केळकर यांनी मातृशक्तीतील मातृत्व, कर्तृत्व व नेतृत्वाची शक्ती त्यांच्या स्त्रीशक्तीच्या सखोल अभ्यासाच्या चिंतन आणि मननातून जाणून घेतली. देवी अष्टभुजेचा अंश असणारी ही मातृशक्ती पारतंत्र्याच्या काळात अतिशय हतबल, असुरक्षित व आत्मशक्ती विस्मृत झालेली आणि अन्यायाची शिकार बनली होती. तिच्या सत्त्व, स्वाभिमान आणि अंगभूत शक्तीचा अपमान होत होता. पण पारतंत्र्याच्या काळात प्रवाहाच्या विरोधात खंबीरपणे उभे राहून स्त्रीशक्तीचे जागरण व संघटन करण्यासाठी कोणतेही खंबीर नेतृत्व उभे नव्हते. मातृशक्तीला जागृत करून तिचे संघटन करून तिला स्वसंरक्षणक्षम बनविण्याचे ध्येय समोर ठेवून आजपासून ९० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापक संचालिका वंदनीय मावशी केळकर; ज्यांच्या हृदयांत फक्त देश, धर्म, संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचेच संस्कार होते; त्यांनी २५ ऑक्टोबर १९३६ रोजी विजयादशमीच्या सुमुहूर्तावर नारीशक्तीच्या जगात समिती स्थापन करून एक अभूतपूर्व सीमोल्लंघन घडवून आणले. जे आज अखिल भारतीय स्तरावरच नव्हे, तर वैश्विक स्तरावर आपल्या विशेष कार्यपद्धतीने कार्यरत आहे आणि स्त्रीशक्तीसाठी वरदानसदृश ठरले आहे.

स्त्री स्वसंरक्षणक्षम व्हावी असा उद्देश समोर ठेवून प्रारंभ झालेले हे कार्य. वंदनीय मावशी म्हणत, 'स्व' मध्ये स्वतःचे संरक्षण एवढेच अभिप्रेत नाही, तर 'स्व'मध्ये ज्या ज्या गोष्टी अंतर्भूत आहेत, त्यांचे रक्षण करण्यासाठी स्त्रीने सामर्थ्यशाली बनून सुशीला व सुधीरा बनले पाहिजे. स्वतःचा परिवार, कुळाचार यासोबत स्वराष्ट्राची प्रतिष्ठा याचेही तिला रक्षण करता आले पाहिजे. स्वदेश, स्वधर्म, स्वसंस्कृती, स्वभाषा यासोबत 'सहा भ'चे सुद्धा संरक्षण



करण्यासाठी प्रत्येक स्त्रीने आपल्या मातृत्वभावाला जागृत करून आपल्या विशाल मातृहृदयातील प्रेम, सेवा, संस्कार आणि समरसतेच्या भावनेतून घर, समाज व राष्ट्रविकासात संघटित शक्तीच्या स्वरूपात योगदान देण्यासाठी तयार असले पाहिजे.

याच विचारातून समितीच्या कार्यपद्धती, आचारविचार व संस्कारांतून राष्ट्र सेविका घडू लागल्या. संघटनेच्या या कार्याला समर्पणाचा एक विलक्षण संस्कार लाभलेला आहे. वंदनीय मावशींच्या काळातच पुणे येथे वंदनीय ताई आपटे व भंडारा येथे मा. नानी कोलते यांनीही विचारातून कार्याला सुरुवात करून मुलींना दंड, लाठी-काठी स्वसंरक्षणाच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यास प्रारंभ केला होता.

वंदनीय मावशी म्हणत की, प्रत्येक घर एक विद्यालय असून त्याची आचार्या म्हणजे त्या घराची मातृशक्ती. जी सृजनशील असून नव्या पिढीची निर्मिती करते, पर्यायाने ती राष्ट्राची आधारशक्ती आहे. कारण वंदनीय मावशींनी मातृशक्तीला समाजरूपी रथाची सारथी म्हटले आहे श्रीकृष्णासारखी. कारण श्रीकृष्णाने गीतेच्या रूपात अर्जुनाला मार्गदर्शन करून जीवनाचा अर्थ, दिशा व ध्येय समजावून सांगितले. त्याचप्रमाणे स्त्रीनेही या समाजरूपी रथाची सारथी बनून व्यक्ती ते समाज आणि राष्ट्र या विकास प्रक्रियेत आपल्या राष्ट्रभक्तिपूर्ण आचारविचार, व्यवहार व संस्कारांतून निःस्वार्थपणे योगदान द्यायचे आहे. 'राष्ट्र सर्वोपरि' हा मंत्र जपत कृती व कार्य करायचे आहे.

८ मार्च आपण जागतिक महिला दिनानिमित्त नारीशक्ती गौरव दिन म्हणून साजरा करतो. वर्षभरातील तिच्या कर्तृत्वाचा गौरव करण्याचा हा सन्मानाचा दिवस आहे. नारी ही शक्तिरूपिणी, जगतजननी म्हणून कार्यरत असते. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी' अशी तिची महती राष्ट्रमाता जिजाऊंनी आपल्या मातृकर्तव्यातून सिद्ध केलेली आहे.

'गृहिणी गृहं उच्यते' ही तिची जबाबदारी! कन्या, भगिनी, पत्नी आणि अनंतकाळची माता अशा विविध भूमिका ती जीवनभर पार पाडत असते. ती कुटुंबव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. घराचा श्वास, प्राण आहे. तिच्या शक्तीच्या आधारावर संपूर्ण घर उभे असते. तिची स्वप्ने, भावना आणि आकांक्षांचे आकाश तिचे घरकूल असते. समर्पणभावातून ते उभे असते. 'नारी ते नारायणी' हा तिचा प्रवास तिच्या सुखी परिघातच घडत असतो. ती माउली असते सुख-दुःख, ऊन-पावसात माया-ममतेची आणि सन्मानाची शाल परिवाराभोवती गुंडाळणारी. एक पथदर्शी दीपस्तंभ बनून जीवनभर कुटुंबाची आधारशक्ती असणारी मातृशक्ती. याच मातृशक्तीसमोर समाज व राष्ट्रोन्नतीच्या विकासाचे विशाल आकाश समितीने आपल्या कार्य-विचार दर्शनातून उलगडून दिले आहे. एक नागरिक व राष्ट्रभक्त म्हणून मातृशक्तीला 'राष्ट्र सर्वोपरि' या यज्ञात स्वतःचे महत्त्वपूर्ण योगदान द्यायचे आहे.

समाजरूपी गरुड पक्षाचे स्त्री व पुरुष हे तुल्यबळ पंख आहेत. म्हणून राष्ट्ररूपी गरुडाला प्रगतीची झेप घेण्यासाठी दोन्हीही समान शक्तीने सक्षम असणे आवश्यक आहे. 'राष्ट्र प्रथम' या संस्कारात जीवनाची जडणघडण होणे आवश्यक आहे. हाच संस्कार समितीमध्ये नित्य शाखा, अभ्यासवर्ग व बैठकीतून केला जातो आणि राष्ट्र सेविका घडवल्या जातात.

आज ९० वर्षांच्या समितीच्या कार्यकाळात याच भावनेतून व संस्कारातून समर्पित व संस्कारित सेविका राष्ट्राच्या विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. राष्ट्रविकासाच्या विविध क्षेत्रांत नारीशक्तीने आपल्या कर्तृत्व, कर्तव्यबुद्धी आणि राष्ट्रभक्तीच्या माध्यमातून अतुलनीय ठसा उमटविला आहे.

श्रीकृष्णाने गीतेच्या दुसऱ्या अध्यायात विविध ठिकाणी असलेल्या आपल्या अस्तित्वाचे वर्णन करताना नारीशक्तीमध्ये त्यांचे अस्तित्व 'सप्तशक्ती'च्या रूपात असल्याचे सांगितले आहे.

**मंगला, नारायणी मा, सप्तशक्तिधारिणी,**
**जगत कारण मातृरूपा, प्रीतिशक्ती प्रदायिनी,**

श्री, कीर्ती, वाक्, स्मृती, मेधा, धृती, क्षमा! अशा या सप्तगुणांनी परिपूर्ण नारीशक्तीने आपल्या जीवनाचे राष्ट्रहितासाठी समर्पण करणे म्हणजेच नारीवंदन. सन्मानातून प्राप्त होणाऱ्या जबाबदाऱ्या व कर्तव्यधर्माचे पालन करणे हे तिचे पहिले कर्तव्य आहे. याचा पहिला परिणाम राष्ट्रोन्नतीवर होत असला, तरी त्याचा प्रमुख आधार म्हणजे कुटुंबव्यवस्था आणि त्यातून घडणारा सुसंस्कारित समाज. म्हणूनच आपण म्हणतो-

**'या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता,**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ।'**
**उंच भरारी घे आकाशी,**
**व्यापून टाक अंबर-धरती,**
**कर्तृत्वाची दिव्यशलाका,**
**उजळून टाकील दाही दिशा या।**
**सप्तशक्तीचा उंच झोका,**
**वेध घेईल भविष्याचा,**
**तिमिराकडून तेजाकडे,**
**प्रवास होईल नारीशक्तीचा।**
**सुकन्या तू या मायभूमीची,**
**होऊनी राष्ट्राची आधारशक्ती,**
**संघटित शक्तीतून होशील,**
**माँ भारतीची भाग्यविधाता**
**नारीशक्तीतुनी नारायणी माता,**
**नारीशक्तीतुनी नारायणी माता...**

यवतमाळ, ९५७९६०९९७५

दखल

डॉ. चंद्रशेखर जोशी

# भारतातील निरक्षरता

**भारताला स्वातंत्र्य मिळून पाऊण शतक झाले असून भारताने कृषीपासून अंतराळापर्यंत देदीप्यमान प्रगती केली आहे. भारताची अर्थव्यवस्था जगात चौथ्या क्रमांकावर असून तिसऱ्या क्रमांकावर येण्यासाठी सज्ज आहे. विज्ञान, व्यापार-उद्योग, संशोधन, अंतरिक्ष अशा विविध क्षेत्रांत प्रगती करणाऱ्या भारतात आजही निरक्षरता अनेक सामाजिक व आर्थिक समस्यांना जन्म देत आहे.**

निरक्षरता ही भारताच्या सामाजिक व शैक्षणिक विकासासमोर उभी असलेली एक गंभीर समस्या आहे. भारतातील निरक्षरता ही एक मोठी सामाजिक-आर्थिक समस्या असून २० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या अजूनही साक्षर नाही. प्रामुख्याने ग्रामीण भाग, महिला आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. आधुनिक युगात शिक्षणाला जीवनातील प्रगतीचे प्रमुख साधन मानले जाते. व्यक्तीच्या बौद्धिक, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी शिक्षण अत्यंत आवश्यक असते. तरीही भारतातील अनेक लोक आजही मूलभूत शिक्षणापासून वंचित आहेत. वाचता-लिहिता न येणे किंवा शिक्षणाचा प्राथमिक स्तरही पूर्ण न करणे याला निरक्षरता असे म्हणतात. भारत हा विविधतेने नटलेला विशाल देश आहे. येथे भौगोलिक, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीमध्ये मोठी विषमता आढळते. या विषमतेचा थेट परिणाम शिक्षणावर व समाज जीवनावर होतो. ग्रामीण भागात शाळांची कमतरता, शिक्षकांची अनुपलब्धता, शैक्षणिक साधनांची मर्यादा आणि दळणवळणाच्या अडचणी यामुळे अनेक मुले शिक्षणापासून दूर राहतात. काही ठिकाणी शाळा दूर अंतरावर असल्यामुळे विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळेत जाणे कठीण जाते.



**भारतातील निरक्षरतेची प्रमुख तथ्ये**

साक्षरता दर : २०२३-२४ च्या अहवालानुसार, भारताचा एकूण साक्षरता दर सुमारे ८०.९ टक्के आहे, ज्याचा अर्थ सुमारे २० टक्के लोकसंख्या अजूनही निरक्षर आहे.

लिंग असमानता : पुरुषांचा साक्षरता दर (सुमारे ८२ टक्के) महिलांच्या साक्षरता दरापेक्षा (सुमारे ६५ टक्के) लक्षणीयरीत्या जास्त आहे.

ग्रामीण-शहरी दरी : ग्रामीण भागात साक्षरता दर (७७ टक्के) शहरी भागाच्या (९० टक्के) तुलनेत कमी आहे.

सर्वाधिक निरक्षर प्रौढ : जगात सर्वाधिक निरक्षर प्रौढ लोकसंख्या भारतात आहे; विशेषतः ५० वर्षांवरील लोकांमध्ये.

राज्यवार फरक : केरळसारखी राज्ये सर्वोच्च साक्षरता दरावर असताना बिहारसारखी राज्ये सर्वांत मागे आहेत.

**निरक्षरतेची कारणे**

गरिबी : गरिबीचे दुष्टचक्र हे निरक्षरतेचे प्रमुख कारण मानले जाते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना मुलांना शाळेत पाठविणे शक्य होत नाही. त्याऐवजी मुलांना लहान वयातच कामावर पाठविले जाते, ज्यामुळे बालमजुरी वाढते आणि शिक्षण खंडित होते. पालक स्वतः अशिक्षित असल्यास शिक्षणाचे महत्त्व त्यांना पुरेसे जाणवत नाही. परिणामी मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होते.

शैक्षणिक पायाभूत सुविधांचा अभाव : ग्रामीण भागात शाळा, शिक्षक आणि शालेय साहित्याची कमतरता.

सामाजिक आणि सांस्कृतिक घटक : महिला शिक्षणाकडे दुर्लक्ष व महिलांमधील निरक्षरता ही आणखी एक चिंताजनक बाब आहे. काही पारंपरिक समजुती आणि सामाजिक प्रथा यांमुळे मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जात नाही. लवकर लग्न, घरगुती जबाबदाऱ्या आणि सुरक्षिततेच्या समस्या यांमुळे अनेक मुली शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत. त्यामुळे समाजातील स्त्री-पुरुष समानतेवरही परिणाम होतो.

लोकसंख्येची झपाट्याने वाढ : भारतातील लोकसंख्येची वाढ आजही चिंतेचा विषय आहे. लोकसंख्येच्या वाढीच्या वेगाने शैक्षणिक सुविधा वाढत नाहीत. त्यामुळे शाळांची, शिक्षकांची, शैक्षणिक साधनांची संख्या मर्यादित राहते.

स्थलांतरित मजुरांची मुले : शेती, उद्योग व व्यापार यातून स्थलांतरित होणाऱ्या मजुरांची मुले शिक्षणाच्या संधीपासून दूर राहतात. त्यामुळे त्यांचे शिक्षण होत नाही व ते निरक्षर राहतात. अलिकडे काही सामाजिक संस्था अशा मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करताना आढळतात. मात्र त्याचे प्रमाण खूप अल्प आहे.

**निरक्षरतेचे परिणाम**

बेरोजगारी व गरिबी : निरक्षरतेचे परिणाम व्यक्ती आणि समाज या दोघांवरही गंभीर स्वरूपाचे असतात. निरक्षर व्यक्तींना योग्य रोजगार मिळणे कठीण जाते व रोजगार मिळाला तरी हलक्या स्वरूपाचा व कमी वेतनाचे काम मिळते आणि गरिबीचे दुष्टचक्र कायम राहते. निरक्षरतेमुळे आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, शासनाच्या योजना आणि नागरिकांचे हक्क यांविषयीची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. लोकशाही प्रक्रियेत जसे मतदान, सामाजिक सहभाग आणि निर्णयक्षमतेमध्येही त्यांचा सहभाग मर्यादित राहतो. यामुळे राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीला अडथळे निर्माण होतात.

लोकसंख्या नियंत्रणाच्या उपायांकडे दुर्लक्ष : निरक्षरतेमुळे समाजातील आपल्या कुटुंबातील महत्त्वाची भूमिका व महत्त्व लक्षात न आल्याने लोकसंख्या नियंत्रणाच्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे कुटुंब नियोजनाच्या साधनांचे महत्त्वही त्यांना कळत नाही; यातून लोकसंख्या वाढीचा वेग नियंत्रणात येत नाही.

अंधश्रद्धा व गैरसमज : समाजात अंधश्रद्धा वाढीला लागण्याचे निरक्षरता हे प्रमुख कारण आहे. आजारपणामध्ये वैद्यकीय उपचार न करता बुवाबाजीच्या चक्रात निरक्षर अडकतात. यातून समाजाचा ऱ्हास होतो.

गुन्हेगारी व सामाजिक असंतोष : निरक्षरतेमुळे उत्पन्नाची कमतरता व कायदेशीर ज्ञानाचा अभाव यातून सामाजिक असंतोष व किरकोळ प्रमाणात गुन्हेगारी वाढण्याची भीती असते.

**भारतातील निरक्षरता कमी करण्यासाठी उपाय**

भारताने निरक्षरता कमी करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण प्रयत्न केले आहेत. सर्वांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण, शालेय पोषण आहार योजना, प्रौढ साक्षरता अभियान, डिजिटल शिक्षणाचा प्रसार आणि विविध शैक्षणिक योजना यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. ग्रामीण भागात नवीन शाळा उभारणे, शिक्षक प्रशिक्षण सुधारणे आणि स्थानिक भाषेत शिक्षण उपलब्ध करून देणे या उपाययोजना प्रभावी ठरत आहेत. आजच्या डिजिटल युगात संगणक व तंत्रज्ञान शिक्षणालाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ऑनलाईन शिक्षण, ई-लर्निंग आणि मोबाईल शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रसार अधिक वेगाने होत आहे. यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळू शकते.

निरक्षरतेचे निर्मूलन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजातील प्रत्येक व्यक्तीने यात योगदान देणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्त्व समजून घेणे ही काळाची गरज आहे. शिक्षण हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे तसेच राष्ट्रनिर्मितीचे मुख्य साधन आहे. म्हणूनच निरक्षरता दूर करून साक्षर, सुशिक्षित आणि प्रगत भारत घडविणे हे आपले सामूहिक ध्येय असले पाहिजे.

भविष्यातील आव्हाने : निरक्षरतेव्यतिरिक्त भारतीय समाजाला विज्ञान निरक्षरता, आरोग्य निरक्षरता, अर्थिक निरक्षरता, संगणक निरक्षरता व पर्यावरण निरक्षरता यांसारख्या अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागेल.

पुणे/७९७२०७०३५८

# रविवारची पत्रे

## ओवाळा ओवाळा माझ्या सद्गुरू राणा

मराठी संत परंपरेत संत तुकाराम महाराज यांचे स्थान अत्यंत उच्च आहे. त्यांच्या अभंगांप्रमाणेच 'ओवाळा ओवाळा माझ्या सद्गुरू राणा' ही आरती केवळ भक्तिगीत नसून अत्यंत गूढ आणि गहन आध्यात्मिक तत्त्वज्ञानाने समृद्ध अशी रचना आहे. या आरतीतून साध्या, सरळ भाषेत अद्वैत वेदांत, योगशास्त्र आणि भक्तिमार्ग यांचा सुंदर संगम दिसून येतो. आरतीच्या प्रारंभी संत तुकाराम महाराज म्हणतात-

**'पांचाहि तत्त्वाच्या ज्योति प्रकाशिल्या राणा'**

येथे पंचतत्त्वे म्हणजे पृथ्वी, आप (जल), तेज, वायू आणि आकाश. या पंचमहाभूतांपासून संपूर्ण विश्वाची रचना झालेली आहे. पण सद्गुरू हे या तत्त्वांचे केवळ ज्ञाता नसून त्यांच्या मागील मूळ चैतन्यस्वरूप ब्रह्माची अनुभूती देणारे आहेत. सद्गुरू म्हणजे अज्ञानाचा अंधकार दूर करून आत्मज्ञानाचा प्रकाश देणारा दीपस्तंभ. त्यांच्या कृपेने साधकाला भौतिक जगाच्या पलीकडील सत्याचे दर्शन होते.

**'निराकार वस्तु कैसी आकारा आली'**

ही ओळ अत्यंत सूक्ष्म अद्वैत तत्त्व स्पष्ट करते. ब्रह्म हे निराकार, निर्गुण, अव्यक्त आहे. पण भक्ताच्या उद्धारासाठी तेच ब्रह्म सद्गुरूच्या रूपाने साकार होते. हीच उपनिषदांची शिकवण आहे. एकच परमात्मा सर्वत्र व्यापलेला आहे. 'माउली' या शब्दातून सद्गुरूंचे मातृवत प्रेम व्यक्त होते. ते केवळ ज्ञान देत नाहीत तर साधकाला प्रेमाने, करुणेने घडवतात. अर्थात निराकार ब्रह्म आणि साकार गुरू हे वेगळे नसून एकच तत्त्व आहे.

**'सोळा सांधे बहात्तर कोठड्या'**

या ओळींमध्ये मानवी शरीराचे योगशास्त्रीय वर्णन आहे. सोळा सांधे : शरीरातील मुख्य सांधे, बहात्तर कोठड्या - ७२ नाड्या (प्राणवाहिन्या), नवखिडक्या : शरीरातील नवद्वार. हा देह म्हणजे एक 'डोल' म्हणजेच अस्थिर, नश्वर रचना. पण या देहातच मूर्ती म्हणजे आत्मचैतन्य वास करते. यातून स्पष्ट संदेश मिळतो- देह हा अंतिम सत्य नसून आत्मा हेच खरे स्वरूप आहे. देह हे साधन आहे, साध्य नाही.

**'सप्तहि सागराचा वेढा'** : येथे 'सप्तसागर' हे केवळ बाह्य जगाचे प्रतीक नाही तर मनुष्याच्या अंतर्गत दोषांचे द्योतक आहे. हे सात शत्रू असे आहेत- काम (अति इच्छा), क्रोध, असहिष्णुता/रोष, लोभ, मोह, मद (अहंकार), मत्सर. हे सर्व दोष मनुष्याला वेढून टाकतात आणि त्याला दुःखाच्या चक्रात अडकवतात. संसार म्हणजे बाह्य जग नव्हे तर अंतर्गत अस्थिरता.

**'तुका म्हणे बाप माझा कनवाळू आला'**

सद्गुरू हे केवळ शिक्षक नाहीत, ते पित्याप्रमाणे रक्षण करणारे, मातेसारखे प्रेम देणारे, देवासारखे मार्गदर्शन करणारे त्यांची कनवाळू (करुणामय) वृत्ती साधकाला संसारातून मुक्त करते. गुरुकृपेनेच आत्मज्ञान प्राप्त होते, हे या आरतीचे मुख्य तत्त्व असून पुढील गूढ तत्त्वेही या आरतीतून स्पष्ट होतात- सद्गुरू हे पंचमहाभूतांच्या पलीकडील ब्रह्मतत्त्वाचे प्रकाशक आहेत, निराकार ब्रह्म साकार गुरूरूपाने प्रकट होते, देह हा नवद्वारयुक्त, नश्वर पण साधनेसाठी आवश्यक आहे, मनुष्याचे खरे शत्रू बाहेर नसून अंतर्मनात आहेत, संसारातून मुक्ती केवळ सद्गुरूंच्या कृपेनेच संभवते.

'ओवाळा ओवाळा माझ्या सद्गुरू राणा' ही आरती केवळ भक्तिभाव व्यक्त करणारी नाही तर ती अद्वैत वेदांत, योग आणि भक्ती यांचा संगम असलेली आध्यात्मिक साधना आहे. ती साधकाला बाह्य पूजा सोडून अंतर्मुख होण्याचा मार्ग दाखवते. सद्गुरूंच्या चरणी समर्पण केल्याशिवाय आत्मज्ञानाची प्राप्ती होत नाही, हीच या आरतीची खरी शिकवण आहे.

**लक्ष्मीकांत घरोटे**/चंद्रपूर/९८२२६३८१९२

## मनुष्याचा स्वभाव हीच खरी संपत्ती

मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे स्वभाव. एखाद्या व्यक्तीची ओळख त्याच्या रूपाने, संपत्तीने किंवा पदाने होत नाही, तर त्याच्या स्वभावाने होते. स्वभाव हा माणसाच्या विचारांमध्ये, बोलण्यात आणि वागण्यात दिसून येतो. चांगला स्वभाव असेल तर माणूस सर्वांच्या मनात स्थान निर्माण करतो, तर वाईट स्वभावामुळे लोक दूर जातात. स्वभावाचे अनेक प्रकार असतात. काही लोक शांत, प्रेमळ, मदत करणारे आणि संयमी असतात. अशा व्यक्ती सर्वांना आवडतात. काही लोक रागीट, हट्टी, मत्सरी किंवा अहंकारी असतात. अशा स्वभावामुळे नाती तुटतात आणि समाजात मान कमी होतो. म्हणून प्रत्येकाने आपल्या स्वभावाचा विचार करणे आवश्यक आहे. स्वभाव हा जन्मतः काही प्रमाणात असला तरी तो संगत, संस्कार, शिक्षण आणि अनुभवांमुळे घडत जातो. घरातील वातावरण, आई-वडिलांचे संस्कार, मित्रपरिवार आणि समाज यांचा स्वभावावर मोठा प्रभाव पडतो. चांगल्या लोकांच्या सहवासात राहिल्यास आपला स्वभावही चांगला बनतो. चांगला स्वभाव जीवनात यश मिळवून देतो. गोड बोलणारा, नम्र आणि प्रामाणिक माणूस सर्वत्र सन्मान मिळवतो. कठीण प्रसंगातही संयम राखणारी व्यक्ती लोकांसाठी आदर्श ठरते. स्वभाव चांगला असेल तर नाती मजबूत राहतात आणि जीवन आनंदी होते.

माझ्या एका मित्राचा चष्म्याचा व्यवसाय आहे. एकदा मी त्या दुकानात गेलो असताना एक ग्राहक त्याच्याकडे आलेला, दोघात कसला तरी वाद झालेला लक्षात येत होते. लक्ष दिल्यावर कळलं की चष्म्याची फिटिंग बरोबर नव्हती. ग्राहकाची तक्रार होती की तो ग्लास त्याने बदलवून द्यायला हवा आणि मित्र त्यासाठी अधिक पैशाची मागणी करत होता .मित्र अत्याधिक चिडका झालेला होता. तो काही केल्या ऐकायलाच तयार नव्हता. मी मध्यस्थी केली आणि ग्लास बदलवून द्यायला सांगितला. त्या दिवसापासून आजपर्यंत त्या मित्राने माझ्याशी बोलणं सोडून दिलं. हा त्याचा स्वभावच तर आहे.

काही लोक अतिशय रागीट स्वभाचे असतात. परंतु त्यांचा राग लवकर निघून जातो आणि काही रागीट लोक वर्षानुवर्षं राग धरून बसतात. हा पण स्वभावाचाच एक प्रकार आहे. या उलट काही लोकांचा रागावर किंवा मनावर इतका जास्त संयम असतो की ते कधीच रागात येत नाहीत काहीही झालं, कितीही नुकसान झालं तरीही ते राग करत नाहीत आणि शांततेने प्रत्येक प्रसंगाला तोंड देतात, हा देखील स्वभावाचा प्रभाव.

फक्त राग आणि शांततेचाच स्वभावाचा प्रकार नाही. काही गोष्टींवर वेळेवर प्रतिक्रिया न करता वेळ निघून गेल्यावर धावपळ करणे हे पण काही लोकांच्या स्वभावात ठासून भरलेले असते. काही लोक मुळात कुठल्याच प्रसंगी काहीच प्रतिक्रिया देत नसतात आणि महिनोन्‌महिने त्याच गुंठाड्यात गुंतलेले असतात. काही लोक कुठल्याही प्रसंगी फक्त चावट किंवा फक्त खवचट बोलण्यात माहीर असतात. काही लोकांना नको तिथे उगाच बोलायचे, विषयाचे ज्ञान असो वा नसो आपले विचार मात्र नक्की मांडायचे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य. नको तो प्रसंग समोर आला की त्यांच्या मेंदूवरचा त्यांचा ताबा सुटतो आणि त्यांचा मूळ स्वभाव समोर येऊ बघतो. अनेक मानसोपचारांचे म्हणणे आहे की एक साधारण स्वभावी व्यक्ती पण कधी मनावरचा ताबा हरवते आणि हे कोणासोबतही कधीही घडू शकते.

स्वभाव बदलण्याकरिता मनावर ताबा मिळवायला हवा असतो जे सहज काम नाही. स्वभावामुळे मनाचा ताबा सुटतो आणि म्हणूनच याला स्वभाव असे म्हटले आहे. एकंदरीत बघता वाईट स्वभाव बदलणे अशक्य नाही. स्वतःच्या चुका ओळखून, रागावर नियंत्रण ठेवून, इतरांशी प्रेमाने वागून आणि सकारात्मक विचार करून स्वभाव सुधारता येतो. प्रयत्न आणि इच्छाशक्ती असेल तर प्रत्येक जण आपला स्वभाव उत्तम बनवू शकतो. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, रूप क्षणिक असते, पण स्वभाव कायम लक्षात राहतो. म्हणून प्रत्येकाने चांगला स्वभाव जोपासावा, कारण चांगला स्वभाव हीच माणसाची खरी ओळख आणि खरी संपत्ती आहे.

**अनंत कपाळे**/९३७३१०२८९८

## स्त्री शक्ती वंदन विधेयकाच्या निमित्ताने...

गेली अनेक वर्षे स्त्री शक्ती, स्त्री अधिकार, स्त्री सशक्तीकरण यासाठी कार्य करत आहे. म्हणून मला महाराष्ट्र राज्य बालकल्याण समितीच्या सदस्यपदी जाण्याची संधी मिळाली. पण भारताच्या लोकसभेत 'नारी शक्ती वंदन' या अत्यंत महत्त्वाच्या विधेयकाच्या संदर्भात जे घडले, त्याने मनात एक प्रकारची खंत आणि व्यथा निर्माण झाली आहे. मला या विधेयकाच्या विरोधकांच्या विचारांची आणि राष्ट्रविरोधी राजकारणाची चीड येत आहे. महिलांच्या सशक्तीकरणासाठी, त्यांच्या राजकीय सहभागासाठी आणि समान हक्कांसाठी हे विधेयक एक मोठे पाऊल ठरू शकले असते; परंतु ते मंजूर होऊ शकले नाही, ही बाब निश्चितच विचार करायला लावणारी आहे. 'होम मिनिस्टर' या कार्यक्रमाच्या संदर्भात निवेदन देण्यासाठी आणि त्याविषयी चर्चा करण्यासाठी भाजपा महिला प्रदेश अध्यक्षा आमदार चित्रा वाघ यांची अराजकीय व्यासपीठावर भेट घेतली. त्यावेळी त्यांनी अतिशय स्पष्ट आणि वास्तववादी शब्दांत महिलांचा संघर्ष सांगितला. महिलांसाठी राजकारण हे क्षेत्र अत्यंत आव्हानात्मक असलं, तरी या विधेयकामुळे महिलांना खूप संधी उपलब्ध होणार, याचा जास्त आनंद आहे. त्यांच्या अनुभवातून उमटलेले हे शब्द केवळ त्यांचेच नव्हे, तर देशातील प्रत्येक संघर्ष करणाऱ्या स्त्रीचे प्रतिनिधित्व करतात. त्यांनी एक आशा व्यक्त केली होती की, जर हे विधेयक लोकसभेत मंजूर झाले, तर तो प्रत्येक महिलेसाठी अभिमानाचा आणि आनंदाचा ऐतिहासिक क्षण असेल. मात्र ते घडले नाही. त्यामुळे मनात एक प्रश्न उभा राहतो- ज्या महिलांच्या हक्कांविषयी, स्वातंत्र्याविषयी वर्षानुवर्षे बोलले गेले, ते केवळ शब्दांपुरतेच मर्यादित होते का? अनेकदा स्त्री अधिकारांबाबत मोठमोठ्या घोषणा केल्या; प्रत्यक्ष कृतीच्या वेळी त्यांची भूमिका स्पष्ट झाली, असेच म्हणावे का? या संपूर्ण प्रक्रियेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या सन्मानासाठी आणि त्यांच्या सशक्तीकरणासाठी घेतलेली भूमिका विशेष महत्त्वाची आहे. 'स्त्री शक्ती वंदन' हे केवळ एक विधेयक नसून देशातील प्रत्येक स्त्रीच्या आत्मसन्मानाशी जोडलेले स्वप्न आहे. त्यामुळे हे विधेयक मंजूर न होणे, ही केवळ राजकीय घटना नसून महिलांना भावनिक पातळीवरही अस्वस्थ करणारे आहे. तरीही, या प्रवासाचा शेवट इथे नाही. इतिहास साक्षी आहे की, जे योग्य आणि न्याय्य आहे, ते शेवटी मार्ग काढतेच. जेव्हा पुन्हा एकदा अधिक ताकदीने हे विधेयक मांडले जाईल, तेव्हा देशातील महिलांना त्यांचा हक्क नक्कीच मिळेल, याबाबत पूर्ण विश्वास आहे. हा संघर्ष केवळ राजकीय पक्षांचा नाही, तर संपूर्ण स्त्रीशक्तीचा आहे आणि ती शक्ती एक दिवस विजय मिळवेल, असा विश्वास आहे.

**नलिनी वायाळ गावडे**/पुणे, ८८८८९८७६७६

## निगरगट्ट राजकारणाची पराकाष्ठा

''मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवा'' ही बातमी तरुण भारतच्या २५ एप्रिलच्या अंकात वाचली. सध्याचे कर्तव्यकठोर आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात सगळ्याच विरोधी पक्षांनी त्यांना लक्ष्य करण्याचे कारस्थान केले आहे. त्यांचा गुन्हा काय तर त्यांनी, संविधानाने दिलेल्या अधिकारांच्या मर्यादा सांभाळून निवडणुका अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध, गैरप्रकारमुक्त आणि दहशतमुक्त केल्या आणि लोकशाहीच्या या सर्वांत महत्त्वाच्या उत्सवात अधिकाधिक लोकांनी मतदान करावे यासाठी सकारात्मक प्रयत्न केले. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या मतदानाची पहिली फेरी आणि तामिळनाडूमध्ये झालेल्या सर्व जागांवर झालेल्या विक्रमी मतदानामुळे हे निःसंदिग्धपणे सिद्ध झाले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त आणि राष्ट्रीय निवडणूक आयोगावर जनतेने दाखवलेल्या गाढ विश्वासाचे हे प्रतीक आहे. अद्याप मतदानाची प्रक्रिया सुरू आहे आणि निवडणूक निकाल तर खूपच लांब आहेत. पण आपल्या पराभवाची चाहूल लागलेल्या विरोधी पक्षांनी आपली चामडी वाचवण्यासाठी आतापासूनच प्रयत्न सुरू केले आहेत.

निवडणूक आचारसंहिता देशभरात लागू करणारे आणि भारतीय लोकशाही स्वच्छ करणारे तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन साहेबांची येथे आठवण येणे स्वाभाविक आहे. वास्तविक ही आचारसंहिता कित्येक दशकांपासून अस्तित्वात होती. पण काँग्रेसच्या सरकारांनी आणि नेत्यांनी ती हेतुपुरस्सर जनतेपासून दडवून ठेवली आणि निवडणुकीत विविध गैरप्रकारांना खतपाणीच घातले. त्याचा सर्वाधिक फायदा काँग्रेसलाच मिळत असल्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांनी, एक डोळा मिटून, हं, चालू दे असा गैरप्रकार करणाऱ्यांना आशीर्वाद दिला. मात्र डिसेंबर १९९० ते डिसेंबर १९९६ या मुदतीत मुख्य निवडणूक आयुक्त असलेल्या शेषन यांनी निवडणूक प्रक्रियेत आमूलाग्र सुधारणा केल्या. निवडणुकीत होणाऱ्या गैरप्रकारांना त्यांनी कमालीचा आळा घातला. मतदारांना लालूच दाखवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काळ्या पैशांवर नियंत्रण आणले. अशा सुधारणांमधील काही महत्त्वाच्या सुधारणा अशा.

**मतदार ओळखपत्र** : छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र अनिवार्य केले.

**आचारसंहिता** : निवडणूक आचारसंहितेची कडक अंमलबजावणी केली आणि नियम मोडणाऱ्या उमेदवारांवर कारवाई केली.

**निवडणूक खर्च** : उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर मर्यादा आणली. त्यांना खर्चाचा हिशेब देण्याचा आदेश दिला आणि अंमलातही आणला. त्यांना इलेक्शन किंग म्हणून ओळखले जात असे. त्यांच्या कडक स्वभावामुळे राजकीय नेत्यांमध्ये त्यांचा प्रचंड दरारा होता.

त्यानंतर आलेल्या जवळपास सर्वच निवडणूक आयुक्तांनी शेषन यांनी केलेल्या प्रयत्नांना पुढे नेऊन निवडणुका अधिकाधिक लोकाभिमुख केल्या. सध्याच्या आयुक्तांनी, संवैधानिक अधिकारांतर्गत, एसआयआर प्रक्रिया करून, भारताचे अधिकृत नागरिकत्व नसलेल्या घुसखोरांची नावे मतदारयादीतून वगळली आणि नेमकी हीच कृती विरोधी पक्षांची गले की हड्डी बनली आहे. एसआयआर विरोधात न्यायालयात गेलेल्या विरोधी पक्षांची, अनेकदा सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांत कानउघाडणी केल्यानंतरही विरोधी पक्षाची हौस भागली नाही.

ज्ञानेशकुमार यांच्यासारख्या कर्तव्यदक्ष, जबाबदार, निःस्पृह, निष्पक्ष आणि कार्यक्षम अधिकाऱ्यावर अत्यंत खालच्या भाषेत टीका करून विरोधी पक्षांनी आपली पातळी दाखवून दिली आहे. काहीही असले तरीही विरोधी पक्षांच्या कटकारस्थानांना, दहशतीला, हिंसाचाराच्या घटनांना जनता बळी पडणार नाही आणि आपल्या मतदानाच्या घटनात्मक अधिकारावर गदाही येऊ देणार नाही. विरोधी पक्षांचा निगरगट्टपणा या निमित्ताने पुन्हा एकदा उघड झाला हेही चांगलेच झाले.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## पायरीवरला राम...!

कुठलीही घाई नव्हती. सारं काही ठरवणारा तोच होता. माझा नि त्याचा ऋणानुबंधही फार पुरातन होता. त्याच्याच पुण्य पावन भूमीत माझा जन्म झाला. त्याचा आदर्श, त्याचे रक्त धमन्यांमधून सहज वाहत होते. सर्व कीर्तनकारांच्या गजरांमधून त्याची नि माझी भेट होत होतीच. कार्तिक महिन्यातल्या दिंडीतही तो असायचा. कुठल्याही संकीर्तनातून सहज मला भेटायचा. जीवनात राम सर्वत्र होता. त्याच्या जन्माच्या कथा लहानपणापासूनच ऐकल्या होत्य. त्याला घर नसल्याची जाणीवही समज आल्यापासून होती. संघर्ष, वनवास, त्याचा या कलियुगातही सोपा नव्हता. आईने सोडलेल्या प्रत्येक उसाशातून मला तो जाणवत होता. धीर गंभीर वडिलांचे त्याच्यासाठी असणारे दुःख हळूहळू माझेही झाले होते. अशातच दोन वेळा त्याची नि माझी भेट झाली होती. दोनही कारसेवा नशिबात होत्या. नाते घट्ट झाले होते. त्याच्या कार्याकरिता माझी निवड ही त्यानेच केली होती. निवांत स्थानापन्न झाला तो स्वगृहात.

मलाही निश्चिंत वाटले. अशातच एका निमित्ताने भेटीस त्याने मला बोलावले. कुठलीही हाल अपेष्टा न होता हा श्रीमंत योग त्यानेच घडवून आणला. हा माझा त्याच्यावर विश्वास होताच. प्रांगणातून निश्चिंतपणे चालत सगळ्यात खालच्या पायरीवरच काही मिनिटांसाठी डोके मी ठेवले. त्याच्या दर्शनाची घाई नव्हती मला. तो माझ्या जवळच होता. खूप साऱ्या डोळ्यांनी मला तो फक्त आज बघायचा होता. योजना त्याचीच होती. अनंत आठवणींनी मला घेरले.

शेकडो लढाया, हजारो बलिदाने, कोठारी बंधू, शरयूला लाल रंग देऊन गेलेले ज्ञात-अज्ञात बंधू, पालघरचे निरपराध साधू, हयात नसलेले आई वडील, या सगळ्यांच्या डोळ्यातून मी त्याला आज पाहणार होतो. म्हणूनच त्याच्या पायरीवर ठेवलेले डोके सहज मला उचलता न आले. अक्षरशः अश्रूंनी ती पायरी मी भिजवून टाकली .

त्या सिंचनातून मग मात्र खूप हलके वाटले. वास्तवतेचे भान आले. मी स्वतःला सावरले. अरुंद गल्लीमध्ये कापडी तंबूत पाहिलेला तो, बालरूपात स्वगृही परतलेला हा, सारे काही तसेच माझ्याजवळ जपून होते. कळले मला की माझ्या डोळ्यातून रामाचे दर्शन आज या सगळ्यांनीही घेतले...

मग मात्र माझ्या डोळ्यातून अश्रू नाही वाहीले...

सर्वांसोबत भारावून मीही दर्शन घेतले... पुढे सरकलो...

जगरहाटी सुरू झाली होती...

पण, त्या पायरीवरचे माझे डोके मी अजूनही नव्हते उचलले...

कारण अश्रू भरल्या डोळ्यांमध्ये राम मला तेथेच होते भेटले...!

**बाबा देशपांडे**/९४२३६१३२२६

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# मंद्रुप ग्रामपंचायतचा अजब कारभार; नवीन शौचालयाला लावले कुलूप

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२५ एप्रिल-**

मंद्रूप ग्रामपंचायतीकडून पंधरावा वित्त आयोगातून ठीक ठिकाणी नऊ लाख रूपये खर्च करून प्लास्टिक शौचालय व कचरा कुंडी बसविण्यात आली आहेत. मात्र शौचालयासाठी कोणत्याही प्रकारचा आराखडा न करता व नागरिकांचे वापर न पाहता बसविण्यात आली आहेत. शिवाय बसविलेले प्लास्टीक शौचालय मंद्रूप ग्रामपंचायतीने कुलूप लावून बंद करून ठेवला आहे. यामुळे नऊ लाख रुपयांचा निधी वाया गेल्याची चर्चा सुरू आहे.

मंद्रूप ग्रामपंचायतीला माझी वसुंधरा योजनेत दोन कोटी ७५ लाख रुपयांचा



पुरस्कार मिळाले आहेत. गावात प्लास्टिक बंदी करून पर्यावरण वाचवण्यासाठी पर्यावरण पूरक साहित्य वापरणे गरजेचे व बंधनकारक आहे. मात्र मंद्रूप ग्रामपंचायतीने शासनाच्या नियमाला ठेंगा दाखवत गावात प्लास्टिक कचराकुंडी व शौचालयाची खरेदी केली आहे. गावात ९० ठिकाणी शौचालय व प्लास्टिक कचराकुंडी बसविले आहेत. त्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत आहे.

एकीकडे स्वदेशी वृक्ष लावून पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या मंद्रूप ग्राम पंचायतीकडून प्लास्टिक साहित्य वापरून वसुंधराला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. नवीन शौचालय बसविल्यानंतर शौचासाठी कोणत्याही प्रकारचा खड्डा दिसून येत नाही. उघड्यावरच शौच बाहेर पडत असल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे. याकडे दुर्लक्ष करीत व कोणताही आराखडा न करता शौचालय बसविण्यात आले आहेत. मात्र शौचालय उघडे ठेवण्याऐवजी कुलूप लावून बंद करण्यात आले आहे.

### आधी बिल काढले मग शौचालय बसविले

मंद्रूप ग्रामपंचायतने पंधरावा वित्त आयोगामधून पाच महिन्यापूर्वी प्लास्टिक शौचालयाचा बिल काढला आहे. ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामसेवकांच्या हलगर्जीपणामुळे ते धुळखात पडले होते. मंद्रूपचे तत्कालीन ग्रामसेवक जोडमोटे यांची बदली झाल्यानंतर व प्रसारमाध्यमांमधून टीका झाल्यानंतर ग्रामपंचायतीने प्लास्टिक शौचालय दर्शनी भागात बसविला आहे.

### शौचालयाच्या बिलाच्या चौकशीची मागणी

मंद्रूप ग्रामपंचायतीने १५ वा वित्त आयोगामधून पाच महिन्यापूर्वी नऊ लाख रूपये बिल काढला आहे. कनिष्ठ अभियंता व उपअभियंत्यासह अधिकाऱ्यांनीही कामाची पाहणी न करता पाच महिन्यापूर्वी बिल मंजूर केला आहे. मात्र महिन्यापूर्वी शौचालय व कचराकुंडी बसविण्यात आली आहेत. त्यामुळे बोगस बिल काढणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## महत्वाचे...



## आसरा पूल, पोशम्मा मंदिर परिसरातील अतिक्रमण काढले

**सोलापूर, दि.२५ एप्रिल-**

शहरातील आसरा रेल्वे पूल आणि शनिवार पेठेतील पोशम्मा मंदिर परिसरातील अतिक्रमण हटविण्यात आले. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज ही मोहीम पोलीस बंदोबस्तात राबविण्यात आली. अतिक्रमित एक खोके जागेवर निष्काशीत करण्यात आले तर दोन खोके काढण्यात आले. रस्त्यावर अडथळा ठरणारे तसेच सार्वजनिक ठिकाणी करण्यात आलेले अतिक्रमण हटविण्याची मोहीम महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने नियमितपणे सुरू आहे. दरम्यान, आज आसरा रेल्वे पूल परिसरातील जामगुंडी मंगल कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्यात आले. रस्त्यावरील एक खोके जागेवरच जेसीबीच्या साह्याने निष्काशीत करण्यात आले. दोन खोके हटविण्यात आली. त्यानंतर शनिवार पेठ येथील पोषम्मा मंदिर आणि लक्ष्मी मंदिर यामधील जागेवर करण्यात आलेले अतिक्रमण काढण्यात आले. यापूर्वी १३ एप्रिल २०२६ रोजी येथील अतिक्रमण काढण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा आज मोहीम राबविण्यात आली, अशी माहिती महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी दिली. सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्याच्या कडेला अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम नियमितपणे महापालिका प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करू नये, असे आवाहन अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

## जाधव परिवारातर्फे कुमाशी येथे आज सामूहिक सुंद्री वाद्य वादन

**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**





कर्नाटक कुमाशी येथे रविवार दि. २६ एप्रिल रोजी पंडीत भिमण्णा जाधव, मास्टर व्यंकटेशकुमार जाधव, कलाश्री जाधव व गायत्री जाधव यांचे सामूहिक सुंद्री वाद्य वादन होणार आहे. जाधव घराण्याचे ५ व्या पिढीचे प्रसारक मास्टर व्यंकटेशकुमार जाधव, कलाश्री जाधव हे संगीतप्रेमी कुटुंबातील आहेत. वडील पंडित भिमण्णा जाधव यांच्याकडून सुंद्री वाद्य वादनाचे प्रशिक्षण घेत आहेत. सुंद्रीसम्राट सिद्राम जाधव परतडू तर पंडित चिदानंद जाधव यांचे ते नातू आहेत. सध्या ते दमाणी विद्या मंदिर सोलापूर येथे इ. १० वीत शिकत आहेत. कलाश्री जाधव सांगमेश्वर महाविद्यालयात बारावीत शिकत आहे. श्री त्रिविक्रम भारती महासंस्थान आर कुमाशी आणि श्रीमान नरसिंह सरस्वती विश्वरूपा दत्तपादुका क्षेत्र कुमाशी कर्नाटक यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी भारतीय शास्त्रीय संगीताचे वादन व गायन होत आहे. यावेळी पंडीत भिमण्णा जाधव, व्यंकटेशकुमार जाधव, कलाश्री जाधव, गायत्री जाधव यांचे सामूहिक सुंद्री वाद्य वादन होणार आहे. त्यांच्यासोबत मैसूरचे पंडीत भिमाशंकर बिदनूर हे तबला वादक म्हणून सहभागी असणार आहेत. शास्त्रीय गायक पंडीत राघवेंद्र भट्ट यांचा कार्यक्रम होणार आहे. त्यांना त्रिगुणा पुजारी हार्मोनियम तर पं. भिमाशंकर बिदनूर तबल्यावर साथ देतील.

## बालविवाह रोखण्यात 'निर्भया'स यश; १५ वर्षाच्या मुलीचे लग्न करण्याचा प्रयत्न

**पंढरपूर,दि.२५ एप्रिल -**

पंढरपूर येथील निर्भया पथकाने धडक कारवाई करत मुलीचा होणारा बालविवाह रोखला. तसेच तिच्या आई-वडिलांना समज देउन सोडून दिले. सहायक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी समाजमाध्यमांवर निर्भया पथकाचा व्हॉट्सअप नंबर प्रसिद्ध केला होता. त्यावर पंढरपूर ग्रामीण हद्दीत दोन दिवसाने एक बालविवाह होत असल्याची गोपनीय बातमी मिळाली होती. त्यानंतर निर्भया पथक पंढरपूर यांनी त्या ठिकाणी तात्काळ जावुन चौकशी केली असता मुलीच्या नातेवाईकांनी मुलगी १७ वर्षाचे असल्याचे मान्य केले. मात्र अधिक चौकशी करत मुलगी शिकत असलेल्या शाळेतून तिचे बोनाफाईड प्रमाणपत्र मागवून घेतले. त्यात तिचे वय १५ वर्षे ११ महिने दिसुन आले. त्यानंतर पथकाने छापलेल्या लग्नपत्रिका ताब्यात घेतल्या . तसेच विवाह मुलीच्या आई वडीलांना समज देवुन रोखला. सदर अल्पवयीन मुलीस बालकल्याण समिती, सोलापूर यांचेसमक्ष पुढील कार्यवाहीकरीता हजर करण्यात आले. तसेच निर्भया पथक, पंढरपूर विभाग यांनी पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, पंढरपूर ग्रामीण तसेच करकंब पोलीस ठाणे हद्दीतील जनतेला आपल्या हद्दीत, नातेवाईकांमध्ये अशा प्रकारचे बालविवाह होत असल्यास पोलीस स्टेशन व निर्भया पथकास संपर्क करण्याचे आवाहन केले आहे. कोणी अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करेल तर त्यांच्यावर कायद्यानुसार अत्यंत कडक कारवाई केली जाईल, असा इशारा सहायक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी दिला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, सहायक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया यादव, पोकॉ वाघमारे, पोकॉ सावंत, पोकॉ कुचेकर, पोकॉ टिंगरे, पोकॉ काझी यांनी पार पाडली.

# पंतप्रधान कार्य प्रशिक्षण योजनेच्या तिसऱ्या टप्प्याची सुरुवात

### ३५ हजार ४८० तरुणांना कार्य प्रशिक्षणाची संधी होणार उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ एप्रिल-**

केंद्र सरकारच्या पंतप्रधान कार्यप्रशिक्षण योजनेच्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली आहे. देशभरातील ३५ हजार ४८० तरुणांना कार्य प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपन्यांत प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी आहे.

योजनेअंतर्गत माहिती तंत्रज्ञान, बँकिंग व वित्तीय सेवा, पायाभूत सुविधा, रिटेल, वाहननिर्मिती, औषधनिर्माण, उत्पादन, माध्यम, शिक्षण, पर्यटन व आरोग्य आदी क्षेत्रांमध्ये कार्यप्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रशिक्षणाचा कालावधी ६ ते ९ महिने असून, प्रशिक्षणार्थींना दरमहा रुपये ९ हजार रुपये इतके विद्यावेतन मिळणार आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देणार आहेत.

योजनेसाठी १८ ते २५ वय, दहावी, बारावी, आयटीआय, पदविका किंवा पदवीधर असे पात्रतेच निकष आहेत. पूर्णवेळ नोकरी करणारे किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार अपात्र ठरणार आहेत. ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेणारे उमेदवार पात्र राहतील, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने दिली आहे. इच्छुक उमेदवारांनी https://pminternship.mca.gov.inG$ý या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज करावा. शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त पदे उपलब्ध आहेत. सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त आस्थापना व कंपन्यांनी या योजनेत सहभागी व्हावे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर येथे दूरध्वनी क्रमांक (०२१७-२९५०९५६) वर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, सोलापूर संगीता खंदारे यांनी केले आहे.

# मंदिरे आणि मस्जिदीवरील भोंगे हटविले

### ५८१ मंदिरे, ३५७ मस्जिदींचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने ग्रामीण पोलीस प्रशासनाने केलेल्या कारवाईत मंदिरांवरील ५८१ तर मशिदींवरील ३५७ भोंगे असे एकूण ९३८ भोंगे काढले आहेत.

ग्रामीण पोलीस प्रशासनातर्फे जिल्ह्यातील मंदिर व मशिदींवरील नियमबाह्य भोंगे काढण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील विविध ठिकाणी तपासणी करून नियमबाह्य लावलेले भोंगे हटविण्यात आले.

दोन्ही समाजातील नागरिकांनी



कायद्याचा आदर राखत पोलिस प्रशासनाला पूर्ण सहकार्य केले. संबंधित धर्मस्थळांचे पदाधिकारी व विश्वस्त यांनीही कायद्याचे पालन करत सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे मोहीम सुरळीतपणे यशस्वी ठरली.

कारवाईमुळे सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात ध्वनीप्रदूषण नियंत्रणास मदत होऊन सामाजिक सलोखा व शांतता अबाधित राहण्यास मोठा हातभार लागला असल्याचे पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी स्पष्ट केले.

## बार्शी पंचायत समितीसमोर आत्मदहनाचा प्रयत्न; तिघे जण ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ एप्रिल-**

बार्शी पंचायत समिती कार्यालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न करण्याचा धक्कादायक प्रकार शुक्रवार दि. २४ एप्रिल रोजी दुपारी घडला. पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार वेळेत उधळून लावण्यात आला असून मोठा अनर्थ टळला आहे. मौजे रातंजन (ता. बार्शी) येथील संतोष श्रीरंग साठे (वय ४१ वर्षे) यांनी जागेच्या वादाच्या कारणावरुन गटविकास अधिकाऱ्यांना आत्मदहनाचा इशारा देणारे पत्र दिले होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता.

या अनुषंगाने वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी सकाळी सुमारे ११ वाजता पंचायत समिती, बार्शी येथे हजर होते. दुपारी सुमारे १२.५० वाजण्याच्या सुमारास संतोष श्रीरंग साठे, जगदेवी संतोष साठे, सखाराम निवृत्ती साठे (सर्व रा. रातंजन, ता. बार्शी) हे तिघेही पंचायत समिती कार्यालयासमोर आले. सदर तिघांनी प्लास्टिकच्या बाटलीत आणलेला ज्वलनशील पदार्थ (पेट्रोल) स्वतःच्या अंगावर ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

हा प्रकार सार्वजनिक ठिकाणी घडत असल्याने स्वतःच्या तसेच इतरांच्या जीवितास धोका निर्माण झाला होता. घटनास्थळी उपस्थित पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करुन तिघांनाही ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांची वैद्यकीय तपासणी बार्शी ग्रामीण रुग्णालयात करुन पुढील कारवाईसाठी बार्शी शहर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. याप्रकरणी संबंधित तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# न्यू इंग्लिश स्कूल, कुसूरच्या विद्यालयाचे एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**द. सोलापूर दि. २५ एप्रिल -**

उत्कृष्ट यश संपादन केले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत आठवीतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, कुसूर विद्यालयातील चौघांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.

पल्लवी कोळी, वर्षाराणी कोळी, श्रावणी कोळी आणि प्रदीप कोळी अशी त्या गुणवंतांची नावे आहेत. त्यांच्या यशामुळे शाळेने पुन्हा एकदा एन.एम.एम.एस. परीक्षेतील उत्कृष्ट निकालाची परंपरा राखली आहे. निवड झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास ४८ हजार रुपये इतकी






शिष्यवृत्ती पुढील चार वर्षात अशी एकूण १ लाख ९२ हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळणार आहे. विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका चंद्रकला भोरे यांचे प्रोत्साहन, ज्येष्ठ शिक्षक दत्तात्रय पवार, देवानंद महामुनी, सचिन पाटील, संतोष पाटील यांचे मार्गदर्शन व सेवक वसंत ताकमोगे, रशीद शेख यांचे सहकार्य लाभले.

विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, सचिव विकास देशमुख, विभागीय चेअरमन संजीव पाटील, सहसचिव बी. एन. पवार, विभागीय अधिकारी जगदाळे, उपविभागीय अधिकारी दिनेश दाभाडे, निकम , लाईफ मेंबर राजेंद्र केदार, विद्यालयाचे मार्गदर्शक बाळप्पा नांगरे, स्थानिक स्कूल समितीचे सदस्य सुनीलकुमार नांगरे, अशोक बिराजदार, व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धाराम विंचुरे, सरपंच लक्ष्मी नरोटे, माता पालक संघ, माजी विद्यार्थी संघ आदींनी अभिनंदन केले.

### जाहिर नोटीस

दि सोलापूर इंडस्ट्रीयल को-ऑप इस्टेट सोसा.लि. या संस्थेचे शेअर्स सर्टिफिकेट क्र २६१६ ते २६२० रु. १००/- चा एक याप्रमाणे रु. ५००/- किमतीचे शेअर्स सर्टिफिकेट मे सुभाष इंडस्ट्रीज या नावाने दिलेले असून ते हरविले असल्याने त्यांनी आम्हास डुप्लीकेटची मागणी केली. याबाबत कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसात संस्थेकडे कळवावे. या मुदतीत कोणाची तक्रार न आल्यास डुप्लीकेट शेअर्स सर्टिफिकेट देण्यात येईल व त्या नंतर कोणाची तक्रार चालणार नाही.

कळावे. दि. २५/०४/२०२६

सही/-
मकरंद मा. गवळी
चेअरमन
दि सोलापूर इंडस्ट्रीयल को-ऑप इस्टेट सोसा.लि सोलापूर

# लग्न झाले असतानाही न झाल्याचे भासवून नवरदेवाची फसवणूक

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. २५ एप्रिल -**

- एजंट महिला व नववधू विरुध्द गुन्हा दाखल
- नातेवाईकांमार्फत साधला नवरदेवाशी संपर्क
- लग्न ठरवताना वधुला २ लाख ७० हजार रुपये देण्याची अट
- धर्म लपवून केला विवाह
- विवाहानंतर आठवडाभरात पलायन
- नवरदेवाने पाठलाग करुन पकडले

लेंडवे चिंचाळे येथील एका ३७ वर्षीय शेतकरी मुलास मुलीचे पहिले लग्न झाले असूनही व ती मुस्लिम समाजाची असताना मराठा समाजाचे असल्याचे भासवून लग्न जमविणाऱ्या एजंट महिलेने २ लाख ७० हजार रुपये घेवून नवरदेवाची फसवणूक केली. याप्रकरणी एजंट सुरेखा सुर्यवंशी (रा.उदगीर,जि.लातूर) व वधू कुसुमबेन बेमाबाई घाटाड राज्य गुजरात या दोघींविरूध्द मंगळवेढा पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी तथा नवरदेव विनायक आवताडे (वय ३७,रा. लेंडवे चिंचाळे) हा शेतकऱ्याचा मुलगा आहे. त्याचे लग्न जमत नसल्यामुळे फिर्यादीचे नातेवाईक नवनाथ लेंडवे यांचेमार्फत लग्न जमवून देणारी एजंट सुरेखा सुर्यवंशी (रा.उदगीर) यांची ओळख झाली होती. दि.१६ एप्रिल रोजी फिर्यादीस भेटायला उदगीर येथे बोलावून घेतले. उदगीर बसस्थानकावर त्यांची दुपारी ३.३० वा. भेट झाली. यावेळी नवरदेवास कुसूम नावाच्या वधूला ती मराठा समाजाची असल्याचे सांगून दाखविण्यात आले. ती मुलगीही लग्न करण्यास तयार झाली. एजंटाने नवरीला २ लाख ७० हजार रुपये द्यावे लागतील असे सांगितले. त्यामुळे उपस्थितांनी ठरलेली रक्कम २ लाख ५० हजार रुपये एजंटाच्या हातात दिले. राहिलेले २० हजार रुपये फोन पे वर सोडले. तातडीने मंदिरात लग्न करण्याचे ठरले. उदगीर येथे साहित्य खरेदी करून रात्री ११ वा. एका गणपती मंदिरामध्ये हार घालून लग्न केले. त्यानंतर नववधू कुसूमला सोबत घेवून फिर्यादी लेंडवे चिंचाळेला आले. गावातील लोक व नातेवाईक यांच्यासमवेत राहते घरी पुन्हा रिती रिवाजाप्रमाणे मोठे लग्न केले. यावेळी पत्नी कुसुमला फिर्यादीच्या आईकडील १ तोळा वजनाचे मंगळसुत्र घालण्यास दिले. फिर्यादीचा संसार व्यवस्थित चालू होता. दि. २३ एप्रिल रोजी सकाळी ६.०० वा. फिर्यादीच्या घराच्या पाठीमागे एम एच ०८,झेड -७१९६ ही चार चाकी गाडी उभी होती. यावेळी फिर्यादीची पत्नी कुसूम ही कोणास घरामध्ये काही न सांगता अचानक त्या वाहनामध्ये बसून पळून गेली. यावेळी गावातील राहुल ठोंबरेने फिर्यादीस तुझी पत्नी कुसूम ही एका चार चाकी वाहनामध्ये बसून गेल्याचे सांगितले. फिर्यादीने त्या वाहनाचा पाठलाग करून मंगळवेढा शहराजवळ असलेल्या आवताडे पेट्रोल पंपाजवळ ते वाहन पकडले. चौकशी केली असता कुसुमचे पुर्वीच लग्न झालेले असून तिला मुले आहेत. तसेच तिचे नाव कुसूमबेन बेमाभाई घाटाड असे असून ती मुस्लीम समाजाची असताना मराठा समाजाची असल्याचे सांगून रुपये २ लाख ७० हजार घेवून फसवणूक केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर
E-mail :- am_barshi@msamb.com फोन : ०२१८४-२२२९७६

### जाहिर निविदा प्रसिध्दीकरण
### निविदा सुचना क्र. ०२ सन २०२६-२७

कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी खालील कामाच्या निविदेसाठी महाराष्ट्र शासनाचे मान्यताप्राप्त विभाग यांचे कडील नोंदणीकृत वर्गातील अनुभवी ठेकेदार यांचे कडून नमुन्यात द्वि-लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | मंजूर रक्कम | कोरी निविदा फॉर्म फी (GST सह) | बयाणा रक्कम | सुरक्षित ठेव | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे मुख्य बाजार आवारातील प्लॉट नं. ६५ ते गेट नं. ०३ जवळील इलेक्ट्रीक रुम व गेट नं. ०३ जवळील इलेक्ट्रीक रुम ते सार्वजनिक स्वच्छतागृह येथे नवीन विद्युत वाहिनी बसविणे. | ९,९४,९४२/- | ५९०/- | ९,९४९/- | ३९,७९७/- | ६ महिने |
| २ | कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे मुख्य बाजार गेट नं. ०३ जवळील इलेक्ट्रीक रुम ते शेळीबाजार/ तांबडे प्रेस येथे नवीन विद्युत वाहिनी बसविणे. | ७,४२,८२९/- | ५९०/- | ७,४२५/- | २९,७१३/- | ६ महिने |

सर्व पात्र / इच्छुक निविदा धारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी कोरे निविदा संच दि. २६/०४/२०२६ ते ०३/०५/२०२६ मध्ये कार्यालयीन वेळेत खरेदी करावा. निविदा पत्रकातील सर्व अटी व शर्ती निविदा धारकास बंधनकारक राहतील.

सही/-
सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी

Classifieds

### विकणे आहे

'मारुती अपार्टमेंट' रुबी नगर सिध्देश्वर ज्वेलर्स समोर बॉम्बे पार्क रोड, जुळे सोलापूर येथील दुसऱ्या मजल्यावरील २ बीएचके प्लॅट लमसम रकमेवर भाडेवर अथवा योग्य किंमतीस विकणे आहे.

मो. ९६७३१६१६९०/ ८१८०८६१०३८/ ९२२५७४९०४०

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



## महत्त्वाचे

### कनिष्ठ विश्वचषक नेमबाजीत वंशिका-चिरागला सुवर्णपदक



**कैरो** : येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ कनिष्ठ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत, १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकारात वंशिका चौधरी आणि चिराग शर्मा यांनी सुवर्णपदक पटकावले. यामुळे भारताच्या सुवर्णपदकांची संख्या पाचवर पोहोचली आहे. एकूण १४ पदकांसह भारत पदकतालिकेत अव्वल स्थानी आहे. स्पर्धेचा आणखी एक दिवस बाकी असतानाही, पाच सुवर्ण, पाच रौप्य आणि चार कांस्य पदकांसह भारताने पदकतालिकेतील आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. या जोडीने ४८४.३ गुणांची नोंद करत, वैयक्तिक तटस्थ खेळाडू गटाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अलीकसांद्रा पियात्रोवा आणि मिकिता दौबाश (४६७.६ गुण) यांच्या आव्हानाचा यशस्वीपणे सामना केला. चार संघांचा समावेश असलेल्या अंतिम फेरीत, भारताच्या दुसऱ्या जोडीनेमोहिनी सिंग आणि हिमांशू राणा४०७.४ गुणांची कमाई करत कांस्यपदक पटकावले. पात्रता फेरीत, वंशिका आणि चिरागने एकत्रित ५८२ गुणांची नोंद करत १४ संघांमध्ये अव्वल स्थान मिळवले होते; तर मोहिनी आणि हिमांशू यांनी ५६८ गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला होता.

### खेलो इंडिया अभियान युवाशक्तीच्या ऊर्जेचे प्रतिबिंब

**श्रीनगर** : 'खेलो इंडिया' अभियान ही केवळ एक आकडेवारी नाही, तर ते आपल्या युवाशक्तीची ऊर्जा आणि राष्ट्राच्या कटिबद्धतेचे प्रतिबिंब आहे, असे केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी केले. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्र्यांचे चिंतन शिबीर शनिवारी श्रीनगर येथे सुरू झाले. या शिबिरात समन्वित कृती, संस्थात्मक सुधारणा, धोरणात्मक एकत्रीकरण आणि तळागाळातील प्रभावी अंमलबजावणी याद्वारे भारताची क्रीडा व्यवस्था बळकट करण्यावर सखोल चर्चा करण्यात आली. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. त्यांनी चर्चेची दिशा स्पष्ट केली. भारताच्या क्रीडा क्षेत्रातील महत्त्वाकांक्षांची पूर्तता केवळ प्रत्यक्ष जमिनीवरील अंमलबजावणीद्वारेच होईल, यावर त्यांनी विशेष भर दिला. जागतिक स्तरावर एक क्रीडा महासत्ता बनण्यासाठी आपण तयार केलेला १० वर्षांचा आराखडा केवळ कागदावरच राहता कामा नये, असेही ते म्हणाले.

### सुदर्शनने आक्रमकपणा वाढवावा : इयान बिशप

**नवी दिल्ली** : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात गुजरात टायटन्सचा सलामीवीर फलंदाज साई सुदर्शनने झळकावलेल्या अप्रतिम शतकानंतर, वेस्ट इंडीजचा माजी क्रिकेटपटू इयान बिशप याने सुदर्शनच्या फलंदाजीतील गतीचा अभाव निदर्शनास आणून दिला. तसेच, सुदर्शनने आपल्या फलंदाजीच्या शैलीमध्ये आक्रमकतेची पातळी वाढवणे गरजेचे असल्याचेही त्याने नमूद केले. सुदर्शनने ५८ चेंडूंमध्ये १०० धावांची सनसनाटी खेळी करत एम. चिन्नास्वामी स्टेडियम गाजवून सोडले. या प्रक्रियेत, आयपीएलमध्ये सर्वात जलद २००० धावा पूर्ण करणारा फलंदाज बनून त्याने आयपीएलच्या विक्रमांमध्ये आपले नाव कोरले. मात्र, एवढे करूनही ते पुरेसे ठरले नाही; कारण धावांचा पाऊस पडलेल्या या सामन्यात गुजरात टायटन्सला बंगळुरूकडून पाच गडी राखून पराभव पत्करावा लागला. ऑरेंज कॅप विजेता असलेल्या सुदर्शनची आयपीएल २०२६ ची सुरुवात काहीशी अस्थिर झाली होती.

# श्रेयसच्या खेळीने पंजाबची 'बल्ले बल्ले'

### दिल्ली कॅपिटल्सवर ६ गड्यांनी दणदणीत विजय | प्रियांश, प्रभसिमरनने रचला विजयाचा भक्कम पाया | केएल राहुलची विक्रमी १५२ धावांची खेळी व्यर्थ

◆ **नवी दिल्ली, २५ एप्रिल**

आयपीएल हंगामात शनिवारी अरुण जेटली स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या चुरशीच्या आयपीएल सामन्यात श्रेयस अय्यर नाबाद ७१), प्रियांश आर्य (४३) व प्रभसिमरन सिंग (७६) यांच्या तडाखेबंद फलंदाजीच्या बळावर पंजाब किंग्सने यजमान दिल्ली कॅपिटल्सचे आव्हान परतावून लावले आणि ७ चेंडू शिल्लक ठेवित ६ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. परिणामी केएल राहुलचे विक्रमी दीडशतक व्यर्थ ठरले. पंजाब किंग्सचा हा सात सामन्यातील सहावा विजय ठरला असून त्यांनी १३ गुणांसह दहा संघांच्या गुणतालिकेत आपले अव्वल स्थान कायम राखले आहे.

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार पटेलने नाणेफेक जिंकून प्रथं फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी केएल राहुलने केलेल्या विक्रमी १५२ धावांच्या दीडशतकी खेळीच्या बळावर दिल्ली कॅपिटल्सने मर्यादित २० षटकांत २ बाद २६४ धावा उभारल्या आणि पंजाब किंग्सला विजयासाठी २६५ धावांचे आव्हान दिले. पंजाब किंग्सने १८.५ षटकांतच ४ गडी गमावित विजयाचे लक्ष्य गाठले.

के.एल. राहुलने नाबाद १५२ धावांची खेळी करीत आपले नाव विक्रमांच्या यादीत सुवर्णाक्षरांनी कोरले. त्याची ही खेळी




श्रेयस अय्यर

आयपीएलच्या इतिहासातील कोणत्याही भारतीय फलंदाजाने केलेली सर्वोच्च धावसंख्या आहे.

राहुलची ६७ चेंडूंतील ही अप्रतिम खेळी केवळ त्याच्या उत्कृष्ट फटकेबाजीसाठी ओळखली जाईल; त्याने २२६ च्या स्ट्राईक रेटने १६ चौकार आणि ९ षट्कार ठोकत ही कामगिरी केली. यासह, स्पर्धेच्या इतिहासात १५० धावांचा टप्पा ओलांडणारा तो ख्रिस गेल आणि ब्रेंडन मॅक्युलम यांच्यानंतरचा केवळ तिसराच फलंदाज ठरला आहे. राहुलचा हा अफाट पराक्रम आणि त्याला नितीश राणाने दिलेल्या ९१ धावांच्या स्फोटक साथीमुळे कडाक्याच्या उन्हातही दिल्ली कॅपिटल्सने आयपीएलमधील आपली आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या उभारली. राहुल-राणा या जोडीने ९५ चेंडूंत २२० धावांची मोठी भागीदारी रचली.

गोलंदाजी व क्षेत्ररक्षणातील अत्यंत निराशाजनक कामगिरीमुळे पंजाब किंग्सला या सामन्यात मोठा पश्चात्ताप करावा लागला. केएल राहुल अवघ्या १२ धावांवर असताना शशांक सिंगने त्याचा झेल सोडला. राहुलने या जीवदानाची पंजाबला मोठी किंमत मोजायला लावली आणि संपूर्ण स्टेडियम त्याच्या नावाच्या जयघोषाने दुमदुमून गेले.

**राहुलचा आणखी एक पराक्रम**

आयपीएलच्या इतिहासात तीन वेगवेगळ्या संघांसाठी (फ्रॅन्चायझींसाठी) एकापेक्षा अधिक शतके झळकावणारा केएल राहुल हा आता पहिलाच खेळाडू ठरला आहे. ४७ चेंडूंत त्याने पूर्ण केलेले शतक हे त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील सर्वात वेगवान शतकही ठरले आहे. दुसरीकडे, नितीश राणानेही तितकीच जबरदस्त फलंदाजी केली, ४४ चेंडूंच्या आपल्या खेळीत ११ चौकार आणि ४ षट्कार ठोकत त्याने सलग दुसरे अर्धशतक पूर्ण केले. दिल्ली कॅपिटल्सच्या सलामीवीर पाथुम निसांकाने (११) अर्शदीप सिंग्च्या गोलंदाजीवर फ्लिक करत चौकार ठोकून धावफलक हलता केला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना सलामीवीर प्रियांश आर्य व प्रभसिमरन सिंगने पंजाब किंग्सला डावाची झकास सुरुवात करून दिली. या दोघांनी तडाखेबंद फलंदाजी करीत ४१ चेंडूंत १२६ धावांची सलामी भागीदारी करीत पंजाब किंग्सच्या विजयाचा पाया भक्कम केला. अक्षर पटेलने या सलामी जोडीला फोडण्यात यश मिळविले. समीर रिझवीकडे झेलबाद होण्यापूर्वी प्रियांश आर्यने अवघ्या १७ चेंडूंत २ चौकार व ५ षट्कारांसह ४३ धावांची खेळी केली. संघाच्या खात्यात आणखी १० धावांची भर पडत नाही तोच प्रभसिमरन सिंग कुलदीप यादवच्या फिरकीला बळी पडला. प्रभसिमरन सिंगने अवघ्या २६ चेंडूंत ७६ धावांची दमदार खेळी केली, यात त्याने तब्बल ९ चौकार व ५ षट्कार खेचलेत. कूपर कोनोली १० चेंडूंत १७ धावा काढून बाद झाला, परंतु त्यानंतर कर्णधार श्रेयस अय्यरने नेहल वढेरा (२५) व शशांक सिंगच्या साथीने संघाला विजयाच्या दिशेने नेण्याचा आटोकाट प्रयत्न केला. वढेरा बाद झाला, तेव्हा पंजाबने १४.३ षटकांत ४ बाद २०१ धावांचा टप्पा गाठला होता व त्यांना विजयासाठी उर्वरित ३३ चेंडूंत आणखी ६४ धावा काढण्याची गरज होती. श्रेयस अय्यरने एक बाजू सांभाळीत ३६ चेंडूंत ३ चौकार व ७ षट्कारांसह नाबाद ७१ व शशांक सिंगने नाबद १९ धावांची खेळी करत पंजाब किंग्सला १८.५ षटकांत २६५ धावांचे विजयाचे लक्ष्य गाठून दिले. ◀(वृत्तसंस्था)

# चेन्नई गुजरातविरुद्ध विजयाची लय कायम ठेवेल का?

◆ **चेन्नई, २५ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमिर लीग हंगामात रविवारी दुपारच्या सत्रात येथील एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर यजमान चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) व गुजरात यटायटन्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. आयपीएलच्या या महत्त्वपूर्ण मध्य-हंगामी सामन्यात पुनरुज्जीवित कामगिरीच्या जोरावर चेन्नई संघ गुणतालिकेतील आपले स्थान अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करेल, तर गुजरात टायटन्स आपली घसरण थांबवण्याचा प्रयत्न करेल.

संथ सुरुवातीनंतर सीएसकेने पुनरागमन केले असून, आपल्या शेवटच्या चार सामन्यांपैकी तीन सामने जिंकले आहेत. यामध्ये मुंबई इंडियन्सविरुद्धच्या १०३ धावांच्या मोठ्या विजयाचा समावेश आहे, ज्याला संजू सॅमसनच्या या



ऋतुराज गायकवाड शुभमन गिल

हंगामातील दुसऱ्या शतकाने बळ दिले.

गुणतालिकेत सध्या सीएसके ६ गुणांसह पाचव्या स्थानावर आहे, तर गुजरात ६ गुणांसह सातव्या स्थानावर आहे. ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली सीएसके अव्वल चार संघांच्या अगदी बाहेर आहे व प्लेऑफमधील स्थानाचा पाठलाग करताना पुढील घसरण टाळण्यास उत्सुक असेल. सध्या तरी, सीएसकेसाठी परिस्थिती सुधारत आहे. सॅमसनच्या फलंदाजीतील चमकदार कामगिरीला अकील हुसेनच्या नेतृत्वाखालील अचूक गोलंदाजीची जोड मिळाल्याने त्यांनी मुंबईवर एक मोठा विजय नोंदविला. विशेष म्हणजे, त्यांनी हा पराक्रम संघाचा आधारस्तंभ महेंद्रसिंह धोनी व आयुष म्हात्रे च्या अनुपस्थितीत केला. म्हात्रेने या हंगामात २०१ धावांचे योगदान दिले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**चेन्नई सुपर किंग्स वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : एम. ए.चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून

००

**लखनौ सुपर जायण्ट्स वि. कोलकाता नाईट रायडर्स**
**स्थळ** : एकाना स्टेडियम, लखनौ
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

### सीएसकेला मधल्या फळीची चिंता

सीएसकेच्या आघाडीच्या फळीने सातत्यपूर्ण कामगिरी केली असली तरी, मधल्या फळीला इरादा दाखवण्यात आणि भागीदारी उभारण्यात संघर्ष करावा लागत आहे.

हैदराबादविरुद्ध, सीएसकेने ९० चेंडूंमध्ये १३० धावांचे लक्ष्य आठ गडी राखून सहज गाठायला हवे होते, परंतु मधल्या फळीच्या घसरणीमुळे हा प्रयत्न अयशस्वी ठरला. राजस्थान रॉयल्सच्या रियान परागप्रमाणेच गायकवाड स्वतः वाईट फॉर्ममधून जात आहे, तर सरफराज खान, शिवम दुबे आणि डेवाल्ड ब्रेव्हिससारखे खेळाडू मिळालेल्या चांगल्या सुरुवातीचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करण्यात अपयशी ठरले आहेत.

### गुजरात विजयाच्या मार्गावर परतण्यास उत्सुक

गुजरात टायटन्सने आपले शेवटचे दोन सामने गमावले. त्यांना मुंबई इंडियन्सकडून ९९ धावांनी व बंगळूरुकडून पाच गड्यांनी पराभव पत्करावा लागला.

चेन्नई सुपर किंग्जसोबत सहा गुणांवर बरोबरी साधूनही, वाईट नेट रन रेटमुळे (-०.७९०) गुजरात टायटन्स संघ सातव्या स्थानावर आहे, त्यामुळे त्यांच्या मोहिमेला फटका बसला आहे.


# अल्काराझ दुखापतीमुळे फ्रेंच ओपनमधून बाहेर

◆ **माद्रिद, २५ एप्रिल**

दोन वेळचा विद्यमान विजेता कार्लोस अल्काराझ उजव्या मनगटाच्या दुखापतीमुळे सलग तिसऱ्या फ्रेंच ओपन विजेतेपदासाठी खेळणार नाही, तो स्पर्धेतून बाहेर झाला आहे.

मी रोममध्ये होणाऱ्या इटालियन ओपनमध्येही सहभागी होणार नाही. मी रोममध्ये गत वर्षीही विजेतेपद पटकावले होते, असे अल्काराझने समाज माध्यमावर पोस्ट केले आहे. जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला अल्काराझ या महिन्यात बार्सिलोना ओपनमध्ये पहिल्या फेरीतील विजयादरम्यान जखमी झाला आणि दुसऱ्याच दिवशी त्याने स्पर्धेतून माघार घेतली.

त्याने या आठवड्यातील माद्रिद ओपनमधून माघार घेतली आणि सोमवारी स्पॅनिश राजधानीत झालेल्या लॉरियस वर्ल्ड स्पोर्ट्स अवॉर्ड्समध्ये मनगट स्थिर ठेवून हजेरी लावली. या सोहळ्यात अल्काराझला वर्षातील सर्वोत्तम जागतिक खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. अधिक वैद्यकीय चाचण्यांनंतर पॅरिस



कार्लोस अल्काराझ

ओपनमध्ये खेळणार नसल्याचे अल्काराझने निश्चित केले. चाचण्यांच्या निकालानंतर, आम्ही सावधगिरी बाळगणे आणि रोम व रोलँड गॅरोसमध्ये सहभागी न होणे हेच सर्वात शहाणपणाचे ठरेल असा निर्णय घेतला आहे, असे ल्काराझने समाज माध्यमावर लिहिले. इटालियन ओपन स्पर्धेची सुरुवात ५ मे रोजी होणार आहे, तर फ्रेंच ओपन स्पर्धा १८ मे रोजी सुरू होईल. ◀(वृत्तसंस्था)

# पंत, रहाणेच्या नेतृत्वाची कसोटी

◆ **लखनौ, २५ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात लखनौ सुपर जायण्ट्स आणि कोलकाता नाईट रायडर्सची कामगिरी खालावल्यामुळे ऋषभ पंत आणि अजिंक्य रहाणेच्या कर्णधारपदावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रविवारी एकाना स्टेडियमवर लखनौ आणि कोलकाता दरम्यान आयपीएलचा ३८ वा सामना खेळला जाणार असून या सामन्यात पंत व रहाणेच्या नेतृत्वाची कसोटी लागणार आहे.

सध्या दहा संघांच्या आयपीएल गुणतालिकेत लखनौ सुपर जायण्ट्स ४ गुणांसह नवव्या स्थानावर, तर कोलकाता नाईट रायडर्स ३ गुणांसह



ऋषभ पंत अजिंक्य रहाणे

तळाच्या स्थानी आहे.

मागील हंगाम वाईट गेल्यानंतरही, सातत्य नसलेल्या निकालांमुळे केकेआरने अजिंक्य रहाणेला कर्णधारपदी कायम ठेवण्याच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौ संघासमोर सलग पराभव आणि कर्णधाराच्या वादग्रस्त निर्णयांनंतर एक कठीण आव्हान आहे.

कर्णधाराची कामगिरी त्याच्या संघावर अवलंबून असते ही म्हण ऋषभ पंत आणि अजिंक्य रहाणे यांच्यासाठी एक कटू सत्य आहे. अपेक्षेप्रमाणे निकाल न लागल्याने चिंता अधिकच वाढली आहे.

श्रीलंकेचा गोलंदाज मथिशा पाथिरानाच्या पुनरागमनामुळे केकेआरला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

केकेआरला पहिला विजय नोंदवण्यासाठी सात सामने लागले हा विजय सांघिक पुनरुत्थानापेक्षा रिंकू सिंग्च्या वैयक्तिक कौशल्याच्या जोरावर थोडक्यात बचावला.

केकेआर संघ एकना स्टेडियममध्ये काहीशा आत्मविश्वासाने उतरू शकतो, पण केवळ तीन गुणांसह, त्यांना आता त्यांच्या उर्वरित सात सामन्यांमधून किमान सहा विजय मिळवणे आवश्यक आहे, जे एक अशक्यप्राय काम वाटते.

ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील संघही स्पर्धेतून लवकर बाहेर पडण्याच्या मार्गावर आहे. त्यातच सलग चार पराभव आणि कर्णधाराच्या मैदानातील वादग्रस्त निर्णयांची मालिका यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# लुंगी नगिदीला मैदानावर गंभीर दुखापत

◆ **नवी दिल्ली, २५ एप्रिल**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध पंजाब किंग्स यांच्यातील सामन्यादरम्यान शनिवारी नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर लुंगी नगीदीला गंभीरपणे दुखापत झाली. चेडू लागल्यामुळे तो मैदानावरच पडला व त्याला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आले. त्यामुळे सामन्यादरम्यान काही क्षण चिंतेचे क्षण निर्माण झाले होते.

झेल घेण्याचा प्रयत्न करताना हा दक्षिण आफ्रिकी वेगवान गोलंदाज डोक्यावर जोरात आदळला. त्यामुळे तातडीने वैद्यकीय मदत देण्यात आली



डोक्याला चेंडू लागल्याने लुंगी नगिदीला मैदानावर पडला, तो क्षण

आणि खेळ थांबविण्यात आला होता.

पंजाब किंग्सचा सलामीवीर प्रियांश आर्याने दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला आणि चेंडू हवेत उंच उडाला, तेव्हा ही घटना घडली. मिड-ऑनवरून मागे धावत आलेल्या नगिदीने झेल पूर्ण करण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा तोल गेला आणि तो डोक्यावर कठीण मैदानावर पडला. तो वेदनेने विव्हळत जमिनीवर पडून राहिला आणि फिजिओ व संघाचे डॉक्टर धावत आले.

डॉक्टरांच्या तपासणीला लुंगी नगिदी प्रतिसाद देत असताना, खबरदारीचा उपाय म्हणून मानेला आधार देणारे ब्रेस (नेक ब्रेस) लावण्याचा सल्ला देण्यात आला. थोड्याच वेळात रुग्णवाहिका आली आणि पुढील तपासणीसाठी नगिदीला रुग्णालयात नेण्यात आले. ◀(वृत्तसंस्था)

# वैभव सूर्यवंशीचे शानदार शतक

### राजस्थान रॉयल्स ६ बाद २२८

◆ **जयपूर, २५ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमिर लीग हंगामात शनिवारी सवाई मानसिंग स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या आयपीएल सामन्यात राजस्थान रॉयल्सच्या वैभव सूर्यवंशीने शानदार शतक झळकावले. वैभवचे शतक व ध्रुव जुरेलने झळकावलेल्या अर्धशतकाच्या बळावर राजस्थान रॉयल्सने मर्यादित २० षटकांत ६ बाद २२८ धावा काढल्या आणि हैदराबादसमोर विजयासाठी २२९ धावांचे लक्ष्य ठेवले.

**पॅट कमिन्सचे पुनरागमन**


सनरायझर्स हैदराबादसाठी कर्णधार पॅट कमिन्सचे पुनरागमन झाले असून, या हंगामात तो पहिल्यांदाच संघाचे नेतृत्व करीत आहे. कमिन्सने दिलशान मधुशंकाची जागा घेतली आहे, तर हैदराबादच्या अंतिम एकादशामध्ये हर्ष दुबेच्या जागी प्रफुल्ल हिंगे परतला.

कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

यशस्वी जयस्वाल व वैभव सूर्यवंशी ही राजस्थान रॉयल्सची युवा सलामी जोडी मैदानावर आली. यशस्वीने वैभवला उत्तम साथ देत ४० धावांची सलामी भागीदारी केली, परंतु यशस्वीची फलंदाजी बहरण्याआधीच त्याला ईशान मलिंगाने क्लासेनकडे झेल सोपविण्यास फाग पाडले. यशस्वी जयस्वालने ८ चेंडूंत १० धावा केल्या, पुढे वैभव सूर्यवंशी व ध्रुव जुरेलची जोडी खेळपट्टीवर चांगलीच रमली आणि त्यांनी राजस्थानच्या धावसंख्येला बळकट केले.

**ध्रुव जुरेलचे ३४ चेंडूंत अर्धशतक**

यादरम्यान सूर्यवंशीने १५ चेंडूंत आणखी एक अर्धशतक झळकावले व



वैभव सूर्यवंशीची ३७ चेंडूंत १०३ धावांची शतकी खेळी

ध्रुव जुरेलेनेही ३४ चेंडूंत आपले अर्धशतक साजरे केले. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ११२ धावांची भागीदारी करून संघाला १५२ धावांचा टप्पा गाठून दिला.

नितीश कुमार रेड्डीच्या गोलंदाजीवर एक सुंदर सरळ ड्राईव्ह मारून ध्रुव जुरेलने चौकार लगावला. त्यानंतर रेड्डीने पुढच्याच वैध चेंडूवर त्याला बाद केले. चेंडू हार्ड लेंथ टाकल्यावर त्याला थोडा जास्त उसळी मिळाली आणि त्याने पुल करण्याचा प्रयत्न केला असता चेंडू एक्स्ट्रा-कव्हरला तिरकस झेल देऊन बाद झाला. ध्रुव जुरेलने ३५ चेंडूंत ८ चौकार व एका षट्कारसह ५१ धावांची अर्धशतकी खेळी केली.

पुढे वैभव सूर्यवंशीने कर्णधार रियान परागच्या साथीने आपले शतक साजरे केले, मात्र तो साकिब हुसेनच्या वेगवान गोलंदाजीला बळी पडला. साकिबने त्याला पायचित केले. वैभव सूर्यवंशीने अवघ्या ३७ चेंडूंत १०३ धावांची शतकी खेळी केली, यात त्याने ५ चौकार व २ षट्कार खेचलेत. वैभव बाद झाला, तेव्हा राजस्थान रॉयल्सने १३.५ षटकांत ३ बाद १७० धावांचा टप्पा गाठला होता.

कर्णधार रियान पराग (७) पुनरागमन करणाऱ्या पॅट कमिन्सच्या वेगवान माऱ्या बळी पडला, मात्र त्यानंतर डोनोव्हन फरेरा व शिमरॉन हेटमायरने संघाला दोनशे धावांचा टप्पा ओलांडून दिला. मलिंगाच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी फरेराने १६ चेंडूंत ३३ धावांची भर घातली. नंतर प्रफुल्ल हिंगेने शिमरॉन हेटमायरच्या (११) रुपाने आपला पहिला बळी मिळविला. रवींद्र जडेजा (४) व जोफ्रा आर्चरने (२) नाबाद खेळी करीत राजस्थान रॉयल्सला मर्यादित २० षटकांत ६ बाद २२८ धावा रचून दिल्या.

हैदराबादकडून ईशान मलिंगाने २ बळी, तर पॅट कमिन्स, प्रफुल्ल हिंगे, साकिब हुसेन व नितीश कुमार रेड्डीने प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळविले.

◀(वृत्तसंस्था)

# सेलंगट, किबेटचे विजेतेपद कायम राखण्याचे लक्ष्य

### टीसीएस १०के शर्यत आज

◆ **बंगळुरू, २५ एप्रिल**

युगांडाचे धावपटू सारा चेलंगट आणि हर्बर्ट किबेट हे बंगळुरू येथे रविवारी होणाऱ्या टीसीएस १० के शर्यतीत आपली छाप पाडण्यास सज्ज झाले आहेत. या प्रतिष्ठित रोड रेसमध्ये वर्चस्वपूर्ण कामगिरी करण्याचे त्यांचे ध्येय आहे.

सारा चेलंगट हिचे लक्ष्य टीसीएस १०के मधील आपले विजेतेपद राखणे हे असून, आपल्या मागील विजयाच्या वेळेत सुधारणा करण्याचा ती प्रयत्न करीत आहे.

हर्बर्ट किबेट हा पुरुषांच्या गटातील विजेतेपदाचा एक प्रबळ दावेदार आहे. कॅस्टेलॉन येथील १० किमी शर्यतीतील त्याच्या प्रभावी विजयामुळे त्याचा आत्मविश्वास दुणावला आहे. महिलांच्या शर्यतीत




टीसीएस १०के शर्यतीत सहभगी होणारे युगांडाचे धावपटू

ब्रेंडा जेपचिरचिर आणि फंताये बेलायनेह या सारा चेलंगटसमोर मोठे आव्हान उभे करण्याची शक्यता आहे. २०२३ चा उपविजेता रॉड्रिग क्विझेरा हा बंगळुरू १० किमी शर्यतीचा विक्रम मोडण्यासाठी ठामपणे सज्ज झाला आहे. बंगळुरू येथील टीसीएस १०के ही जागतिक ॲथ्लेटिक्स सुवर्ण दर्जा प्राप्त शर्यत असून, ती जगभरातील अव्वल दर्जाच्या आंतरराष्ट्रीय ॲथ्लिट्सना आकर्षित करते.

गत वर्षी जेव्हा साराने विजेतेपद पटकावले होते, तेव्हा ती पूर्णपणे तंदुरुस्त नव्हती; परंतु यावेळी ती कोणत्याही दुखापतीशिवाय पूर्णपणे तंदुरुस्त आहे आणि २०२५ मधील आपला ३१ मिनिटे ७ सेकंदांचा विजयी वेळ सुधारण्याचा ती प्रयत्न करत आहे.

**यावेळी मी पूर्णपणे तंदुरुस्त : सारा चेलंगट**

गत वर्षाच्या तुलनेत मला यावेळी पूर्णपणे तंदुरुस्त वाटत आहे. पाठीच्या दुखापतीचा सामना करत असतानाही मी २०२५ चे विजेतेपद मिळवले होते. मी वेगाने सावरले आहे आणि माझे विजेतेपद कायम राखण्यासाठी, त्यापेक्षाही चांगला वेळ नोंदवण्यास मी सज्ज आहे, असे साराने शर्यतीपूर्वीच्या नेहमीच्या पत्रकार परिषदेत सांगितले.

◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### निधी संदर्भात आमदारांनी जनतेची दिशाभूल करु नये : नगराध्यक्ष ॲड. साठे

**माढा, दि. २५ एप्रिल-**



महाराष्ट्र राज्य शासनाने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानांतर्गत माढा नगरपंचायतीस १ कोटी निधी मंजूर झालेला आहे. परंतु या तालुक्याच्या आमदारांनी याचे श्रेय घेऊन जनतेची दिशाभूल करू नये, असे नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे यांनी पत्रकार परिषदेत म्हटले आहे. २३ जानेवारी २०२६ रोजी शासनाच्या माध्यमातून हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान राबवण्याचे ठरवले. यानुसार १८ फेब्रुवारी २०२६ रोजी या योजनेंतर्गत नगरपंचायतीचा ठराव घेऊन निधीसाठी पाठपुरावा केला. या अभियानांतर्गत फक्त माढ्यासाठीच नव्हे तर शासनाच्या वतीने राज्यातील ३० महानगरपालिकांना प्रत्येकी ५ कोटी आणि ३९४ नगरपालिका व नगरपंचायतींना प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निधी नुकताच मंजूर झाला आहे. मात्र आमदार या कामाचे श्रेय घेत, जनतेची दिशाभूल करत असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी मुख्याधिकारी नेहा कंठे, सभापती रेशमा लंकेश्वर, वंदना लंकेश्वर, निर्मला थोरात, नगरसेवक नाना साठे आदी उपस्थित होते.



### छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बागेश्वर बाबांचे वादग्रस्त वक्तव्य; कारवाईची मागणी

**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

बागेश्वर महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी बिनडोक पणाचे वक्तव्य केले आहे. जे वक्तव्य केले आहे तसे इतिहासात कोठेही नाही, प्रथम त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्राचा आणि इतिहासाचा अभ्यास करून बोलावे. अश्या अर्धवट बागेश्वर बाबा वर कायदेशीर कारवाई करण्यात अशी मागणी मराठा महासंघाचे जेष्ठ नेते दास शेळके यांनी केली आहे. नागपूर येथील एका कार्यक्रमात बागेश्वर धामचे प्रमुख बागेश्वर महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी बिनडोक पणाचे वक्तव्य केले आहे. त्यांनी जे वक्तव्य केले आहे तसे इतिहासात कोठेही नाही, प्रथम त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्राचा आणि इतिहासाचा अभ्यास करून बोलावे, जर त्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल इतिहास जाणून घ्यावयाचे झाल्यास त्यांनी महाराष्ट्र मध्ये यावे आणि इतिहास समजून घ्यावा, अश्या अर्धवट बागेश्वर बाबा वर कायदेशीर कारवाई करण्यात अशी मागणी मराठा महासंघाचे जेष्ठ नेते दास शेळके यांनी केली आहे.




### पिंपळनेर येथील 'आर्या'मध्ये विज्ञान प्रदर्शनात १५०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**टेंभुर्णी, दि. २५ एप्रिल-**

आर्या पब्लिक स्कूल, सरस्वती विद्यामंदिर पिंपळनेर आणि आर्या ज्युनिअर कॉलेज पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. प्रदर्शनास विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रदर्शनामध्ये तब्बल १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत ३५० वैज्ञानिक उपकरणे व प्रकल्पांचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेच्या जोरावर विविध वैज्ञानिक संकल्पना प्रभावीपणे सादर केल्या. प्रदर्शनाचे उद्घाटन सीबीएसई रिजनल ऑफिस पुणे येथील सेक्शन ऑफिसर पल्लवी माळी यांच्या हस्ते करण्यात आले. पल्लवी माळी यांनी यावेळी विज्ञानाचा दृष्टिकोन पुस्तकांपुरता मर्यादित न राहता तो दैनंदिन जीवनात उपयोगात आणला गेला पाहिजे, असे आवाहन केले. उपक्रमाचे आयोजन जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा प्रणिता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सौरऊर्जेची निर्मिती, प्लास्टिकमुक्तीचा संदेश, स्मार्ट शेती आदींविषयी समाजोपयोगी आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. प्राचार्य रवींद्र लोखंडे, प्राचार्य महादेव सुरवसे, प्राचार्य सागर थोरात, प्राचार्य डॉ. नितीन उबाळे, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य राजेंद्र मारकड, मुख्याध्यापिका प्रमिला मगर, अश्विनी गरड, सतिश वरपे, कुमार बडे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### इंदुमती स्वामी



**वेळापूर, दि. २५ एप्रिल-**

वेळापूर (ता. माळशिरस) येथील इंदुमती भिमाशंकर स्वामी यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या मन्मथ स्वामी व महेश स्वामी यांच्या आई होत.

### अरुण कापसे



**बार्शी, दि. २५ एप्रिल-**

तालुक्यातील पानगाव येथील अरुण खंडू कापसे (वय ७६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. अरुण कापसे हे पानगावचे माजी ग्रामपंचायत सदस्य तसेच पानगाव येथील श्रीकृष्ण सहकारी दूध संस्थेचे चेअरमन होते. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच भाऊ, एक बहीण, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# एनएमएमएस परीक्षेत सांगोला विद्यामंदिर राज्यात तिसऱ्या क्रमांकावर

### ५६ विद्यार्थ्यांना मिळणार २७ लाखांची शिष्यवृत्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ एप्रिल -**



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेकडून आयोजित केलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे ५६ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून या विद्यार्थ्यांना पुढील चार शैक्षणिक वर्षांमध्ये एकूण २६ लाख ८८ हजार शिष्यवृत्ती मिळणार आहे. आर्थिक दुर्बल घटकातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या लाभदायक ठरत आहे.

शिष्यवृत्ती मिळवण्यात सांगोला विद्यामंदिर प्रशालेने सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांकाची परंपरा कायम राखली असून राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. सर्व विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख निलेश जंगम, मंगेश म्हमाणे, राजेंद्र ढोले, अमोल महिमकर, मनीषा पांडे, शितल कांबळे, सिताराम राऊत, रोहिणी शिंदे, सचिन बुंजकर, कविता राठोड, विनीत चिकमने, शिवानंद लोखंडे, सविता गायकवाड, अजित मोरे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापक चारुदत्त जगताप, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरुटे, परीक्षा विभागप्रमुख नामदेव खंडागळे व सिताराम राऊत यांनी अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थी पुढील प्रमाणे-

सुबोधिनी इंगवले, विक्रांत बनकर, श्रेयस देशमुख, आराध्या पाटील, हर्षवर्धन शिंदे, ऋषिकेश केदार, स्वरा बाजारे, स्वराज शेळके, प्रणिती चव्हाण, प्रथमेश भोसले, प्रतीक सादिगले, अक्षदा भोकरे, ओम लिगाडे, स्नेहल सावंत, श्रीवर्धन लिगाडे, श्रुती होवाळ, श्रावणी भाले, श्रावणी बुरांडे, श्रेयश येडगे, तेजस्वी यादव, केतकी साळुंखे, तनुजा बंडगर, पार्थ सावंत, कल्याणी वाघमारे, आदिती वेदपाठक, फलक शेख, कल्याणी चव्हाण, जयदीप जगताप, श्रेयश पवार, श्रेयश पाटील, अस्मिता पाटील, आयान शेख, सार्थक महाजन, भक्ती गुळमिरे, श्रवण राऊत, श्रेया बनकर, शुभम कुंभार, रिदा इनामदार, निकिता माळी, प्रणिती झाडबुके, अर्जुन आदलिंगे, गौरव लिंगे, स्वरा गुळमिरे, व्यंकटेश कपडेकर, पार्थ गावडे, श्रुती खरात, सिद्धी लवटे, प्रेम निर्मळ, सुप्रिया खडसरे, वैभव सुरवसे, समर्थ गेजगे, सार्थक कांबळे, गीतांजली गेजगे, स्नेहा कांबळे, अनुष्का खडतरे, अस्मिता माने

### ८१ गुंठे जमीन देतो म्हणून १ कोटींची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि २५ एप्रिल-**

८१ गुंठे जमीन खरेदी करून देतो, असे आमिष दाखवत एक कोटी रुपये उकळून फसवणूक केल्याप्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार जुलै २०२१ ते डिसेंबर २०२१ या कालावधीत घडला. लक्ष्मण प्रेमनाथ सिद्धुल (रा. भद्रावती पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यादव्वाबाई शंकर पसनूर, अरुणा प्रसाद गुंडेटी, यादगिरी व्यंकटप्पा पिट्टा, निर्मला यादगिरी पिट्टा, आनंद शंकर पसनूर व मुरलीधर पिट्टा असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

मजरेवाडी परिसरातील जुना सर्व्हे क्र. ३७७/(२/११अ-१२), नवीन सर्व्हे क्र. ९९/(२/११अ-१२) तसेच सध्याच्या सातबारावरील गट क्रमांक ९९/१२ मधील ८१ गुंठे जमीन फिर्यादी सिद्धुल व त्यांचे भागीदार आनंद गोसकी यांना देण्याचे ठरले होते. त्या व्यवहारानुसार दोघांकडून रोखीने ७५ लाख ५० हजार रुपये घेण्यात आले. तसेच, जमिनीचे खरेदीखत करून देणे, तार कंपाऊंड मारणे, बोअर मारणे अशी कामे करण्यासाठी २७ लाख ५० असे एकूण पाच महिन्यांत एकूण एक कोटी रुपये संबंधितांना दिले. मात्र, संशयितांनी कराराची मुदतवाढ करण्यास टाळाटाळ केली. शिवाय जमीन देण्यासही टाळाटाळ करून फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार तरंगे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.



### बार्शीत गांजा विक्री, दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

पोलिस अधीक्षक यांच्या पथकाने बार्शीत गांजा विक्री व अवैध दारू अड्ड्यांवर धडक कारवाई करत एकूण १ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना देशी-विदेशी दारूची अवैधरित्या विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती.

त्यानुसार पोलीस निरीक्षक कमलाकर गडमे व विशेष पथकाला कारवाईचे निर्देश दिले होते. २३ एप्रिल २०२६ रोजी बार्शी शहर पोलीस ठाणे हद्दीत सुभाषनगर, ताडसौंदणे रोड परिसरातील मिरगणे विटभट्टीजवळ सापळा रचून पोलिसांनी 'सिने स्टाईल' कारवाई केली. यावेळी किरण अनिल जाधव व रोहित बापू खंडागळे (दोघे रा. पांगरी, ता. बार्शी) यांच्याकडून ५३४.९६ ग्रॅम गांजा, रोख रक्कम व इतर साहित्य असा ८९ हजार ८८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पांडुरंग सोमनाथ सोनवणे (रा. मांडेगाव, ता. बार्शी) तसेच गांजा पुरवठादार सचिनकुमार मिरगणे व राजेशकुमार मिरगणे (दोघे रा. सुभाषनगर, बार्शी) यांच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

तपास पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे करत आहेत. तसेच अवैधरित्या देशी-विदेशी दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने एमएसईबी कार्यालयासमोर असलेल्या श्री गणेश पान शॉप येथे छापा टाकला. या कारवाईत ७० हजार १९५ रुपयांचा दारू साठा जप्त केला. याप्रकरणी अक्षय दीपक सरकाळे (रा. झाडबुके मैदान, बार्शी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

### खा. प्रणिती शिंदे यांच्या गाव भेट दौऱ्याला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २५ एप्रिल-**



खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या मंगळवेढा तालुक्यातील अकोलो गाव भेट दौऱ्याला शेतकरी, ग्रामस्थांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. पाण्याचे, डीपीचे, पाणंद रस्ते निर्मिती, महिला बचत गट, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्सनेही आपली गाऱ्हाणी मांडली. त्यावर मी तुमच्यासाठीच खासदार झाले आहे, मला हक्काने संपर्क करण्याचे आवाहन खा. शिंदे यांनी केले.

यावेळी रविंद्र शिवशरण, प्रशांत साळे, रविकिरण कोळेकर, संदीप पवार, सुनिता अवघडे, ज्ञानेश्वर सोर्डीकर, मनोज यलगुलवार, बापूसाहेब अवघडे, निसार तांबोळी, श्रीशैल माळी, भोरकडे, सुधीर इंगळे, सुधाकर शिंदे, भिवा पिसे, विनोद सरवदे, महेंद्र शिवशरण, संजय सरवदे, किशोर कदम, सिताराम जवंजाळ, विशाल सरवदे, अशोक रणदिवे, सुनील सरवदे, मंगल साळस्कर, भामाबाई रणदिवे, राजकुमार रणदिवे, मीनाक्षी सरवदे, मनीषा सरवदे, मंगल शिवशरण, बायडा साळसकर, मथुबाई इंगळे, रेखा सरवदे, रतन झेंडे, विमल रणदिवे, खंडू भोसले, शारदा शिवशरण, आकाश बुरांडे, ज्योती सरवदे, रंजना रणदिवे, शितल कदम, सारिका मोरे, अंजली रणदिवे, सुनिता शिंदे, पारूबाई शिवशरण, मंदाबाई इंगळे, रतन बुरांडे, गीतांजली रावळ, रोहिणी सरवदे, संदीप इंगळे आदी उपस्थित होते.

### गादेगावजवळील उजनी कालव्यातून बंधाऱ्यात पाणी सोडा

**पंढरपुरच्या पाणीटंचाईवर माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ एप्रिल-**



पंढरपुरमधील तीव्र पाणीटंचाई सोडवण्यासाठी उजनी कालव्यातील गादेगाव येथून पाणी बंधाऱ्यात सोडावे, अशी मागणी पंढरपुरचे माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांनी केली आहे.

भीमा पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडे शिरसट यांनी याबाबत निवेदन दिले आहे. पंढरपूर येथील भीमा नदी पात्र कोरडे ठणठणीत पडले आहे. परिणामी पंढरपूर शहराचा पाणी प्रश्न गंभीर बनला आहे. गादेगाव येथून कालव्यातून बंधाऱ्यात थेट पाणी सोडल्यास तात्पुरती तरी शहराची समस्या सुटेल. सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी पंढरपूर शहरासाठी पाणी सोडण्याचे आदेश दिले होते. मात्र, आलेगाव खुर्द-भांडगाव येथे बंधाऱ्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनामुळे अद्याप प्रत्यक्षात पाणी सोडलेले नाही. परिणामी शहरातील नागरिकांना पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. जनतेचे हाल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान शहरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये आणि पंढरपूरकरांना दिलासा मिळावा, यासाठी प्रशासनाने त्वरित निर्णय घ्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे. सध्या पंढरपूरकरांचे लक्ष प्रशासनाच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे. पाणी प्रश्नावर तातडीने तोडगा निघणार का याकडे सर्वांचे लक्ष आहे.

**२०१७ सालची आठवण**

सध्याच्या पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर भाजपचे माजी शहराध्यक्ष तसेच पंढरपूर नगरपालिकेचे माजी पाणीपुरवठा सभापती विक्रम शिरसट यांनी पुढाकार घेत पुन्हा एकदा २०१७ सालची आठवण करून दिली आहे. मे २०१७ मध्येही शहरात अशीच गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी पाणीपुरवठा सभापती म्हणून कार्यरत असलेल्या विक्रम शिरसट यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखत उजनी कालव्यातील गादेगाव येथून पाणी बंधाऱ्यात सोडण्याची व्यवस्था करून पंढरपूर शहराचा पाणीप्रश्न तात्पुरता मार्गी लावला होता. आता पुन्हा तशीच परिस्थिती निर्माण झाल्याने विक्रम शिरसट यांनी भीमा पाटबंधारे विभागाकडे निवेदन देऊन तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली आहे.

### बार्शीत गोमांस वाहतूक प्रकरण उघड; दोघांना अटक

**डायल ११२ च्या सतर्कतेमुळे कारवाई; रिक्षा, मोटरसायकल करण्यात आले जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ एप्रिल-**

बार्शी शहरात गोवंशीय जनावरांच्या मांसाची बेकायदेशीर वाहतूक केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी दोनजणांना अटक करुन मोठी कारवाई केली आहे. डायल ११२ सेवेला मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

पोलीस शिपाई शरद दत्तू साळवी हे दि. २३ एप्रिल रोजी रात्री ८ ते २४ एप्रिल रोजी सकाळी ८ या वेळेत डायल ११२ कर्तव्यावर होते. यावेळी सकाळी सुमारे ७ वाजता एका नागरिकाने फोनद्वारे माणकेश्वर (ता. भूम, जि. धाराशिव) येथून बार्शीकडे गोमांस वाहतूक होत असल्याची खबर दिली. माहितीची तात्काळ दखल घेत पोलिसांनी दिलेल्या ठिकाणी संशयित वाहनांचा शोध घेतला. यावेळी एमएच ०८ ईएल ०८६३ क्रमांकाची ऑटो रिक्षा, एमएच १३ बीवाय ८५४० क्रमांकाची मोटारसायकल ही वाहने अडवली. वाहनांच्या तपासणीत त्यामध्ये गोवंशीय जनावरांचे कापलेले मांस पांढऱ्या पिशव्यांमध्ये भरुन ठेवलेले आढळून आले. एकूण सुमारे १७५ किलो मांस (अंदाजे किंमत ३५ हजार रुपये) जप्त करण्यात आले.ऑटोरिक्षा, मोटारसायकल असा एकूण १ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. पंचांसमक्ष वाहनांची तपासणी केली असून, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मांसाचे नमुने घेऊन सीलबंद केले आहेत.

पुढील तपासासाठी हे नमुने रासायनिक परीक्षणासाठी पाठवण्यात येणार आहेत. पोलिसांनी जमील निसार सौदागर (वय ४५), फैज वाहब सौदागर (वय २३) (दोघेही रा. मंगळवार पेठ, बार्शी ) यांना ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

### मंद्रुप पोलिसांकडून जबरी चोरी उघडकीस

**सिनेस्टाईलने अवघ्या सहा तासात बजाविली कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. २५ एप्रिल-**

नांदणी येथील आरटीओ टॅक्स चुकविण्यासाठी मंद्रूप कुरघोटमार्गे जड वाहने जाण्याच्या प्रमाणात वाढ होत आहे. यामुळे मंद्रूप, कुरघोट, माळकवठे व टाकळी येथील तरूणांकडून वाहनचालकांची लूटमार सुरू आहे. त्यामुळे आरटीओच्या दुर्लक्षामुळे तरूण व्यसनाधीन बनून गुन्हेगारीकडे वळत आहेत. त्यामुळे मंद्रूपमधील तरूणांकडून जबरी चोरीचा गुन्हा घडला असून मंद्रूप पोलीसांनी शिताफीने आरोपींना अटक केली आहे. मात्र जड वाहने थांबवून लूटमार करणार्या तरूणांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

मंद्रूपमध्ये २४ एप्रिल रोजी रात्री घडलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा अवघ्या सहा तासांत विजेच्या वेगाने उलगडा करण्यात मंद्रूप पोलिसांना यश मिळाले. मंद्रूप पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे व त्यांच्या सहकार्यांनी सिनेस्टाईल पाठलाग करीत मंद्रूप पोलिसांनी आरोपींना अटक करीत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या आहेत.




यामुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण दिसून येत आहे.

फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आयशर टेम्पो मधून मालवाहतूक करत असताना मळसिध्दप्पा मंदिर परिसरात तीन अज्ञात इसमांनी त्यांचा टेम्पो अडवून जबरदस्तीने वाहन थांबवले. फिर्यादीस मारहाण करून अंदाजे २०,००० रूपये रक्कम जबरदस्तीने हिसकावून घेतली. त्यामुळे फिर्यादींनी मंद्रूप पोलीसात तक्रार दिल्यानंतर सदर घटनेची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रूप पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक शंकर पटवारी यांना सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सूचना व मार्गदर्शन केले. त्या अनुसार पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, सहायक फौजदार बापू शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल माजिद शेख, संदीप काळे, चालक श्रीशैल शिवणे यांचे पथक तात्काळ तपासाला लागले. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय बातमीदारांच्या मदतीने आरोपींचा माग काढण्यात आला. पोलिसांनी अत्यंत शिताफीने व धाडसी कारवाई करत सिने-स्टाईल थरारक पाठलाग करून दोन आरोपींना जेरबंद केले. तर तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. अटक आरोपींकडून गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्याची कार्यवाही सुरू असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डांगे करीत आहेत.



### आ. आवताडे, परिचारकांकडून विकासकामांची पाहणी

**काही कामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आणले होते**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ एप्रिल-**

पंढरपूर शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या नामसंकीर्तन सभागृह, राष्ट्रमाता जिजाऊ उद्यान तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारतीच्या कामाची शनिवारी दि. २५ एप्रिल रोजी आमदार समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांसह संयुक्त पाहणी केली.

पाहणीप्रसंगी आमदार समाधान आवताडे यांनी कामाची सद्यस्थिती जाणून घेऊ अपूर्ण कामे लवकरात लवकर आणि दर्जेदार करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच भाजप व तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगरसेवक, संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी, पंढरपूर नगरपरिषदेचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. आमदार आवताडे म्हणाले की, ' नागरिकांच्या मागणीनूसार वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करून उद्यानासाठी निधी उपलब्ध करून दिला. त्यानूसार एक वर्षापासून जिजामाता उद्यानाचे काम सुरू होते. नागरिकांच्या मागणीनुसार लोकार्पण केले.

उद्घाटनादरम्यान काही काम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आणले होते. त्यांची पाहणी करून उद्यान चालू असताना काम पूर्ण करून घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन कामाची पाहणी केली. अपूर्ण कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.' तसेच याबाबत तात्काळ उपाय योजना न केल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचा इशाराही आमदार आवताडे यांनी दिला.

नामसंकीर्तन कीर्तन सभागृहाचे काम पूर्णत्वास आले आहे. आषाढी वारीच्या मुहूर्तावर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्याचा प्रयत्न असल्याचे ही आमदार अवताडे यांनी सांगितले.

## महत्वाचे...



**सोलापूर : स्वर सम्राट मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या स्मृतिदिना निमित्त आयोजित गणेश कला क्रीडा केंद्र पुणे येथील कार्यक्रमात मंगेशकर पुरस्कार विजेते व जगातील सर्वात मोठे शांततेचे नोबेल पारितोषक मिळविणारे पहिले भारतीय आदरणीय श्री कैलास जी सत्यार्थी यांच्याशी संवाद साधताना अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले.**



## घोंगडे वस्तीत महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

सोलापूर, दि. २५ एप्रिल-

महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त घोंगडे वस्ती येथील 'बसव भक्त मंडळा'च्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन प्रसिद्ध उद्योजक विष्णू भुमकर आणि सुभाष जकापुरे यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी युवा नेते तथा उद्योजक शिवानंद विजापुरे, उमेश बाबुराव जमादार, परमेश्वर खाडे, भागांना बगले, दयानंद विजापूरे, महेंद्र ओनामे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला घोंगडे वस्ती परिसरातील नागरिक, वार्ड मधील बसव भक्त आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन बसव भक्त मंडळाच्या कार्यकर्त्यांनी चोख बजावले. परिसरातील वातावरण 'महात्मा बसवेश्वर महाराज की जय' या घोषणांनी दुमदुमून गेले होते.

## पत्रकार संजय पाटील यांची महाराष्ट्र भूषण पत्रकार दर्पणरत्न पुरस्कारासाठी निवड

**पिलीव, दि. २५ एप्रिल-**



महाराष्ट्र शिखर प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्र भूषण पत्रकार दर्पणरत्न पुरस्कार २०२६ साठी माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील पत्रकार संजय ज्ञानेश्वर पाटील यांची निवड झाली आहे. त्यांच्या पत्रकारितेतील सातत्यपूर्ण, उल्लेखनीय आणि समाजभिमुख कार्याची दखल घेऊन प्रतिष्ठानने त्यांना या मानाच्या पुरस्कारासाठी पात्र ठरवले आहे. पुरस्काराचा वितरण सोहळा २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत वाघेश्वर पॅलेस, वाघोली, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत संजय पाटील यांना हा मानाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

# प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा : जि.प. सीईओ कुशल जैन

### पाच विभागांचा घेतला सविस्तर आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ एप्रिल-**

जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रशासनात वेग आणण्यास सुरुवात केली आहे. पदभार घेतल्यापासून त्यांनी आतापर्यंत पाच महत्त्वाच्या विभागांचा सविस्तर आढावा घेत प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनात हालचालींना वेग आला आहे.



मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ही त्यांची पहिलीच नियुक्ती असल्याने जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभागाची कार्यपध्दती, रचना, कर्मचारी व्यवस्था आणि प्रलंबित प्रश्न समजून घेण्यावर भर देत आहेत. कोणती कामे रखडली आहेत? ती का प्रलंबित राहिली? त्यामागील कारणे काय आहेत? आदींविषयी बारकाईने आढावा घेऊन ती कामे मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

सीईओ जैन यांनी आतापर्यंत बांधकाम विभाग क्रमांक दोन, आरोग्य विभाग, प्राथमिक शिक्षण विभाग, अर्थ विभाग आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचा आढावा घेतला आहे. या विभागांतील विविध योजना, विकासकामे, निधीची स्थिती, प्रशासकीय निर्णय, रखडलेल्या प्रस्तावांची माहिती जाणून घेतली. येत्या पाच ते सहा दिवसांत उर्वरित सर्व विभागांचाही आढावा घेणार आहेत.

पदभार स्वीकारल्यानंतर जैन यांनी जिल्हा परिषद मुख्यालयातील शिस्तीवरही भर दिला आहे. कार्यालयात उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात त्यांनी कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. या कारवाईमुळे कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून बहुतांश कर्मचारी वेळेवर कार्यालयात दाखल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### कथित बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांची माहिती

जिल्हा परिषदेच्या विविध विभागांत कार्यरत असलेल्या कथित बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांबाबत शासनाने झेडपीकडे माहिती पाठविल्याची चर्चा आहे. या प्रकरणात अद्याप ठोस कारवाई न झाले नाही, असे विचारले असता त्यांनी सांगितले की, संबंधित प्रकरणाची संपूर्ण माहिती मागवून वस्तुस्थिती तपासली जाईल आणि त्यानंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

### प्रशासनाला शिस्त, कामकाजाला गती

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांचे धडाकेबाज कामगिरीचा विचार करता, प्रशासनात शिस्त आणि कामकाजाला गती वाढणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रलंबित प्रश्न निकाली काढणे, विभागीय कामकाजाला चालना देणे आणि कर्मचाऱ्यांमध्ये वेळेचे भान निर्माण करणे यावर त्यांनी विशेष भर दिल्याचे दिसून येत आहे.

# सोलापूर जनता सहकारी बँकेच्या रक्तदान शिबिरात ११३ जणांचे रक्तदान

### उन्हाळ्यातील रक्ताच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर कौतुकास्पद उपक्रम : रुग्णांना दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे हीरक महोत्सवानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात ११३ जणांनी रक्तदान केले. उन्हाळ्यामध्ये निर्माण झालेल्या रक्ताच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर बँकेतर्फे आयोजित शिबिरामुळे रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

शिवस्मारक संकुलात झालेल्या या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक सी.ए. गिरीष बोरगावकर यांनीही रक्तदान केले.

याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे आणि डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे कोषाध्यक्ष सुहास जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. हेडगेवार रक्तपेढीने रक्तसंकलन केले. सोलापूर जनता सहकारी बँकेचे संचालक पुरुषोत्तम उडता, सी. ए. गिरीष बोरगावकर, संचालिका चंद्रिका चौहान, संचालक सी. ए. आनंद करवंदे, सुरेश चिक्कळी, महादेव न्हावकर, ॲड. मल्लिनाथ शहाबादे, विष्णू मोंढे, प्रमोद भुतडा, उपसरव्यवस्थापिका अंजली कुलकर्णी, उपसरव्यवस्थापक मकरंद जोशी, सहाय्यक सरव्यवस्थापक रामदास सिद्धूल, तुळशीदास गज्जम, रमेश मामड्याल, मुख्य कार्यालयातील अधिकारी मदन मोरे, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे सचिव मिलिंद फडके, कोषाध्यक्ष सुहास जोशी, संचालक माधव देशपांडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी बँकेचे सर्व शाखा व्यवस्थापक, मुख्य कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. बँकेच्या उपसरव्यवस्थापिका अंजली कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. अश्विनी येवतकर यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.




# 'श्रीकृष्ण गुरूकुल'चा जिल्हास्तरावर डंका

## सोहम सोनवणे जिल्ह्यात पाचवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणांना पैलू पाडणाऱ्या वाघोलीवाडी (ता. मोहोळ) येथील श्रीकृष्ण गुरूकुल या संस्थेने एनएमएमएसशिष्यवृत्ती परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. विद्यालयाचा विद्यार्थी सोहम सुरेश सोनवणे याने सोलापूर जिल्ह्यात ५ वा क्रमांक पटकावून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या या कठीण परीक्षेत श्रीकृष्ण गुरूकुलमधील एकूण २१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल १९ विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करत परीक्षेत यश मिळविले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना केंद्र सरकारकडून दरमहा एक हजार रुपये प्रमाणे चार वर्षांसाठी एकूण ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे अथक परिश्रम आणि शिक्षकांचे योग्य नियोजन कारणीभूत आहे. या परीक्षेसाठी प्रा. मोकाशी, प्रा. कदम, प्रा पांढरे यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले. त्यांनी घेतलेले सराव पेपर आणि विषयांची सखोल तयारी यामुळेच विद्यार्थ्यांनी ही उत्तुंग भरारी घेतली असल्याचे बोलले जात आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रमोद आवताडे, उपाध्यक्ष हणूमंत निकम आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर शिनगार यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील मुले योग्य मार्गदर्शन मिळाल्यास राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांत कसे नाव कमावू शकतात, याचे उत्तम उदाहरण श्रीकृष्ण गुरूकुलने समोर ठेवले आहे, अशा शब्दांत मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल वाघोलीवाडी आणि मोहोळ परिसरातून श्रीकृष्ण गुरूकुलच्या सर्व विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विठ्ठल मंदिर दर्शन मंडपातील स्वच्छतागृहात दारूच्या बाटल्या

### भाविकांमध्ये संतापाची लाट; कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ एप्रिल-**

पंढरपुच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भाविकांच्या सोयीसाठी उभारलेल्या दर्शन मंडप परिसरातील स्वच्छतागृहात चक्क दारूच्या बाटल्या, सिगारेटची पाकिटे तसेच गुटखा-मावाच्या पुड्या आढळून आल्या आहेत. भाविकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. भाजपचे माजी शहराध्यक्ष विक्रम शिरसट यांनी या प्रकाराची पोलखोल करत मंदिर समितीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



मंदिरातील स्वच्छतेचे काम बीव्हीजी कंपनीकडे सोपवले आहे. मात्र मंदिरासारख्या पवित्र ठिकाणी अशा प्रकारच्या वस्तू आढळून येत असल्याने संबंधित कंपनीचे अधिकारी व कर्मचारी यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. चुकीच्या कृत्यांना मूक संमती देणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी भाविकांकडून होत आहे. दर्शन मंडपातील स्वच्छतागृहात शहरातील तळीरामांचा वावर वाढल्याचे दिसून येत आहे. महिला भाविकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. पंढरीसारख्या पवित्र धार्मिक स्थळी अशा घटना घडत असतील तर प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित होत असल्याची प्रतिक्रिया भाविकांनी व्यक्त केली आहे.

प्रकरणाची सखोल चौकशी करून बीव्हीजी कंपनीचे टेंडर रद्द करावे. दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### प्रशांत डगळे यांनी लक्ष घालण्याची मागणी

आयपीएस अधिकारी प्रशांत डगळे यांनी या प्रकरणात स्वतः लक्ष घालून मंदिर परिसरातील सुरक्षाव्यवस्था आणि स्वच्छतेबाबत ठोस पावले उचलावीत, अशी मागणीही होत आहे.

# संत सावता माळी महाराजांच्या २१ फूट मूर्तीच्या कामास शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २५ एप्रिल-**



श्री संत शिरोमणी सावता माळी महाराजांच्या २१ फूट उंच आणि सुमारे दोन टन वजनाच्या मूर्तीच्या कामाचा शुभारंभ अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी संत सावता माळी महाराजांचे १७ वे वंशज रमेश महाराज वसेकर, ह.भ.प. बाळासाहेब ससाणे, भाजपचे नेते प्रदीप गारटकर तसेच नगराध्यक्ष भरत शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

शिल्पकार विक्रम वाघमोडे यांच्या 'गंधर्व आर्ट स्टुडिओ'मध्ये आयोजित या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य श्रीमंत ढोले, नगरसेवक शुभम पवार, गणेश राऊत, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत उंबरे यांसह इतर मान्यवर उपस्थित होते. ह.भ.प. बाळासाहेब ससाणे यांच्या पुढाकारातून साकारण्यात येणारी ही भव्य मूर्ती संत सावता माळी महाराजांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील श्री क्षेत्र अरण( ता. माढा) येथे प्रतिष्ठापित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# अतिक्रमणामुळे झाकाळलेला ऐतिहासिक टेहळणी बुरुज झाला खुला

### जतन, संवर्धन व रंगरंगोटीची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ एप्रिल-**

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यभुमीसह अक्कलकोटला राजघराण्याचा ऐतिहासिक वारसाही लाभला आहे. राजघराण्याच्या वारसा सांगणाऱ्या ऐतिहासिक वास्तुही शहरात आहेत. त्यापैकीच एक असलेला संस्थानकालीन टेहळणी नुकत्याच केलेल्या अतिक्रमणमुक्तीच्या मोहिमे मुळे किमान ३८ वर्षानंतर पुन्हा आपल्या वैभवासह सर्वांना पहायला मिळत आहे.



अक्कलकोट संस्थानकाळी टेहळणी बुरुजाला फार महत्व होते. टेहळणी बुरुजावरून संस्थानचे सैनिक पहारेकरी शत्रुच्या हालचालीवर नजर ठेवीत. संस्थानकाळी अक्कलकोट शहरात प्रवेशासाठी धाकटी वेस, मोठी वेस अशा प्रवेशद्वार कमानी होत्या, पहारेकरी होते. संरक्षणाकरिता टेहळणी बुरुज होते. या टेहळणी बुरुजापैकी एक बुरुज वटवृक्षस्वामी मंदिर परिसरात आहे. वटवृक्ष मंदिर परिसरात मोठया प्रमाणातील अतिक्रमणामुळे हा टेहळणी बुरुज पुर्णपणे झाकाळला होता. मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी मोठी अतिक्रमण विरोधी मोहिम राबविल्याने हा बुरुज साऱ्याच्या दृष्टीस पडत आहे. संस्थानकालीन या वास्तुची निगा, संरक्षण, रंगरंगोटी, डागडुजी व्हावी. यावर वाढलेली झाडी रासायनिक पावडरद्वारे फवारणी करुन वास्तुला धक्का न लावता सुकवता येणे शक्य आहे. टेहळणी बुरुजाचे जतन व्हावे. निगा राखावी, रंगरंगोटी करुन शहराच्या सौंदयात भर घालावी. पर्यटक, भाविक अधिकाअधिक अक्कलकोट तीर्थक्षेत्री यावेत त्यांचा येथे अधिवास वाढावा. जेणेकरुन पर्यटन व्यवसाय वृध्दीतून रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात असे प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे सुजाण नागरिकांकडून बोलले जात आहे.

## जनगणना कार्यक्रमासाठी ४४५ प्रगणक व ७५ पर्यवेक्षकांची नियुक्ती

**सांगोला, दि. २५ एप्रिल-**

### सांगोला तहसिलदार बाळूताई भागवत यांची माहिती

जनगणना कार्यक्रम २०२७ करिता सांगोला तालुका ग्रामीण साठी ४०३ प्रगणक गट आहेत. त्यासाठी प्रत्येक प्रगणक गटाकरिता ४०३ व राखीव ४२ असे ४४५ प्रगणक तसेच पर्यवेक्षक ६८ व राखीव ७ असे ७५ पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती सांगोला तहसिलदार बाळूताई भागवत यांनी दिली. सदर नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण सिंहगड कॉलेज, कमलापूर येथे सुरु असून एकूण २०० प्रगणक पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण ३ दिवसीय सत्रामध्ये ४ डिजिटल क्लास रूम मध्ये दि.२४ एप्रिल ते ६ मे या कालावधीत होणार आहे. सदर प्रशिक्षणास एकूण ८ मास्टर ट्रेनर आहेत. तसेच पहिल्या दिवशी पुनर्वसन सोलापूरचे उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे यांनी प्रशिक्षण स्थळी भेट देवून प्रगणक व पर्यवेक्षक यांना मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष घर यादी कार्यक्रम दि.१६ मे पासून प्रथम फेरी मध्ये सुरु होणार आहे. नवीन तरतुदी नुसार नागरिक दि.१ मे ते १५ मे या कालावधीत स्वगणना करू शकतात. तरी तालुक्यातील सर्व नागरिकांनी स्वगणना करावी असे आवाहन तहसिलदार बाळूताई भागवत यांनी केले आहे.

## ट्रेनी डॉक्टरने सुई टोचून कात्रीने घेतले मारून

**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून एका ट्रेनी डॉक्टरने हातावर सुया टोचून कात्रीने मारून घेतल्याची घटना सिव्हिल हॉस्पिटलच्या बी ब्लॉकमध्ये शुक्रवारी २४ एप्रिल रोजी घडली. स्वप्निल आव्हाड (वय २५ वर्ष, रा. अहिल्यानगर) असे डॉक्टरचे नाव असून ते सध्या सिव्हिल हॉस्पिटलमधील रेसिडेंट क्वार्टरमध्ये राहतात. शुक्रवारी सकाळी आठ वाजण्याच्या समारास त्यांनी बी ब्लॉकमधील एन.आयसीयु वार्डामधील एका खोलीत डाव्या हातावर सुई टोचून घेतली व त्यानंतर कात्रीने स्वतः मारून घेतले. यात हाताला जखम झाल्याने त्यांना त्वरित उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात मित्र डॉ.मयूर यादव यांनी दाखल केले.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## महत्वाचे...

### हत्यारासह घरात येऊन पती-पत्नीस दिली धमकी

**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**
हत्यारासह घरात येऊन पती-पत्नीस मारून टाकण्याची धमकी दिल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना जय मल्हार चौकात २३ एप्रिल रोजी दुपारी ४ ते २४ एप्रिल या पहाटे १ वाजेच्या दरम्यान घडली. पृथ्वी मोरे (रा.जय मल्हार चौक, बुधवार पेठ, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

याबाबत योगेश्वरी नागेश शिंदे (रा. जय मल्हार चौक, बुधवार पेठ, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी ह्या घरात असताना पृथ्वी मोरे हा फिर्यादीच्या राहत्या घराचे कंपाऊंड गेटला लाथ मारुन कोयत्यासारखे हत्यार घेवून घरात घुसला व फिर्यादीस हत्यार दाखवत तुझा नवरा कुठे आहे? असे म्हणत शिवीगाळ केली.आज तुझ्या नवऱ्याचे हातपाय तोडतो व तुला पण मारुन टाकीन, अशी धमकी देत परिसरात दहशत निर्माण केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस हवालदार पवार हे पुढील तपास करीत आहेत.

---

### जीवे मारण्याची धमकी; चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**
मध्यरात्रीच्या सुमारास एका महिलेच्या घरात कोयत्यासह घुसून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी चौघा जणांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नागेश शिंदे, रोहन पवार, युवराज पवार आणि विकास पवार (सर्वजण रा.सोलापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत सगुना सुरेश (रा.जय मल्हार चौक, बुधवार पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी व नात शुभांगी ह्या दोघी २४ एप्रिल रोजी पहाटेच्या वेळी घरी असताना नागेश शिंदे हा हातात कोयता घेवून फिर्यादीच्या घरात आला. त्याच्या सोबत इतर आरोपी देखील शिवीगाळ करत घरात येवून पृथ्वीराजने जर मला पैसे मागितले तर त्याला जिवंत सोडणार नाही, त्याला खल्लास करतो अशी दमदाटी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस हवालदार गौडनवरु हे पुढील तपास करीत आहेत.

---

### क्षुल्लक कारणावरुन तरुणास बेदम मारहाण

**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**
रस्त्यावरील दुचाकी काढण्यास सांगितल्याचा राग मनात धरुन एका तरुणाला लाथाबुक्क्याने बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना एकता नगर येथे २२ एप्रिल रोजी सायंकाळी घडली. दरम्यान या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुदस्सर इनामदार ऊर्फ मॅडी (रा.सोलापूर)असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत प्रथमेश प्रमोद तुपसमुद्रे (वय-२१, रा.पड्डी पाटील वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हा २२ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता एकता नगर समोरील पार्किंगमधून दुचाकी काढत असताना मुदस्सर इनामदार याने गाडी काढण्यास सांगितले. याचा राग आल्याने आरोपीने फिर्यादीस नाका व तोंडावर जोरदार तीन बुक्या मारल्या. खाली पाडून लाथाबुक्यांनी मारहाण केली. यावेळी फिर्यादीचा मित्र मदत करण्यासाठी मध्ये असता त्यालाही ढकलुन देऊन मी इथला दादा आहे. कोणी मदत केली तर त्याचं काही खरं नाही, असं दम भरत परिसरात दहशत पसरविल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस हवालदार डोके हे पुढील तपास करीत आहेत.

# महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापनात मोठी पुनर्रचना

## अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या केल्या निश्चित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ एप्रिल-**
शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्याच्या दृष्टीने सोलापूर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात मोठी पुनर्रचना करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी यासंदर्भात कार्यालयीन आदेश जारी केले आहे. विभागीय अधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

विभागीय कार्यालय क्रमांक १ ते ८ या स्वरुपात संरचना तयार करण्यात आली आहे. प्रभागनिहाय ५५ आरोग्य निरीक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. ड्रेनेज विभागातील कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या नियंत्रणाखाली काम करावे लागणार आहे. यामुळे समन्वय वाढून उघड्या गटारी, सार्वजनिक शौचालये व घरगुती जोड कनेक्शन यांसारख्या कामांमध्ये गती येणार आहे.

घंटागाडी व्यवस्थापनातही तांत्रिक



सुधारणा करण्यात आल्या आहेत. जीपीएस प्रणालीद्वारे १०० टक्के देखरेख अनिवार्य करण्यात आली. प्रत्येक प्रभागात घंटागाडी नियमित फिरते आहे का? याची खात्री आरोग्य निरीक्षकांना करावी लागणार आहे. नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही, मासिक अहवाल सादरीकरण, निष्काळजीपणा आढळल्यास शिस्तभंगाची कठोर कारवाई यावर भर दिला आहे.

स्वच्छता मोहिमा, प्लास्टिक बंदी, ई-टॉयलेट देखभाल यांसाठीही स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे. स्वच्छता कामगारांची उपस्थिती, कामाचे वेळापत्रक व

**प्रशासकीय पुनर्रचनाविषयक महत्वाचे मुद्दे**
- प्रभागनिहाय निरीक्षण व नियंत्रण यंत्रणा मजबूत
- जीपीएस तंत्रज्ञानामुळे कचरा संकलनावर काटेकोर नजर
- कर्मचारी व्यवस्थापन, वेतन व आस्थापना प्रणालीत बदल
- पारदर्शकता, उत्तरदायित्व व शिस्त यावर प्रशासनाचा भर
- शहर ८ विभागीय कार्यालयांमध्ये विभागले
- ५५ आरोग्य निरीक्षकांची नियुक्ती
- ड्रेनेज कर्मचारीही नियंत्रणाखाली
- घंटागाड्यांवर जीपीएस देखरेख
- १०० टक्के कार्यक्षमतेची सक्ती
- तक्रारींवर त्वरित कार्यवाही
- मासिक अहवाल प्रभाग समितीत सादर बंधनकारक
- निष्काळजीपणावर कठोर कारवाई



प्रत्यक्ष कामकाज यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय अधिकारी यांचे स्तरावर निरीक्षण यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आली आहे. विभागीय संरचना केली असून शहरातील स्वच्छतेच्या विभागीय कार्यालय क्र.१ ते ८ नुसार पुर्नरचना करण्यात आली.

मुख्य आरोग्य निरीक्षक हे शहरातील दैनंदिन स्वच्छतेच्या अनुषंगाने विभागीय अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली घनकचरा व्यवस्थापन विभाग विभागीय कार्यालय क्र.१ ते ८ कार्यालयनिहाय प्रमुख म्हणून मुख्य आरोग्य निरीक्षक कार्यरत राहतील. कर्मचाऱ्यांची रजा प्रकरणे, वेतन बिले व इतर देय रकमा इत्यादी सर्व आस्थापनाचे अनुषंगाने सर्व प्रकारचे कामकाज करण्यासाठी प्रत्येक दोन विभागीय कार्यालयाकडे प्रत्येकी एक याप्रमाणे कनिष्ठ श्रेणी लिपिकांची नियुक्ती करण्यात यावी. चार क.श्रे.लिपिक घनकचरा मुख्य कार्यालयाकडे कार्यरत राहतील, असे आदेशात म्हटले आहे.

---

# नागरिकांसाठी १ ते १५ मे दरम्यान स्वगणनेची संधी

## जनगणना २०२७ साठी ऑनलाइन नोंदणी सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**
भारत सरकारच्या महत्त्वपूर्ण जनगणना २०२७ उपक्रमांतर्गत नागरिकांसाठी प्रथमच स्वगणना (Self Enumeration) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेद्वारे नागरिकांना स्वतःची व कुटुंबाची माहिती ऑनलाइन पद्धतीने नोंदवता येणार असून, ही सुविधा १ ते १५ मे २०२६ या मर्यादित कालावधीतच उपलब्ध राहणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

नागरिकांनी https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन मोबाईल क्रमांकाद्वारे लॉगिन करावे. त्यानंतर नकाशावर आपल्या घराचे अचूक स्थान दर्शवून कुटुंबाची आवश्यक माहिती भरावी. माहिती पूर्ण केल्यानंतर 'SE ID' हा युनिक क्रमांक प्राप्त होईल. हा क्रमांक पुढील घर-गणना प्रक्रियेदरम्यान घरी येणाऱ्या प्रगणक कर्मचाऱ्यांना देणे आवश्यक आहे.

दरम्यान, १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत घर-गणना (House Listing) प्रक्रिया राबविण्यात येणार असून, प्रगणक कर्मचारी नागरिकांच्या घरी भेट देणार आहेत. ही संपूर्ण स्वगणना प्रक्रिया केवळ १५ ते २० मिनिटांत पूर्ण करता येते. मराठीसह हिंदी, इंग्रजी अशा १६ भाषांमध्ये माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध असून, मसुदा जतन करण्याचाही पर्याय देण्यात आला आहे.

स्वगणना सुविधेमुळे जनगणना प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक व जलद होण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# पटपडताळणीच्या तिसऱ्या मोहिमेत ९५.३९ टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**
सोलापूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमध्ये तीन टप्प्यात प्रत्यक्ष पटपडताळणी मोहीम राबविण्यात आली. तिसऱ्या म्हणजेच अंतिम टप्प्यातील या मोहिमेत जिल्ह्यातील ५२४ शाळांची तपासणी करण्यात आली. तपासणीत एकूण ७४ हजार ६८७ विद्यार्थ्यांपैकी ७१ हजार २४१ विद्यार्थी उपस्थित आढळले, तर ३ हजार ४४६ विद्यार्थी अनुपस्थित होते. जिल्ह्याची सरासरी उपस्थिती ९५.३९ टक्के इतकी नोंदविण्यात आली आहे.

मोहीमद्वारे विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती, शाळांतील शैक्षणिक वातावरण तसेच पटसंख्येची पडताळणी करण्यात आली. या तपासणीमुळे जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाचे वास्तव चित्र समोर आले आहे.

**तालुकानिहाय आकडेवारी पुढीलप्रमाणे**
अक्कलकोट ३३ शाळांची तपासणी करण्यात आली. एकूण ३,६७२ विद्यार्थ्यांपैकी ३,४८७ विद्यार्थी उपस्थित, तर १८५ अनुपस्थित होते. उपस्थिती टक्केवारी ९४.९६ इतकी नोंदली गेली. बार्शी २१ शाळांमध्ये तपासणी झाली. २,२६४ विद्यार्थ्यांपैकी २,२२४ विद्यार्थी उपस्थित, ४० अनुपस्थित. उपस्थिती ९८.२३ टक्के. करमाळा ३५ शाळांतील ४,१४३ विद्यार्थ्यांपैकी ४,०१२ विद्यार्थी उपस्थित, १३१ अनुपस्थित. उपस्थिती



९६.८४ टक्के. माढा ११९ शाळांची तपासणी झाली. ८,९९२ विद्यार्थ्यांपैकी ८,७१९ विद्यार्थी उपस्थित, २७३ अनुपस्थित. उपस्थिती ९६.९६ टक्के. माळशिरस ५९ शाळांतील ८,९३४ विद्यार्थ्यांपैकी ८,६२० विद्यार्थी उपस्थित, ३१४ अनुपस्थित. उपस्थिती ९६.४९ टक्के. मंगळवेढा २२ शाळांतील २,८३७ विद्यार्थ्यांपैकी २,८१३ विद्यार्थी उपस्थित, २४ अनुपस्थित. उपस्थिती ९९.१५ टक्के असून जिल्ह्यात प्रथम क्रमांक. मोहोळ ३९ शाळांतील ६,३५२ विद्यार्थ्यांपैकी ६,१६५ विद्यार्थी



उपस्थित, १८७ अनुपस्थित. उपस्थिती ९७.०६ टक्के. पंढरपूर ४५ शाळांतील ६,१५४ विद्यार्थ्यांपैकी ६,०९५ विद्यार्थी उपस्थित, ५९ अनुपस्थित. उपस्थिती ९९.०४ टक्के. सांगोला २५ शाळांतील ३,६५९ विद्यार्थ्यांपैकी ३,६०९ विद्यार्थी उपस्थित, ५० अनुपस्थित. उपस्थिती ९८.६३ टक्के. उत्तर सोलापूर ३९ शाळांतील ३,६११ विद्यार्थ्यांपैकी ३,४७६ विद्यार्थी उपस्थित, १३५ अनुपस्थित. उपस्थिती ९६.२६ टक्के. दक्षिण सोलापूर ३४ शाळांतील ५,४३८ विद्यार्थ्यांपैकी ५,२४७ विद्यार्थी उपस्थित, १९१ अनुपस्थित. उपस्थिती ९६.४९ टक्के. मनपा सोलापूर ५३ शाळांतील १८,६३१ विद्यार्थ्यांपैकी १६,७७४ विद्यार्थी उपस्थित, १,८५७ अनुपस्थित. उपस्थिती ९०.०३ टक्के.

**अव्वल तालुके :** विद्यार्थी उपस्थितीत मंगळवेढा तालुका ९९.१५ टक्क्यांसह प्रथम, पंढरपूर ९९.०४ टक्क्यांसह द्वितीय, तर सांगोला ९८.६३ टक्क्यांसह तृतीय क्रमांकावर राहिला.

**शिक्षण विभागाचे समाधान :** बहुतांश तालुक्यांमध्ये ९५ टक्क्यांपेक्षा अधिक उपस्थिती नोंदविण्यात आल्याने प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी समाधान व्यक्त केले आहे. अनुपस्थित विद्यार्थ्यांना नियमित शाळेत आणण्यासाठी विशेष मोहिमा राबविण्यात येणार असल्याचेही सांगितले.

---

# पेसा भरती सुरु झाल्यास सोलापूरसह 13 जिल्ह्यातील स्थानिक तरुणांना मोठी संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ एप्रिल-**
पेसा क्षेत्रातील शिक्षक भरती संदर्भातील रिक्त पदांची यादी तातडीने जाहीर करुन भरती प्रक्रिया गतीमान करावी, अशी मागणी युवा विद्यार्थी असोसिएशनच्या वतीने सामान्य प्रशासन विभागाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. पेसा भरती सुरु झाल्यास सोलापूरसह १३ जिल्ह्यातील स्थानिक तरुणांना मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

भरतीसंदर्भात संबंधित आस्थापनांना आवश्यक मार्गदर्शन न मिळाल्याने अद्यापही रिक्त पदांची माहिती पवित्र पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली नाही. यासंदर्भातील



प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने भरती प्रक्रिया रखडली होती. मात्र, न्यायालयीन निकालानंतर आता शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव नम्रता चव्हाण यांनी हा विषय मुख्यमंत्री यांच्यासमवेत चर्चेला घेऊन मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. राज्य शासनाने दि.११ फेब्रुवारी रोजी सर्वोच्च न्यायालयातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून भरती प्रक्रिया राबविण्यास परवानगी दिली. शालेय शिक्षण विभागाने दि. २० फेब्रुवारी रोजी पुढील कार्यवाहीबाबत निर्देश जारी केले आहेत.

सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रिया सुरू झाल्यास नवीन संचमान्यतेनुसार रिक्त, अतिरिक्त व समायोजन प्रक्रिया पूर्ण करून उर्वरित सर्व पदे पवित्र पोर्टलमार्फत भरावीत, असे स्पर्धा परीक्षा विद्यार्थी व पवित्र पोर्टल शिक्षक भरतीचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले.

पेसा क्षेत्रातील शिक्षक भरतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. आता न्यायालयीन अडथळे दूर झाल्याने सरकारने कोणताही विलंब न करता निश्चित वेळापत्रक जाहीर करुन भरती प्रक्रिया पूर्ण करावी, असे युवा विद्यार्थी असोसिएशनचे अध्यक्ष तुषार देशमुख यांनी सांगितले.

# आठ दिवसात जिल्ह्यात २० हजार आयुष्मान कार्डचे लक्ष्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ एप्रिल-**
नांदेड येथील जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांनी सोलापूर जिल्हा परिषदेचे नवे जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) म्हणून पदभार स्वीकारला.




पुढील आठ दिवसांत तब्बल २० हजार आयुष्मान कार्डांचे वितरण पूर्ण करण्याचे लक्ष्य देण्यात आले.

सीईओ जैन यांनी सोलापूर जिल्ह्यातील आयुष्मान भारत कार्ड वितरणाचा आढावा घेतला. राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सोलापूर मागे असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

आरोग्य विभागात स्मार्ट वर्क, वेगवान निर्णयप्रक्रिया आणि प्रत्यक्ष परिणामकारक काम होण्याची अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे. सोलापूरसारख्या मोठ्या जिल्ह्यात आरोग्य यंत्रणेची कामगिरी अधिक सक्षम करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे.

---

# गायक आनंद शिंदेंच्या गीतांना बार्शीकरांची दाद

## विविध गाण्यांनी भगवंत मैदान दुमदुमले

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२५ एप्रिल-**
बार्शी नगरपरिषद, भगवंत देवस्थान ट्रस्ट, बार्शी बाजार समिती, बार्शी पंचायत समिती आणि भगवंत बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भगवंत मैदानावर सुरू असलेल्या भगवंत महोत्सवात पाचव्या दिवशी गायक आनंद शिंदे यांनी सुमधुर आवाजात सादर केलेल्या भावगीते, भक्तिगीते आणि महापुरुषांवरील प्रेरणादायी गीतांना बार्शीकरांनी दाद दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी देणगीदार व्यापारी व बांधकाम व्यावसायिकांच्या हस्ते श्री भगवंताची आरती करण्यात आली. यावेळी दि बार्शी मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप गांधी, मैनोद्दीन तांबोळी, हेमंत जाधव, लाडू शिंदे, समाधान पाटील, प्रदीप गायकवाड, रवींद्र राऊत, नासिर शेख, सिकंदर शेख, सावळा शिंदे, महेश यादव, विकास धारूरकर, महेश बाफना, पांडुरंग वाणी, लखन रजपूत, मिटू गाडे आदींचा सत्कार करण्यात आला.

महोत्सवाचे संकल्पक तथा माजी आमदार राजेंद्र राऊत, जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य, पंचायत समिती उपसभापती संतोष निंबाळकर, भगवंत महोत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष लोढा, भाजयुमो जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत यांच्यासह विविध आयोजक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. गणेशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

गायक आनंद शिंदे यांनी ''पाऊले चालती पंढरीची वाट, दोनच राजे इथे गाजले कोकण पुण्यभूमीवर, एक त्या रायगडावर, एक चवदार तळ्यावर, कुणी नाही केलं भलं, माय माझ्या भीमाने केलं, तू लाख हिफाजत करले, नवीन पोपट हा, उड जाएगा एक दिन पंछी रहेगा पिंजरा खाली....'' यांसारखी गीते सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमादरम्यान प्रेक्षकांची उत्स्फूर्त उपस्थिती आणि प्रतिसाद यामुळे भगवंत महोत्सवाची रंगत अधिकच वाढत आहे. यावेळी पंचायत समितीचे उपसभापती संतोष निंबाळकर म्हणाले, महोत्सवाचे संकल्पक राजेंद्र राऊत यांनी महोत्सवात ग्रामीण भागातील आम्हा सर्वांना सहभागी करुन घेतले. त्यामुळे भगवंत महोत्सव हा केवळ शहराचा नव्हे तर संपूर्ण तालुक्याचा महोत्सव झाला आहे.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १४२३

**आणि पुत्रें मी सर्वगुणीं। जिणावा हे बापा शिराणी।**
**तरी ते सारंगपाणी । फळा आली ।।**

मी एका खासगी क्लासेसवर क्लास चालकाच्या विनंतीवरुन गेलो होतो. तेथे सर्वांनी आनंदाने माझे स्वागत केले. वर्गांना भेटी देऊन पाहणी केली. नंतर तेथील वरिष्ठांच्या विनंतीवरून त्यांच्या कक्षात गेलो. तेथे त्यांनी मागील दहा-बारा वर्षातील प्रगतीचा फलक दाखवला. मध्यंतर झाल्याने त्यांचे सर्व सहकारीही तेथे आले होते. ते वरिष्ठ सर्वांच्या वतीने, आम्ही मुलांना असे शिकवतो, तसे शिकवतो, सुट्टीत वर्ग घेतो. त्यामुळे आमच्या क्लासमधील एवढ्या मुलांना एवढे टक्के गुण पडले. आजपर्यंत आमच्या क्लासेसची एवढी मुलं इंजिनियर, डॉक्टर, अधिकारी झाले आहेत. त्यांच्या या माहितीस काहीजण पुष्टी देत होते. त्यांचे बोलणे संपल्यानंतर त्यांचे अभिनंदन करीत मी विचारले, तुम्हापैकी कोणाकोणाची मुले डॉक्टर, इंजिनियर, अधिकारी किंवा खंबीरपणे स्वत:च्या पायावर उभी झाली आहेत. या वाक्यावर एकजण वगळता चौघे शांत होते.



आपण जर आजपर्यंत एवढी मुले घडवलात तर तुमचीही मुले घडायला हवी होती. तुम्ही काम ावर आठ तास अन् घरी सोळा तास, सुट्टीच्या दिवशी, उन्हाळा-दिपावाळीच्या सुट्ट्यात पुर्ण वेळ घरीच असता. अर्थात, क्लासमधील मुलांपेक्षा घरी मुलांना जास्त वेळ देऊ शकता, मग तुमची मुलं का घडली नाहीत. खरेच अवघड आहे नाही का ? यशस्वीं बाबत आपला हातभार सहज सांगता येतो पण आपल्या अपयशाचे कारण सांगता येणे अवघड जाते. असो, याचा अर्थ असा निश्चितच नाही की या गुरूजनांनी क्लासमध्ये मुलं घडवली नाहीत. येथे जी मुलं घडली ती या गुरुजनांनीच घडवली. येथे प्रश्न हा आहे की उर्वरित तिघेजन स्वत:ची मुलं घडवण्यात कसे आणि का कमी पडली.? हा प्रश्न फक्त त्यांनाच नाही, तर तुम्हा-आम्हापैकी अनेक आई वडिलांना, आपण मोठया पदावर असलो तरीही लागू होतो. ज्यांना हा प्रश्न लागू होतो त्यांनी आईवडिल म्हणून या प्रश्नाचे, सकारात्मक दृष्टीने याचे उत्तर शोधुन योग्य तो मार्ग काढला पाहिजे. वेळ निघून गेल्यावर मार्ग काढणे अवघड जाते. आपण आपल्या मुलांच्या बाबतीत कोठे कमी पडत आहोत, हे तातडीने पाहीले पाहीजे. अर्जुन युध्दासाठी रणांगणावर आला आणि आप्तेष्ट पाहून मी युध्द करणार नाही म्हणाला. त्याला वेगवेगळया प्रकारे शिकवून श्रीकृष्णांनी त्यास युध्दास तयार केले. तो युध्दाला तयार झाला तेव्हा भगवंतांना त्यांचे प्रयत्न फळास आल्याचा आनंद झाला. या अनुषंगाने बोलतांना श्रीज्ञानेश्वर माऊली आणि पुत्रें मी सर्वगुणीं। जिणावा हे बापा शिराणी। तरी ते सारंगपाणी । फळा आली ।। असे म्हणतात. मुलं हीच खरी संपत्ती असल्याने प्रत्येक आईवडिलांस आपली मुलं मोठी आणि चांगली व्हावीत असे वाटत असते. यासाठी ते त्यांना शक्य ते करीतही असतात. आईबापांचे मोठेपण हे मुलांच्या चांगुलपणावर अवलंबून असते, हे मुलांनी लक्षात ठेवून वागावे. आईवडिलांच्या स्वभावाचा, अडचणींचा गैरफायदा मुलांनी घेऊ नये. त्यांच्या सुचनांना प्रतिसाद दयावा. आईवडिलांची मान उंचावेल असे वागावे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार,
दि. २६ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - वैशाख
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- मघा (२०.२६)
योग - वृध्दी (२२.२७)
करण - वणिज (३०.०७)
राहू काल : रविवार
स. ४.३० ते ६.००

दिनविशेष : १९०३: अटलेटिको माद्रिद असोसिएशन फुटबॉल क्लबची स्थापना झाली.
१९३३: नाझी जर्मनीच्या गेस्टापो या गुप्त पोलिसदलाची स्थापना झाली.
१९६२: रेंजर-४ हे नासाचे यान चंद्रावर कोसळले.
१९६४: टांगानिका झांजीबार मिळून टांझानिया देश तयार झाला.

## नागपूर दीक्षाभूमी ते मुंबई चैत्यभूमी भीमज्योतीचे सोलापुरात आज स्वागत

### सोलापूर शहर-जिल्हा भाजपाच्या वतीने विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

नागपूर दीक्षाभूमी ते मुंबई चैत्यभूमी भारतीय भीमज्योतीचे सोलापूर शहरात स्वागत करण्यात येणार असून, या निमित्ताने विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भारतीय भीमज्योत - नागपूर दीक्षाभूमी ते मुंबई चैत्यभूमी या उपक्रमांतर्गत भीमज्योत रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सोलापूर शहरात आगमन होणार आहे. शहरात छत्रपती संभाजी महाराज चौक येथे भीमज्योतीचे उत्साहात स्वागत करण्यात येणार आहे. भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड यांच्या संकल्पनेतून सुरू असलेली ही भीमज्योत नागपूर- अकोला- नाशिक- लातूर-सोलापूर-मुंबई असा प्रवास करत आहे. सोलापूरमध्ये आगमनानंतर छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन आणि बुद्धवंदना कार्यक्रम होणार आहे. पुढील कार्यक्रम हेरिटेज मंगल कार्यालय, गांधी नगर येथे सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला असून, भीमशाहीरी कार्यक्रम तसेच डॉ.बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित दृकश्राव्य चित्रफीत दाखविण्यात येणार आहे. यावेळी मान्यवरांचे मार्गदर्शनही होणार आहे.

या पत्रकार परिषदेस सभागृह नेते नरेंद्र काळे, प्रवीण कांबळे, राजू माने, महेश बनसोडे, अनंत गोडलोलू, सोमनाथ गोयल उपस्थित होते.

# आशा सेविकांची भरती प्रक्रिया सुरु

### महापालिकेत मे अखेर भरणार ६० पदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

राष्ट्रीय शहर आरोग्य अभियान (एनयूएचएम) च्या माध्यमातून महापालिका आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखाली ६० आशा सेविका पदांची भरती प्रक्रिया सुरू झाली आहे. मे २०२६ अखेरपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करणार आहेत. शहरातील नागरी आरोग्य केंद्रामध्ये अर्ज प्रक्रिया होत आहे, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी वीणा पवार यांनी दिली आहे.

सोलापूर शहरात २ हजार लोकसंख्येमागे एक अशा सेविका (वर्कर) आवश्यक आहेत. त्यानुसार एकूण ६०१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १०७ जागा सोलापूर महापालिका क्षेत्रात रिक्त होत्या. या १०७ जागा भरतीसंदर्भात राष्ट्रीय शहर आरोग्य अभियानाच्या माध्यमातून ही भरती प्रक्रिया राबवत आहे. त्या संदर्भात शासनाचे निर्देश आले आहेत. या अंतर्गत पहिला टप्पा ४७ जागांची भरती प्रक्रिया पुर्ण केली आहे. उर्वरित ६० जागांची भरती प्रक्रिया मे अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील दहा नागरी आरोग्य केंद्रात आवश्यक सूचना दिल्या आहेत. २३ एप्रिल ते मे अखेरपर्यंत ही भरती प्रक्रिया होणार आहे. महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या नियंत्रणाखाली महापालिका आरोग्य विभागांतर्गत ही भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक ती सर्व माहिती नोटीस बोर्डावर लावली आहे. त्या त्या आरोग्य केंद्रांतर्गत रहिवास असलेल्या पात्र अर्जदारांनी अर्ज करावा. आशा सेविकांना दरमहा दहा हजार रुपये राज्य शासनाच्या माध्यमातून मानधन दिले जाते. त्याचबरोबर वेगळ्या कामासाठी इतर भत्ते मिळतात. आशा सेविकांसाठी किमान दहावी पास शैक्षणिक पात्रता आहे. उच्चशिक्षित असल्यास प्राधान्य दिले जाते. दरम्यान, सोलापूर शहरातील महापालिका नागरी आरोग्य केंद्र अंतर्गत आशा सेविकांच्या उपलब्ध जागांची माहिती याप्रमाणे बाळे आरोग्य केंद्र एक जागा, सिव्हिल दोन जागा, जिजामाता - १६, जोडभावी एक, नई जिंदगी १७, साबळे १५, शेळगी ४, सोरेगाव दोन, विडी घरकुल २ अशा जागा भरण्यात येणार आहेत.

**तर थेट लेखी तक्रार नोंदवावी : पवार**

पारदर्शकपणे ही भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेच्या अंतर्गत असलेल्या आरोग्य विभागातील कोणत्याही योजनेसाठी तसेच आशा सेविका पद भरती संदर्भात कोणीही पैशाची मागणी केल्यास ते न देता सोलापूर महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या कार्यालयात थेट लेखी तक्रार नोंदवावी, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी केले आहे.



## महिला व बालविकास विभागामार्फत ‘पोषण पंधरवडाची’ सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत सर्व ग्रामीण प्रकल्पामध्ये ८ वा राष्ट्रीय पोषण पंधरवडा साजरा करण्यात आला. सप्ताहाचा समारोप प्रतिष्ठा मंगल कार्यालय, टेंभूर्णी येथे जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.


यावेळी जिल्हा परिषद महिला व बालकल्याण समिती सभापती अमृता वाघे, जिल्हा परिषद सदस्या सविता कोकाटे, अश्विनी दळवी, वंदना कांबळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, पंचायत समिती कुर्डुवाडी उपसभापती स्वाती गिड्डे, पंचायत समिती सदस्या प्रतिभा खरात, प्राजक्ता पाटील, छाया करंडे, अमृता पाटील, पंचायत समिती सदस्य तात्या अनपट, सचिन पाटील, दिगंबर माळी, ग्रा. पं. सदस्य नागनाथ वाघे, सरपंच हनुमंत गिड्डे, संदीप पाटील, करंडे व जिल्ह्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी किरण सूर्यवंशी, विशाल भोसले, समाधान नागणे, अभिजीत मोलाणे , राहूल चव्हाण, सुवर्णा जाधव, योगिता वैराट आणि बालाजी अल्लडवाड उपस्थित होते.

दिपप्रज्वलनानंतर जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, महिला बालकल्याण सभापती अमृता वाघे तसेच सर्व मान्यवरांनी अंगणवाडी सेविकांनी भरविलेल्या पौष्टिक पाककृती प्रदर्शनात पाककृतींचा आस्वाद घेतला. तसेच अंगणवाडी सेविकांचे कौतुक केले. जिल्हा कार्यकम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी प्रास्ताविकात पोषण पंधरवड्यात केलेल्या कार्यक्रमाबाबत सांगितले. दीपक वैद्य, अमृता वाघे, सविता कोकाटे यांनी संबोधित केले. कार्यक्रमात अंगणवाडी बालकांना विद्यारंभ प्रमाणपत्रे, मातांना बेबी केयर किट, पूर्व शालेय किट, आयुष्यमान भारत कार्ड इत्यादी योजनाचे साहित्य तसेच प्रमाण पत्रांचे वितरण करण्यात आले. किशोरी व महिलांच्या तपासणीबाबत कँप आयोजित करुन आरोग्य विभागाकडील आशा वर्कर व आरोग्य सेविकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. उपसभापती स्वाती गिड्डे यांच्यासह करंडे, पाटील, दळवी, कांबळे व संदीप पाटील कुर्डु यांनीही मार्गदर्शन केले.

बालविकास प्रकल्प अधिकारी बालाजी आल्लडवाड यांनी अधिकारी, पदाधिकारी व महिलांकडून पोषण शपथ घेऊन आभार व्यक्त केले. सूत्रसंचालन बालविकास प्रकल्प अधिकारी किरण सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमासाठी विस्तार अधिकारी आकाश कोकाटे अंगणवाडी पर्यवेक्षिका अनुराधा मिस्कीन, लता पाटील, खटके, मगर, बारबाले, पवार, शिंदे, लोखंडे व अंगणवाडी सेविकांनी परिश्रम घेतले.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### संस्कारांमुळेच जीवनाचा आध्यात्मिक मार्ग सुकर होतो



शिबिर म्हणजे केवळ धार्मिक शिक्षण नसून स्वत:मधील सकारात्मक ऊर्जा जागृत करण्याचे आणि पाच पापांचा नाश करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. संस्कारांमुळेच जीवनाचा आध्यात्मिक मार्ग सुकर होतो, असे प्रतिपादन परमपूज्य १०८ निर्यापक मुनीश्री वीरसागर महाराज यांनी केले. डब्ल्यू. आय. टी. जैन टेम्पल येथे शनिवारी श्री जिनधर्म संस्कार शिबिरात मार्गदर्शन करताना शिबिरार्थींना अध्यात्माची खरी गोडी लावत मुनिश्रींनी संस्कारांचे महत्त्व विशद केले. त्यांनी णमोकार महामंत्राचा महिमा सांगताना तो म्हणण्याची योग्य पद्धत प्रात्यक्षिकासह समजावून सांगितली. मंत्राचा उच्चार करताना आपली दृष्टी तीर्थंकर भगवंतांप्रमाणे नसाग्र असावी, म्हणजेच ती शर्टाच्या तिसऱ्या गुंडीकडे स्थिर ठेवून अतिशय शांतपणे आणि स्पष्ट शब्दांत मंत्राचा उच्चार करावा, असे त्यांनी सुचवले. या प्रक्रियेमुळे मनाचा संयम वाढतो आणि एकाग्रता साध्य होते, असेही त्यांनी नमूद केले. जीवनातील चार गतींचा उल्लेख करत मुनिश्रींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले की, मानवी जीवनात वाईट गोष्टींचा त्याग केल्यास नरकाकडे जाणारा मार्ग बंद होऊन स्वर्गाचा मार्ग सुकर होतो. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता विद्यार्थ्यांनी आपल्या पाचही इंद्रियांवर ताबा मिळवणे आवश्यक आहे. आपण डोळ्यांनी काय पाहतो, कानांनी काय ऐकतो आणि रसनेंद्रियाद्वारे काय खातो, याचे आत्मपरीक्षण करण्याचा गृहपाठही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. शिबिरामध्ये मुनिश्रींनी केवळ प्रवचन न देता विद्यार्थ्यांकडून विविध योग मुद्रा, हातांची स्थिती आणि चेहऱ्याचे भाव कसे असावेत, याचे सराव करून घेतले. २६ एप्रिल रोजी होणाऱ्या मुंज आणि व्रत विधीद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाला नवी शिस्त लावावी, असा आशीर्वादही मुनिश्रींनी यावेळी दिला.



## वक्तृत्व स्पर्धेत म्हेत्रे हायस्कूलचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

समाज कल्याण विभाग, सोलापूर व दक्षिण पंचायत समिती, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समानता सप्ताहानिमित्त इयत्ता ७ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी तालुकास्तरीय शालेय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मनोजकुमार राऊत (गट विकास अधिकारी, पंचायत समिती दक्षिण सोलापूर) यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून समाजकल्याण अधिकारी कांबळे, जयश्री सुतार (गटशिक्षणाधिकारी) तसेच गुरुबाळ संके (विस्तार अधिकारी) पंचायत समिती दक्षिण सोलापूर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी राठोड यांनी विशेष प्रयत्न केले, तर स्वामी यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. स्पर्धेचे परीक्षण हिरेमठ व त्यांच्या सहकाऱ्यांनी जबाबदारीने केले. यावेळी मुख्याध्यापिका मेराजबानो शेख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. वक्तृत्व स्पर्धेत कुंभारी येथील एस. एस. म्हेत्रे उर्दू हायस्कूलच्या इयत्ता आठवीतील विद्यार्थी झैद अझरुद्दीन मुंडेवाडी याने उत्कृष्ट भाषण सादर करून तालुकास्तरीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. या यशामध्ये सहशिक्षिका क्यू. बी. शेख व एच. एन. शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

## व्यक्तिमत्व विकास आणि मुलाखत तयारी विषयावर दयानंद महाविद्यालयात आज कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

येथील दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी व नोकरी इच्छुकांसाठी पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट अँड इंटरव्ह्यू प्रिपरेशन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा रविवारी, दि. २६ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन्ही माध्यमांत होणार आहे. अशी माहिती दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांकडून १०० रुपये शुल्क आकारण्यात येणार असून सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी ओंकार सुतार - ९३७३७४०४३० यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी डॉ. पी. आर. भोजे, दत्तात्रय डोंबाळे आदी उपस्थित होते.

## ग्रीष्म ऋतूमध्ये आरोग्यसंवर्धन आणि आयुर्वेदीय उपचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

आयुर्वेदामध्ये ६ ऋतूंचा उल्लेख आहे, जे भारत देशात निसर्गाने दिलेले आहेत हेमंत, शिशिर, वसंत, ग्रीष्म, वर्षा आणि शरद. होळीच्या सणासोबतच ग्रीष्म ऋतूचे आगमन होते. शिशिरानंतर वसंत ऋतूमुळे झाडांना नवीन पालवी फुटते. चारही बाजूंना हिरवळ पसरलेली असते, ज्यामुळे मनात एक नवीन उत्साह आणि आनंद निर्माण होतो. अशा वातावरणात सूर्यही हळूहळू आपल्या प्रखर किरणांनी उन्हाळ्याची चाहूल देतो.

ग्रीष्म ऋतूमध्ये आरोग्य स्वस्थ ठेवण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. कारण सूर्यकिरणांच्या तिव्रतेमुळे उष्णतेचा त्रास होऊन शरिरात विविध त्रास उत्पन्न होतात. म्हणून आयुर्वेदानुसार उन्हाळ्यात अशा पदार्थांचे सेवन करावे जे शरिरातील पाण्याची कमतरता भरून काढतात. फळे आणि भाज्यांचे अधिक सेवन करावे. काकडी, कोशिंबीर, कांदा, पुदिन्याचा वापर अधिक करावा. भरपूर पाणी प्यावे. सावधगिरी बाळगूनही कधी-कधी उन्हामध्ये फिरल्यामुळे उलटी, जुलाब, अपचन, पोटदुखी, ताप, लघवीला जळजळ, छातीत जळजळ, ॲसिडिटी इ. त्रास उत्पन्न होतात.यासाठी आयुर्वेदात ग्रीष्म ऋतूच्या ऋतुचर्येअंतर्गत आहार-विहाराचे विस्तृत वर्णन केले आहे. याचे पालन केल्यास अनेक आजारांपासून व त्रासांपासून बचाव होतो. तसेच काही औषधी पदार्थांचा उपयोग केल्यास आरोग्य सुदृढ ठेवता येते. या ऋतूमध्ये लिंबू, कैरी, बेलफळ यांच्यापासून तयार केलेल्या पानकाचे (सरबत) सेवन करावे. गुलकंद आणि आवळ्याचा मुरंबा खावा. या प्रकार चे काही लक्षणे आढळल्यास खालील प्रमाणे औषधोपचार करू शकता.

१) पित्त वाढल्यास : ताज्या डाळिंबापासून बनवलेले बैद्यनाथ दाडिमावलेह घ्यावे. यामुळे दाह कमी करून त्वरित थंडावा मिळतो.

२) लघवीत जळजळ, वारंवार किंवा लालसर लघवी होणे असात्रास होत असल्यास वैद्यनाथ गोक्षुरादि गुग्गुलु २ टॅबलेट सकाळ-संध्याकाळ पाण्यासोबत घ्याव्यात. यासोबत बैद्यनाथ चंदनासव

बैद्यनाथ

४-४ चमचे जेवणानंतर दोन वेळा घ्यावे.

३) गॅस्ट्रो विकार या ऋतुत मोठया प्रमाणात जाणवतात पचनशक्ती कमी होऊन जुलाब होतात आणि शरीरातील पाण्याचे प्रमाणे कमी होते. अशावेळी बैद्यनाथ संजीवनी बटी घ्यावी. आंवयुक्त जुलाब होत असल्यास बैद्यनाथ अमीबिका टॅबलेट, ११ टॅबलेट सकाळ-संध्याकाळ पाण्यासोबत घ्यावी.

करावे. ४) भूक न लागणे, अशक्तपणा व अरुची होणे, याप्रकारची लक्षणे जाणवल्यास बैद्यनाथ द्राक्षासव स्पेशलचे सेवन

५) ॲसिडिटी (अम्लपित्त) मध्ये आंबट ढेकर येणे, छातीत जळजळ होत असल्यास बैद्यनाथ सूतशेखर रस, बैद्यनाथ अविपत्तिकर चूर्ण घ्यावे.

या प्रकारे ग्रीष्म ऋतूमध्ये योग्य काळजी घेतली आणि दिनचर्या संयमित ठेवली तर गर्मीमुळे होणारे त्रास टाळता येतात व वरील औषधांच्या सहाय्याने आरोग्य टिकविता येते. नोट : आयुर्वेदिक औषधे वापरण्यापूर्वी आयुर्वेद तज्ञांचा सल्ला घ्यावा.

**- वैद्य प्रतिन पट्टलवार**
वरिष्ठ आयुर्वेद सल्लागार

## जिल्हा परिषदेत सभापतींनी घेतला चार्ज; प्रशासनाला कामाचा दिला ‘दस का दम’

सोलापूर जिल्हा परिषदेत अनेक वर्षांनी पुन्हा एकदा राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रशासक कारकीर्दीत शांत पडलेले सत्ताकेंद्र आता पुन्हा गजबजू लागले आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती आणि विषय समित्यांचे नवे सभापती यांनी पदभार स्वीकारताच थेट कामकाजाला सुरुवात केली आहे. अर्थ, बांधकाम, जलव्यवस्थापन, कृषी, पशुसंवर्धन, आरोग्य अशा महत्त्वाच्या विभागांच्या बैठका घेऊन अधिकाऱ्यांना कामाचा दम देण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षांत जिल्हा परिषदेत लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासन मोकळ्या मैदानात खेळत होते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती. निर्णय होत होते, फाईली फिरत होत्या, कामे मंजूर होत होती; पण जनतेच्या प्रश्नांना भिडणारा, अधिकाऱ्यांना जाब विचारणारा चेहरा नव्हता. आता मात्र समीकरण बदलले आहे. निवडून आलेले पदाधिकारी खुर्चीत बसले असून त्यांनी पहिल्याच दिवसापासून आपली उपस्थिती दाखवून दिली आहे. नव्या सभापतींनी विभागनिहाय बैठका घेतल्या आणि प्रलंबित कामांचा हिशेब मागितला. कोणती कामे अडकली, कोणत्या योजना रखडल्या, कुठे निधी कमी आहे, कुठे अधिकारी कमी पडत आहेत, कुठे जनतेच्या तक्रारी आहेत, याचा आढावा घेण्यात आला. काही ठिकाणी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सांगण्यात आले की, आता जुनी ढिलाई चालणार नाही. लोकप्रतिनिधी आलेत, त्यामुळे कामाची गती वाढलीच पाहिजे.

विशेष म्हणजे अर्थ समितीपासून बांधकाम विभागापर्यंत सर्वच विषय समित्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. कारण या समित्या म्हणजेच विकासाच्या निर्णयांचे खरे इंजिन मानले जाते. कोणत्या रस्त्याला निधी, कोणत्या पाणी योजनेला मंजुरी, कोणत्या शाळेला दुरुस्ती, कोणत्या दवाखान्याला साधनसामग्री, याचा पाया इथूनच रचला जातो. त्यामुळे नव्या सभापतींच्या हालचालींकडे प्रशासनासोबत राजकीय वर्तुळाचेही लक्ष लागले आहे. प्रशासक राजवटीत अनेक प्रश्न वर्षानुवर्षे पडून राहिले, अशी भावना ग्रामीण भागात होती. गावोगाव पाणीटंचाई, खराब रस्ते, अपुऱ्या आरोग्य सुविधा, शाळांतील मूलभूत प्रश्न, शेतीविषयक मार्गदर्शनाचा अभाव, पशुसंवर्धन योजनांची मंद गती अशा अनेक तक्रारी होत्या. आता नव्या पदाधिकाऱ्यांना या सगळ्याचा हिशेब द्यावा लागणार आहे. मात्र केवळ बैठका घेऊन फोटो काढणे आणि प्रसिद्धीपत्रके काढणे याने राजकारण टिकत नाही, हेही तितकेच खरे आहे. बैठकीत घेतलेले निर्णय गावपातळीवर उतरले पाहिजेत. मंजूर कामे सुरू झाली पाहिजेत. निधी वेळेत आला पाहिजे. अधिकारी जागेवर काम करताना दिसले पाहिजेत. अन्यथा जनतेला सगळे कळते आणि निवडणुकीत त्याचे उत्तरही मिळते. नव्या सभापतींसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे निधी. कारण निधीशिवाय विकासाचा गाडा हलत नाही. पंचायत समिती असो, जिल्हा परिषद असो किंवा विषय समिती - पैशाशिवाय योजना फक्त कागदावरच राहतात. त्यामुळे शासन दरबारी पाठपुरावा, मंत्र्यांकडे धाव, पालकमंत्र्यांकडे मागणी, अधिकाऱ्यांशी समन्वय आणि योग्य प्रस्ताव पाठवणे, ही खरी राजकीय कसोटी असणार आहे. सोलापूर जिल्हा हा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा मानला जातो. त्यामुळे येथे काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांकडे राज्यपातळीवरूनही लक्ष असते. कोणता सभापती किती काम करतो, कोणता नेता किती निधी आणतो, कोणाची गावोगाव पकड वाढते, हे सगळे पाहिले जाते. त्यामुळे ही पदे केवळ नावापुरती नसून पुढील राजकारणाची पायरी मानली जाते. नव्या नेतृत्वाने कार्यालयांचे रंगरंगोटी, केबिनचे नूतनीकरण, बोर्डबाजी आणि स्वागत समारंभ यापेक्षा पुढे जाण्याची गरज आहे. गावातील रस्ता झाला, पाणी आले, शाळा सुधारली, दवाखाना सुरू झाला, शेतकऱ्याला मदत मिळाली, तरच जनता काम मानते. बाकी घोषणा आणि बॅनरवर जनता आता फार विश्वास ठेवत नाही. अधिकारी वर्गालाही आता सावध राहावे लागणार आहे. कारण यापुढे प्रत्येक बैठकीत प्रश्न विचारले जातील, कामाचा आढावा घेतला जाईल, आणि विलंबाबद्दल जाब मागितला जाईल. लोकप्रतिनिधी सक्रिय झाले की प्रशासनाची जबाबदारी आपोआप वाढते, हे नेहमीचे समीकरण आहे. एकूणच, सोलापूर जिल्हा परिषदेत आता पुन्हा राजकीय इंजिन सुरू झाले आहे. विषय समित्यांच्या सभापतींनी दमदार सुरुवात केली आहे. पण खरी लढाई आता मैदानात आहे. बैठकीतल्या घोषणा आणि फाईलवरील सही गावात पोहोचली, तरच ही इनिंग यशस्वी ठरणार. अन्यथा जनता पुढच्या वेळी खुर्ची बदलायला वेळ लावणार नाही.

### जिल्हा परिषदेतून



यशवंत गुरव
मो. ८८८८६५०७५५

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शेळगाव-वानेवाडी रस्त्याच्या मोजणीला प्रत्यक्ष सुरुवात

- प्रयत्नांना आलं यश
- ८ वर्षांचा वनवास संपणार

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २५ एप्रिल-**

शेळगाव (आर) आणि वानेवाडी या दोन्ही गावांसाठी जीवनवाहिनी ठरणाऱ्या रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. गेल्या ८ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या वतीने प्रत्यक्ष मोजणी आणि स्थळ पाहणी करण्यात आली. यामुळे पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या दोन्ही गावांतील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या कामासाठी भूमी अभिलेख बार्शीचे प्रमोद जाधव व बिरोबा कांबळे, तसेच तुळजापूर भूमी अभिलेख कार्यालयाचे अमृतराव पी. ए. आणि लोंढे हे अधिकारी उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत शेळगाव आणि वानेवाडी या दोन्ही शिवारांतील



गटांची सविस्तर मोजणी करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दयानंद बादगुडे यांनी सर्व उपस्थित अधिकाऱ्यांचे स्वागत व सन्मान केला. ॲड. सुरेश गायकवाड यांनी दोन्ही गावांतील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना, या शासकीय कामात पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी शेळगाव (आर): सरपंच प्रकाश बादगुडे, माजी पंचायत समिती सदस्य सचिन बादगुडे, स्वराज्य क्षीरसागर, प्रकाश गोडगे, भीमराव शिरसाट, राजेंद्र देवकर, मिठू देवकर, जनार्दन बादगुडे, मनोज बादगुडे, उत्तम अडसूळ, दाजी अडसूळ व वानेवाडी: उत्तम अडसूळ, प्रवीण पाटील, रघु वाडकर, चंदू अडसूळ, जितेंद्र मिरजे आदी शेतकरी उपस्थित होते.

**दयानंद बादगुडे यांच्या पाठपुराव्याला यश**

गेल्या आठ वर्षांपासून शेळगावचे सामाजिक कार्यकर्ते दयानंद बादगुडे हे या कामासाठी अहोरात्र कष्ट घेत होते. वारंवार संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेणे, निवेदने देणे आणि तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या या चिकाटीमुळेच आज हा रस्ता प्रत्यक्षात आकाराला येत आहे.

> हा रस्ता केवळ रस्ता नसून दोन्ही गावांतील शेतकऱ्यांची आणि विद्यार्थ्यांची अडचण दूर करणारा मार्ग आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आज मोजणी सुरू झाली, याचे समाधान वाटते.''
> **- ग्रामस्थ, शेळगाव-वानेवाडी**

**२०१८ पासूनचा संघर्ष आणि ग्रामस्थांचा आनंद**

शेळगाव व वानेवाडी शिवेवरील बसवेश्वर चौक येथून या मोजणीला सुरुवात झाली. २०१७-१८ सालापासून या रस्त्यासाठी शेतकरी सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरावा करत होते. पावसाळ्याच्या दिवसांत या रस्त्यावर पाणी साचल्यामुळे दोन्ही गावांचा संपर्क तुटायचा. शाळेत जाणारे विद्यार्थी आणि शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना ३-४ महिने प्रचंड हाल सहन करावे लागत होते. पाणी ओसरण्याची वाट पाहण्याशिवाय ग्रामस्थांकडे पर्याय नसायचा. मात्र, आता मोजणी पूर्ण होऊन कामाला गती मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## महत्वाचे...



### वटवृक्ष देवस्थान समितीवर राजीमवाले कुटूंबाची निष्ठा : डॉ. राजीमवाले

**अक्कलकोट, दि. २५ एप्रिल-**

श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीवर राजीमवाले कुटूंबाची भक्तीमय निष्ठा असल्याचे मनोगत येथील विश्व अग्निहोत्र फाऊंडेशन शिवपूरीचे संस्थापक डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले यांनी व्यक्त केले. ते नुकतेच गुरुपुष्यामृत मुहूर्ताचा योग साधून सहकुटूंब श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे प्रमुख तथा भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांनी डॉ.पुरुषोत्तम राजीमवाले व कुटूंबियांचा सत्कार केला. यावेळी बोलताना डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले यांनी भावना व्यक्त केल्या. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, व्यंकटेश पुजारी, श्रीकांत मलवे, प्रा. शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, सुनिल पवार उपस्थित होते.



### उद्योजिका भाग्यश्री आवळे यांचा बार्शी आगारात सत्कार

**बार्शी, दि. २५ एप्रिल-**

नव्याने सुरु केलेला व्यावसाय बंद पडू द्यायचा नाही. ही जिद्द मनासी बाळगुन फ्रेंडन्स इव्हेंट मॅनेजमेंट यशस्वी रित्या सांभाळणाऱ्या आणि हजारो महिलांच्या पुढे आदर्श ठरलेल्या उद्योजिका भाग्यश्री आवाळे यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे बार्शी आगारात यशस्वी आयोजन केल्याबद्दल बार्शी आगाराचे व्यवस्थापक संजय भोसले आणि भालशंकर माळी यांच्या हस्ते सत्कर करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे डेकोरेशन आणि भोजन व्यवस्थापनाची जाबाबदारी बार्शी आगारातील कर्मचाऱ्यांनी भाग्यश्री आवाळे यांच्यावर सोपवली होती. ही जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल बार्शी आगाराचे व्यवस्थापक संजय भोसले यांच्या हस्ते भाग्यश्री आवाळ यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यशाळा अधिक्षक नाईक, अध्यक्ष फिरोज मुलाणी, आदित्य आडसूळ, दयावंत माळी, कुंडलिक सरवदे, भालशंकर माळी उपस्थित होते.



### आर्या स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन

**माढा, दि. २५ एप्रिल-**

आर्या पब्लिक स्कूल येथे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते. उपक्रमाचे आयोजन रणजीत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. विकास मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आर्या पब्लिक स्कूल, पिंपळनेर येथील प्राचार्य लोखंडे, आर्या ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य मारकड, आर्या कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन उबाळे, विठ्ठल प्रतिष्ठान कॉलेज ऑफ फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ.सागर जाडकर, न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक खापरे, संत गाडगेबाबा विद्यालयाचे मुख्याध्यापक कापसे, आर्या पब्लिक स्कूलचे प्राचार्य एस. जे. थोरात, संभाजी पाटील तसेच विज्ञान विभाग प्रमुख जयदेव गायकवाड उपस्थित होते. प्रदर्शनामध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून १०० हून अधिक विविध प्रायोगिक मॉडेल्स सादर केली.



### मंद्रूप केंद्रस्तर आदर्श शिक्षक, मुख्याध्यापक, उपक्रमशील शाळा पुरस्कार सोहळा

**दक्षिण सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

मंद्रूपचे केंद्रप्रमुख कल्लप्पा हेळवी यांच्या अभिनव संकल्पनेतून मंद्रूप केंद्रस्तर आदर्श शिक्षक, मुख्याध्यापक, उपक्रमशील शाळा पुरस्कार तसेच सेवानिवृत्त शिक्षक सन्मान सोहळा, टीईटी आणि सीटीईटी उत्तीर्ण शिक्षकांचा सन्मान सोहळा पार पडला. मंद्रूप बीटचे विस्तार अधिकारी अयुब कलबुर्गे, भंडारकवठेचे केंद्रप्रमुख आमसिध्द हत्ताळी उपस्थित होते. बलभीम नारायणे, सुप्रिया महाजन, सुरेखा कोरे, वैभव पाटील, जहाँआरा तांबोळी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार तर अंबादास खडतरे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार देण्यात आले. जिल्हा परीषद नाईकनगर या शाळेला आदर्श शाळा पुरस्कार देण्यात आला. सर्व पुरस्कारार्थींना सन्मानचिन्ह, शाल आणि बुके देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षण विस्तार अधिकारी अयुब कलबुर्गी, कांतीलाल गुमतापुरे मुख्याध्यापक व शिवानंद बिदरकोटे यांचे सेवानिवृत्तीनिमित्त सन्मान करण्यात आले. शबाना शेख, नवाज जहागीरदार, सुनिता राठोड, रामसिंग पवार, विठ्ठल जतकर, कमल अणची व सुप्रिया महाजन या पुरस्कारप्राप्त शिक्षकांचाही सन्मान करण्यात आले. सूत्रसंचालन कविता दिवाणजी यांनी केले. प्रास्ताविक मंद्रूप केंद्रप्रमुख कल्लप्पा हेळवी यांनी केले. राजू राठोड यांनी आभार मानले.

## सांगवी बु येथे अखंड हरीनाम सप्ताहास सुरुवात

**अक्कलकोट, दि.२५ एप्रिल-**

तालुक्यातील सांगवी बु येथे श्री गृरुवर्य अप्पासाहेब वासकर महाराज फडा तर्फे श्री ह भ प गृरुवर्य राणा महाराज वासकर यांचे कृपाआशीर्वादाने श्री नृरसिंह जयंती निमित्त सांगवी बु येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व तपपूर्ती सोहळा आयोजित केला आहे.

या सप्ताह मध्ये दैनंदिन कार्यक्रम असून, दरम्यान पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ११ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण वाचन, दुपारी २ते ३ गाथा भजन, सायंकाळी ४ते ६ हरिपाठ, सायंकाळी ६ते ७प्रवचन, रात्री ८ ते १० कीर्तन व रात्री ११ ते ४ हरिजागर असे नित्यानेम कार्यक्रम रूपरेषा असून, या दरम्यान गावातील बाहेरगावाहून येणाऱ्या व श्रोते, वाचक यांच्यासाठी सकाळी चहा, नाष्ट, दुपारचे जेवण, संध्याकाळचे जेवण, असे नियोजन असून, गावातील अनेक आन्नदात्यांनी या सप्ताह काळात अन्नदानाचे नियोजन केले आहे. या अखंड हरीनाम सप्ताह तपपूर्ती सोहळ्यास पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित लावण्याचे आवाहन सप्ताह कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## वादळी वाऱ्याने केळी पिकांचे नुकसान

### नुकसानीचे पंचनामे करून भरपाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. २५ एप्रिल-**

करमाळा तालुक्यातील कंदर परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अण्णासाहेब कदम या शेतकऱ्याची सात एकर केळी या वादळी वाऱ्यामध्ये भुईसपाट झाली आहेत. ४५ ते ५० लाख रुपयांचे नुकसान त्यांचे झाले आहे. तातडीने या परिसरातील नुकसानीचे पंचनामे करून भरपाईची मागणी शेतकऱ्यांमधून केली जात आहे

वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाचा तडाखा करमाळा तालुक्यातील विविध ठिकाणी चांगलाच बसला आहे. केम, कंदर, वडशिवणे, सातोली भागातील अनेक शेतकऱ्यांच्या केळीच्या पिकाचे नुकसान झाले आहे. लाखो रुपये खर्च करून उभी केलेली पिके या वादळी वाऱ्याने भुईसपाट झाली आहेत. शेतकऱ्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आखाती युद्धामुळे दर पडल्याने आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला फार मोठा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.



> माझ्या सात एकर शेतामध्ये ऑगस्ट महिन्यात साडेआठ हजार केळीची रोपे लागवड केली होती सध्या केळीची वीण पूर्ण होऊन एक ते दीड महिन्यात केळी काढणीला येणार होती. अशा परिस्थितीत वादळी वाऱ्याने संपूर्ण केळीचे पीक भुईसपाट झाले आहे. फार मोठे आर्थिक नुकसान झाले आहे शासनाकडून मदतीची अपेक्षा आहे.
> **-अण्णासाहेब कदम, केळी उत्पादक शेतकरी, कंदर**

> वादळी वाऱ्याने प्रत्येक वर्षी एप्रिल-मे महिन्यात जिल्ह्यातील केळी पिकाचे मोठे नुकसान होते. नुकसान झाल्याबरोबर शासनाकडून या पिकाचे पंचनामे करून नुकसान भरपाई तातडीने दिली गेली पाहिजे. नुकसान भरपाई सध्याच्या प्रचलित निकषानुसार फारच अल्प आहे. किमान उत्पादन खर्चाच्या प्रमाणात नुकसान भरपाई मिळावी.
> **- किरण डोके, केळी निर्यातदार, कंदर**

## पंढरपूर तालुक्यात कलम १६३ लागू

**पंढरपूर, दि. २५ एप्रिल-**

तालुक्यातील बंद पडलेल्या पावसाच्या पाण्याचा साठा झालेली शेततळे, दगडखाणी, निर्जन नदी किनारा, तलाव, कालवा, मोठी डबकी व जेथे जेष्ठ नागरिक, छोटी मुले, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी कपडे धुण्यासाठी व पोहण्यासाठी जातात, अशा ठिकाणी दुर्घटना घडू नये यासाठी दिनांक १५ जून पर्यंत २०२६ या कालावधीत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले.

सन २०२६ मध्ये शाळांना उन्हाळयाच्या सुट्टया लागल्यानंतर मुले पोहायला जातात. अशा धोकादायक ठिकाणी कोणी जाणार नाही याकरीता धोक्याच्या सुचनांचा फलक दर्शनी भागात लावावा. तसेच कार्यक्षेत्रातील बंद पडलेल्या पावसाच्या पाण्याचा साठा झालेल्या दगडखाणी, निर्जन नदीकिनारा, तलाव, कालवा, मोठी डबकी अशा ठिकाणांचा शोध घेऊन उक्तं प्रमाणे अनुचित दुर्घटना घडू नये याकरीता त्या परिसरामध्ये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करणे आवश्यक असल्याने याबाबतचे आदेश तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी सचिन लंगुटे यांनी निर्गमित केले आहेत.

## भैरवनाथ विद्यालयात निर्भया पथकाचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ एप्रिल-**

तालुक्यातील मौजे कान्हापुरी येथील श्री भैरवनाथ विद्यालय आणि जिल्हा परिषद शाळा कान्हापुरी येथे निर्भया पथक पंढरपूर प्रमुख पोलिस उपनिरीक्षक सुप्रिया रावण (यादव) यांनी विद्यालयातील मुलामुलींना मार्गदर्शन केले.

मुलींना त्यांनी मौलिक व उपयुक्त मार्गदर्शन करत स्वतःच्या सुरक्षिततेबाबत सजग राहण्याचे आणि कोणतेही परिस्थितीला न घाबरता ठामपणे पुढे जाण्याचे धैर्य ठेवण्याचे संदेश दिले. यावेळी पथकातील मपोका वाघमारे, पोका कुचेकर, पो.ह. सावंत, पोका टिंगरे यांनी मुलांना विविध विषयावर मार्गदर्शन करून निर्भयाचे टोल फ्री नंबर समजून सांगून निर्भया नेहमी तुमच्या साठी तत्पर मदतीस धाऊन येईल याची ग्वाही देण्यात आली. विद्यालयाच्या वतीने पीएसआय यादव आणि त्यांच्या संपूर्ण निर्भया पथक टीमचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत. जिल्हा



परिषदेच्या शाळेत मुलीना स्वरक्षणाचे धडे, आत्मनिर्भर तसेच मुलीनी खेड्यातून आहे म्हणून न्यूनगंड न बाळगता धाडसाने यशाचे शिखर गाठले पाहिजे असे मार्गदर्शन, निर्भया पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक सुप्रिया यादव रावण यांनी केले.

## वर्गणी मागण्याच्या कारणावरून मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

गावात वर्गणी मागण्याच्या कारणावरून अनोळखी तिघाजणांनी मिळून एका तरुणाला दगड व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुरघोट येथे शुक्रवारी मध्यरात्री घडली.

हुचप्पा बसप्पा कांबळे ( वय ३६ वर्ष , राहणार कुरघोट) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून शुक्रवारी मध्यरात्री साडेअकरा वाजता तो मंद्रूप गावात असताना त्याला वर्गणी मागण्याच्या कारणावरून तीन अनोळखी तरुणांनी मारहाण केली. यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्याला मंद्रूप येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात भाऊ राम याने पहाटे दीड वाजता दाखल केले.

## कांदलगावात अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ

**३० एप्रिल रोजी प्रकट दिनाचा मुख्य सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ एप्रिल-**

तालुक्यातील कांदलगाव येथील तीर्थक्षेत्र श्री नृसिंह मंदिरात नृसिंह जयंती (प्रकट दिन) निमित्त पारंपरिक अखंड हरिनाम सप्ताह, गीतरामायण व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला आज सकाळी भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. ग्रामस्थ व भाविकांच्या उपस्थितीत विधिवत पूजा-अर्चा करुन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

सप्ताहात रविवार दि.२६ रोजी हभप भागवताचार्य ज्ञानेश्वरी सोळंखे (परतूर), सोमवार २७ रोजी हभप गुरुवर्य अण्णासाहेब बोधले महाराज (डिकसळ), मंगळवार दि.२८ रोजी हभप शिवलीला पाटील महाराज (बार्शी), बुधवार २९ रोजी हभप माऊली महाराज पठाडे (कर्जत) व गुरुवार ३० रोजी हभप ज्ञानेश्वर (माऊली) नगरे महाराज यांच्या कीर्तनसेवेचा लाभ भाविकांना मिळणार आहे. दररोज दुपारी साडेतीन ते साडेपाच या वेळेत रामयनाचार्य संतोष मुंडे महाराज यांचे गीत रामायण होणार आहे. नामसंकीर्तनाच्या गजरात मंदिर परिसर भक्तिमय झाला असून, भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. गीतरामायण व ज्ञानेश्वरी पारायणातून रामकथा व संत साहित्याचे चिंतन घडत आहे. सप्ताहादरम्यान हरिजागर, भजन व विविध धार्मिक कार्यक्रमांनी गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नृसिंह जयंतीच्या दिवशी दुपारी उत्सव मूर्तीची मिरवणूक, आणि सूर्यास्त वेळी प्रकट दिन सोहळा(गुलालाचा कार्यक्रम) पार पडणार आहे. शुक्रवार १ मे रोजी सीताराम गड खर्डाचे महंत महालिंग महाराज यांचे कल्याचे कीर्तन नंतर महाप्रसाद होईल. सायंकाळी शेरणी वाटप, रात्री पालखी सोहळा होईल. तर शनिवारी देवाला निरोप दिल्यानंतर सोहळ्याची सांगता होणार असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष हरिदास फुरडे-पाटील आणि सरपंच प्रदीप नवले यांनी दिली. नृसिंह प्रकट दिनानिमित्त गावातील जवळपास ५० टक्के महिलांना नऊ दिवसाचा उपवास असतो. तर प्रकट दिनी अख्ख्या गावाला उपवास असतो.

## एमआयडीसी - कॉस्मे कराराने कोरियन गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला नवे बळ

**गुंतवणूक, कौशल्यविकास आणि तंत्रज्ञान सहकार्यास चालना**

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, दि. २५ एप्रिल-**

कोरियन कंपन्यांचा महाराष्ट्रातील गुंतवणुकीकडे वाढता कल लक्षात घेऊन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि कोरिया एसएमई अँड स्टार्टअप्स एजन्सी (कॉस्मे) यांच्यात दि. २० एप्रिल २०२६ रोजी नवी दिल्ली येथे गुंतवणूक प्रोत्साहन, कौशल्यविकास आणि औद्योगिक सहकार्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.

महाराष्ट्रातील कोरियन गुंतवणूकीच्या संधी, औद्योगिक सुलभीकरण, कौशल्यविकास आणि तंत्रज्ञान सहकार्याबाबत पुणे येथे नुकत्याच झालेल्या परिषदेत एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आणि कॉस्मेच्या उच्चस्तरीय अधिका-यां समवेत सविस्तर चर्चा झाली आहे. सदर चर्चेचा पुढील भाग म्हणून हा करार आकाराला आला असून, यावेळी एमआयडीसीच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, महाव्यवस्थापक (पणन) डॉ. विकास सूर्यवंशी तर कॉस्मेचे उपाध्यक्ष जंग झुंग पार्क यांच्या समवेत इतर अधिकारी उपस्थित होते.

कराराचा मुख्य उद्देश कोरियातून महाराष्ट्रात गुंतवणूक सुलभ करणे आणि राज्यातील विद्यमान कोरियन उद्योगांच्या विस्तार योजनांना पाठबळ देणे हा आहे. सहकार्याची रचना तीन प्रमुख टप्प्यात करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात कोरियन एमएसएमई आणि स्टार्टअप्ससाठी महाराष्ट्रातील गुंतवणूक संधींचे प्रोत्साहन आणि सुलभीकरण



केले जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात प्रशिक्षण, क्षमता विकास आणि उद्योगाभिमुख कौशल्यवृद्धीच्या माध्यमातून भविष्यातील कुशल मनुष्यबळ तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. तिसऱ्या टप्प्यात प्रगत आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात माहितीची देवाणघेवाण, औद्योगिक आधुनिकीकरण, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि शाश्वत उत्पादनासाठी सहकार्याचा शोध घेतला जाणार आहे. गुंतवणूक सुलभीकरणाअंतर्गत कोरियन एमएसएमई आणि स्टार्टअप्समध्ये महाराष्ट्रातील संधींबाबत जनजागृती करणार आहे. दोन्ही संस्था भारत आणि कोरिया येथे गुंतवणूक शिष्टमंडळे, व्यवसाय मिशन्स आणि रोडशो आयोजित करण्यास सहकार्य करतील. तसेच क्षेत्रनिहाय गुंतवणूक संधी आणि औद्योगिक प्रकल्पांबाबत माहितीची देवाणघेवाण केली जाणार आहे. कोरियन कंपन्यांसाठी सिंगल विंडो सुलभीकरण यंत्रणा मजबूत करण्यासाठी एमआयडीसी नोडल संस्था म्हणून समन्वयाची भूमिका बजावेल.

महाराष्ट्रातील विद्यमान आणि नव्याने येणाऱ्या कोरियन उद्योगांकरीता व्यवसाय सुलभतेसाठी औद्योगिक निर्देशिका तयार करण्याचाही विचार या करारात आहे. तसेच उत्पादन, असेंब्ली आणि लॉजिस्टिक्ससाठी योग्य औद्योगिक क्षेत्रे, जमीन पर्याय आणि मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास दोघांकडून सहकार्य केले जाणार आहे. कॉस्मेमार्फत कौशल्य विकासासाठी कोरिया बिझनेस कल्चर प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्रात सुरू करण्याचे नियोजन आहे. यासाठी कॉस्मे अभ्यासक्रम, प्रशिक्षक आणि प्रमाणपत्रे उपलब्ध करून देणार असून, एमआयडीसी प्रचलित धोरणांनुसार पायाभूत सुविधा आणि आर्थिक सहाय्याचा विचार करणार आहे. तंत्रज्ञान सहकार्याच्या अंतर्गत ऊर्जा कार्यक्षम स्मार्ट औद्योगिक वसाहती, स्मार्ट ग्रिड्स, नवीकरणीय ऊर्जा, एकात्मता आणि ऊर्जा-ऑप्टिमायझेशन प्रणाली यावर माहितीची देवाणघेवाण आणि संभाव्य सहकार्याचा शोध घेतला जाणार आहे. औद्योगिक आधुनिकीकरण, डिजिटल परिवर्तन आणि शाश्वत उत्पादनाला चालना देणे हा या करारातील महत्त्वाचा उद्देश आहे.

## विडी घरकुलमध्ये एकाची गळफासाने आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून एका ५४ वर्षीय इसमाने घरातील छताच्या पंख्याला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कुंभारी येथील विडी घरकुल मध्ये शनिवारी सकाळी ११ वाजता उघडकीस आली. बालाजी अंबादास हेल्दी ( वय ५४ वर्ष, रा. १२/२ अ विभाग, विडी घरकुल कुंभारी सोलापूर )असे त्या गळफास घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. आज शनिवारी सकाळच्या सुमारास त्यांचा मृतदेह राहत्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ही खबर वळसंग पोलिसांना समजली असता हवालदार ए ए शेख यांनी घटनास्थळी पोहचून सदरचा मृतदेह इतरांच्या साह्याने खाली उतरून येथील शासकीय रुग्णालयात दुपारी एक वाजता शव विच्छेदनासाठी दाखल केला.



**प्राची धामणगावकर**
सहकार भारती व्हिजन
एक्सपो कार्यक्रम प्रमुख



**निशा छाबरिया**
फाऊंडर / डायरेक्टर
मुलमंत्र बिझनेस ग्रुप



**वसंती गायकवाड**
सिध्दी कलेक्शन
भैरु वस्ती, लिमयेवाडी



**सौ. रुची गोळवलकर**
हस्तकला उत्पादन
जुळे सोलापूर

## * सहकार भारती समिती *



संतोष गायकवाड – विभाग प्रमुख
किरण करकमकर – अध्यक्ष
यशवंत बुऱ्हाडे – महामंत्री
नानासो वाघमोडे – विभाग सहप्रमुख
चंद्रशेखर सुतार – गृहनिर्माण सह प्रकोष्ठ प्रमुख
हनुमंत कोळी – पतसंस्था प्रकोष्ट प्रमुख
लक्ष्मीनारायण कुचन – मार्कंडेय रुग्णालय संचालक
अमित जुजगार – कार्यकारिणी सदस्य
संतोष पंतोजी – कार्यकारिणी सदस्य
राजेंद्र कुलकर्णी – जिल्हा उपाध्यक्ष
इरेश यागंटी – प्रकोष्ट प्रमुख
शिवलिंगप्पा जवळकोटे – कार्यकारिणी सदस्य
सुर्यकांत पाटील – सहसंघटक

सोलापूर जिल्हा
**सहकार भारती**



**नंदिनी खापरे**
अभिषेक नगर, ॲम्बेसेडर
हॉटेलजवळ, पुणे नाका
**व्यवसाय :** कॅमल ड्राय फिश



**मानसी रेपाल**
हॅन्डमेड ज्वेलरी



**सुरेखा कलागते**
गृह उद्योग
गंगाधर हौसिंग सोसायटी,
होटगी रोड, सोलापूर



**उज्वला क्षीरसागर**
रेझिन आर्ट
मजरेवाडी, सोलापूर



**मीना प्रदीप शहा**
घर सजावट वस्तू
गणेश सोसायटी, बुधवार पेठ,
सोलापूर



**अर्चना रणवारे**
साहुश्री प्रोडक्ट



**वैशाली कुलकर्णी**
पंचगव्य आयुर्वेद उत्पादने



**प्रमिला चव्हाण**
उन्हाळी साहित्याचे स्टॉल




**स्वाती शिरसकर**
फुटवेअर



**आसावरी नाईकनवरे**
ज्वेलरी शॉप



**रुपाली जुजगार**
वृंदा क्रिएशन, डिझायनर्स
रेणुका नगर, जुळे सोलापूर



**माधवी पानसरे**
सर्व प्रकारचे उन्हाळी पदार्थ



**आरती अन्नलदास**



**सौ.प्रज्ञा सातपूरकर**
ज्वेलरी व साड्या कलेक्शन
मधुबन नगर, जुळे सोलापूर




**रश्मी देसाई**
क्लाय ज्वेलरी, पुणे



**प्रिती चव्हाण**
हॅन्डमेड परफ्युम ॲन्ड अत्तर
प्रसाद नगर, जुना आयएमएस
स्कूल, जुळे सोलापूर



**सुष्मा भट्टी**
मातीचे विविध सेट





लोकमंगल कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चर, वडाळा

# सांगोल्यातील पाच ग्रामपंचायतींना इमारत निधी मंजूर : आ. डॉ. देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२५ एप्रिल -**



सांगोला विधानसभा मतदारसंघातील गौडवाडी, बुद्धेहाळ, राजुरी, नाझरे आणि नराळे या पाच ग्रामपंचायतींना बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत नविन ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

ग्रामपंचायत प्रशासनाचा कार्यभार व्यवस्थित पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतींना नवीन इमारतीची आवश्यकता होती. याबाबत राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अधिवेशनापूर्वी केली होती. या मागणीची दखल घेत मंत्री गोरे यांनी तत्काळ या ग्रामपंचायतींना बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत निधी मंजूर केला आहे. निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

# स्वामींच्या दर्शनाने प्रत्येकवेळी स्फूर्ती मिळते : आ. वाघ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ एप्रिल-**

आपण श्री स्वामी समर्थांचे निस्सिम भक्त असून प्रत्येक वेळी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाकरिता आपण येथे भेट दिल्यानंतर स्वामींच्या दर्शनाने प्रत्येक वेळी नविन स्फूर्ती मिळते. त्यामुळे भावी वाटचालीत काम करण्याकरिता स्वामी दर्शनाने दरवेळी मिळणारे अनुभव नेहमीच प्रेरणा देत असतात असे मनोगत महाराष्ट्र विधान परिषद आमदार चित्रा वाघ यांनी व्यक्त केले.



ते नुकतेच श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाकरिता येथे आले असता बोलत होते. याप्रसंगी वटवृक्ष मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी आमदार चित्रा वाघ यांचा श्रींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून सत्कार केला. यावेळी प्रथमेश इंगळे, शहाजी पवार, प्रविण देशमुख, मंदिर समिती सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, उज्वला सरदेशमुख, श्रीशैल गवंडी, प्रसाद सोनार, संजय पवार, संतोष पराणे, स्वामीनाथ लोणारी, सागर गोंडाळ इत्यादी उपस्थित होते.



# भगवंत महोत्सवात शिवलीला पाटील यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ एप्रिल-**

श्री भगवंत महोत्सवानिमित्त बार्शी येथे हभप शिवलीला पाटील यांचे कीर्तन झाले. कीर्तनात विष्णू माऊली अद्यात्मिक मुलींच्या वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग नोंदवत वातावरण भक्तिरसाने भारुन टाकले.

सुरुवातीला कविता राऊत आणि नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांच्या हस्ते पाटील यांचे स्वागत करण्यात आले. शिवलीला पाटील यांनी भगवंत महोत्सवाचे महत्त्व अधोरेखित करताना हा सोहळा अत्यंत सामर्थ्यवान असल्याचे सांगितले. बार्शीकर खरोखर भाग्यवान आहेत, कारण भगवंत स्वतः या भूमीत वास करतात. मी भगवंतांची बार्शीची कन्या असून स्थानिक मुलीला आपल्या गावात कीर्तनाची संधी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

घरात पोटची आणि परकी मुलगी असा भेदभाव न करता सर्वांना समान वागणूक दिली तरच भगवंताची कृपा लाभते, असेही त्या म्हणाल्या.

महिलांना उद्देशून त्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, जिजाबाई, रमाई, जनाबाई, मुक्ताबाई यांचे आचार -विचार अंगीकारण्याचे महत्त्व अधोरेखित केले. इतरांच्या प्रगतीवर मत्सर करणारा माणूस आयुष्यभर दुःख भोगतो, असे सांगत त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याचा सल्ला दिला.

एकादशी व्रताचे महत्त्व सांगताना त्यांनी दशमी, एकादशी आणि द्वादशी असे तीन दिवसांचे व्रत असल्याचे स्पष्ट केले. कीर्तनादरम्यान पाऊले चालती पंढरीची वाट, विठ्ठल विठ्ठल, ज्ञानोबा माऊली अशा अभंगांनी वातावरण भारावून गेले. टाळ, मृदुंगाच्या नादात उपस्थितांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. कीर्तनात पुंडलिकासाठी चंद्रभागेच्या तिरी थांबलेला श्रीहरी यासारख्या कथा सांगत भक्तीभाव जागवण्यात आला. कीर्तनानंतर माजी आमदार राजेंद्र राऊत व कविता राऊत यांच्या हस्ते शिवलीला पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

# मुलींच्या स्वप्नांना आता निवासी शिस्तीची जोड

## • ‘श्रीराधा गुरुकुल’च्या प्रवेश प्रक्रियेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद •

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २५ एप्रिल-**

ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाला नवी दिशा देण्यासाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेल्या 'श्रीराधा गुरुकुल' (कामती बु.) आणि मुलांसाठीच्या ‘श्रीकृष्ण गुरुकुल’ (वाघोली) येथील प्रवेश प्रक्रियेला पालकांचा प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून, संस्कार आणि शिस्तीची जोड असणे अनिवार्य असल्याचे मत श्रीकृष्ण ग्रुपचे अध्यक्ष प्रा. प्रमोद आवताडे यांनी व्यक्त केले आहे.



**खर्डी, बिटरगावच्या पालकांचा ओढा**

प्रवेश प्रक्रियेदरम्यान शनिवारी दि. २५ एप्रिल रोजी खर्डी येथील पालकांमध्ये आपल्या मुलींच्या शिक्षणाबद्दल मोठी तळमळ दिसून आली. यावेळी बिटरगाव येथील घाडगे यांच्यासह अनेक नवीन पालकांनी गुरुकुलला भेट देऊन प्रवेश निश्चित केले. पालकांमधील हा उत्साह पाहून ग्रामीण भागात शिक्षणाप्रती असलेली जागरूकता स्पष्टपणे दिसून येते.

**गुरुकुलची वैशिष्ट्ये आणि कार्यपद्धती**

निवासी व्यवस्था: अत्यंत सुरक्षित आणि शिस्तबद्ध निवासी व्यवस्था,पालकांची सुरक्षेबाबतची चिंता मिटली आहे.

**मूल्याधारित शिक्षण:** इयत्ता ५ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षणासोबतच क्रीडा, योग, ध्यान आणि संस्कृत अभ्यासावर भर. वद्यार्थ्यांना केवळ परीक्षांसाठी तयार न करता आयुष्याच्या प्रत्येक लढाईसाठी सक्षम बनवणे, हे गुरुकुलचे ब्रीद आहे.



मुलींना फक्त शिकवू नका, तर त्यांना जिंकायला शिकवा. तुमच्या विश्वासाला कष्टांची जोड देऊन आम्ही विद्यार्थ्यांच्या भविष्याला यशाची गोड ओढ लावण्यासाठी प्रयत्नशील आहोत. मुलांच्या उज्वल भविष्यासाठी गुरुकुल शिक्षण ही काळाची गरज आहे.
**- प्रा. प्रमोद आवताडे, अध्यक्ष, श्रीकृष्ण ग्रुप.**

# पिलीव परीसरात तापमान चाळीशी पार

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २५ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात यंदा कधी नव्हे ते प्रथमच तापमानाने चाळीशी पार केल्यामुळे जनजिवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. दरवर्षी एप्रिल महिन्यात एवढे तापमान जात नव्हते पण यंदा या भागात सतत अवकाळी पाऊस झाल्यामुळे खरे तर तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. सकाळी अकरा वाजल्यापासून पिलीव येथील सर्व रस्ते तसेच बाजारपेठ अक्षरशः ओसाड पडत आहे.

यंदा कधी नव्हे तो मार्च महिन्यापासूनच सूर्य आग ओकत आहे. यामुळेच नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विजेच्या भारनियमनामुळे सर्व सामान्य नागरिक, शेतकऱ्यांचा जीव मेटाकुटीला आला आहे.